संगीत

# संजीवन



891.462
Pha/San
5698

लेखक-- प्रो. ना. सी. फडके
एम्. ए.,

सन १९३४

# संगीत
# संजीवन

(स्वतंत्र सामाजिक नाटक)

MODERN COLLEGE OF
POONA 5.
Dt.
ARTS, SCIENCE & COMMERCE

लेखक

प्रो० ना. सी. फडके एम्. ए.

प्रथमावृत्तिः जून, १९३४

891.462
Pha/San

891.462 - FAD / SAN
0 5698

A/5698

किंमत १।रुपया.

97

प्रकाशक:—

शंकर सीताराम फडके

हंस प्रकाशन संस्था, कोल्हापूर.

१. या पुस्तकाचे सर्व हक्क लेखकाकडे आहेत.

२. या नाटकांतील पदांच्या चाली *प्रो० पंडितराव नगरकर* यांनीं दिल्या आहेत.

३. नाटकांतील फोटो कोल्हापूरचे फोटोग्राफर *श्री. बापूराव लेंगडे* यांनीं काढले; तीनरंगी मुखपृष्ठ *श्री. शंकरराव किर्लोस्कर* यांनीं तयार केलें; व आर्ट छपाईचें सर्व काम किर्लोस्करवाडी प्रेसमध्यें झालें.

४. नाटकाचा पहिला प्रयोग *सुलोचना संगीत मंडळीनें* गुरुवार ता० २८ जून रोजीं रात्रीं १० वाजतां कोल्हापूर येथें पॅलेस थिएटरमध्यें केला.

मुद्रकः—

क. ह. सहस्रबुद्धे

श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

श्रीयुत

**शंकरराव किर्लोस्कर**

यांस

प्रेमपूर्वक अर्पण.

## प्रो० फडकेकृत पुस्तकें

### चरित्रें

१. दादाभाई नौरोजी ( २ री आवृत्ति )
२. टेरेन्स मॅक्स्विनी
३. डी व्हॅलेरा

### कादंबऱ्या

१. अल्ला हो अकबर
२. कुलाब्याची दांडी
३. जादूगार ( २ री आवृत्ति )
४. दौलत ( २ री आवृत्ति )
५. अटकेपार
६. निरंजन
७. कलंकशोभा

### नाटकें

१. युगांतर. २. संजीवन.
३. जडावाची देवी.

### प्रबंध

१. मानसोपचार ( २ री आवृत्ति )
२. मानसोन्नति
३. सुखाचे संसार
४. संतति-नियमन ( २ री आवृत्ति )
५. आजचे तरुण स्त्रीपुरुष व त्यांजपुढील प्रश्न
६. प्रतिभासाधन
७. गुजगोष्टी
८. वाङ्मयविहार.

### इंग्रजी

1. Sex Problems in India (2nd Ed )
2. Psychology
3. Elements of Ethics
4. Manual of Logic
5. Birth Control. ( 5th Ed. )

## मंगलावाहन

( हमीर : एकताल )

शुभ ललितकला सकला।
सुख वितरति अवनिवरति ठायिं ठायिं।
बुधरंजन कार्य नियत सार्थ करुनि ॥ध्रु०॥
सुभग विमल विधिकांता।
वीणारव करुनि स्वैर।
मत्तशिखीरसिकांप्रति।
देइ निर्भर नव रुचिर मोद ॥१॥

DECCAN ... POONA

काका०–गोड, प्रेमळ स्वभावाचीं माणसं जवळ असलीं कीं जितकं सुख देतात तितकंच दूर राहिलीं कीं दुसऱ्याला हैराण करतात. बाकी, आतां ताई येईल ती पुन्हां आपल्याला टाकून जायची नाहीं बहुतेक.

हौशा०–खरं?–कशावरून? त्यांनीं लिहिलं आहे मालकांना तसं?

काका०–अग, लिहायला कशाला हवं आहे? उघडच आहे. ताई आज पांचसहा वर्षं मुंबईस असे ती शिक्षणासाठीं. ताईच्या वडिलांची फार इच्छा, कीं ताईनं खूप शिकावं. त्यांनीं मरतांना तिला कांचनरावांच्या हवालीं केलं तेंसुद्धां तिचं शिक्षण उत्तम प्रकारें करण्याची शपथ घालून. ताईच्या शिक्षणाची सोय कांचनरावांनींही उत्तम केली, अन् तिचं चीजही झालं. आतां ताई येईल ती जायची नाहीं मुंबईस. इथें हैद्राबादेंत, या बंगल्यांत, आपल्याजवळ राहणार. एम्. ए.ची परीक्षा संपवून येते आहे. एम. ए. झाल्यासारखीच आहे.

हौशा०–एमे? अगबाई! मग आतां आमच्या ताईसाहेबांचं लगीन संसार कांहीं होणं नाहीं ह्मणायचं?

काका०–( हंसून ) शाबास! कशावरनं काढलास हा तर्क?

हौशा०–बायका इंग्रजी शिकल्या कीं त्या नवऱ्याच्या उपयोगी रहात नाहींत ह्मणे! अन् एमे ह्मणजे तर इंग्रजीचा कळस ना?

काका०–तुझ्या अकलेचा कळस दाखवलास खरा! बरं आटप. आतां येईल तुझी मालकीण. पलीकडच्या निजायच्या दालनांत दोनतीन पलंग मांडायला सांगितलंस ना संभ्याला?

हौशा०–मघांच सांगितलं. पण काका, दोन तीन पलंग कशासाठीं? ताईसाहेबांच्या बरोबर कोणी आणखी पाहुणे येणार आहेत होय? कोण यायचं आहे?

काका०–मलाच माहित नाहीं तर काय सांगूं तुला? त्याचं असं झालं, कांचनराव काल गुलबर्ग्याला जायला निघाले तोंच ताईची तार आली. त्यांत तिनं लिहिलं होतं, परीक्षा संपली, उद्यां येतें, अन् बरोबर पाहुणे आणतें आहे. कोण तें मात्र सांगायचं नाहीं. गमतीचं गुपीत आहे.



हौशा०–इश्श, काय तरी थट्टेखोर आमच्या ताईसाहेब! मालक हंसले असतील खूप ती तार वाचून.

काका०–तर काय? ते हंसले अन् ह्मणाले येत असेल कॉलेजांतल्या कोणा मैत्रिणींना बरोबर घेऊन हैद्राबाद दाखवायसाठीं झालं! ताई येणार त्यावेळीं हजर असायला पाहिजे असं कांचनरावांना फार वाटलं. पण, त्यांना गुलबर्ग्याला जाणंच भाग होतं कोर्टाच्या कामासाठीं. तेव्हां संध्याकाळीं खास येतो असं ताईला सांगायला सांगून गेले. त्यांच्या गैरहजेरींत ताईच्या किंवा तिच्या मैत्रिणींच्या व्यवस्थेंत कसूर होतां कामा नये हं हौशे! ही जबाबदारी आहे आपल्यावर.

हौशा०–त्याची नको काळजी. ताईसाहेबांचीं आवडतीं फुलं फुलदाण्यांत ठेवलीं आहेत, आवडत्या पक्वान्नांची ताकीद सोवळेकऱ्याला दिली आहे, आवडत्या रंगाचे पडदे खिडक्यांना लावले आहेत, आवडता वास न्हाणीच्या पाण्यांत टाकला आहे! लहानपणापासून ताईसाहेबांची तैनात केली आहे ती काय उगीच!

काका०–( हंसून ) हो. तेंही खरंच! बरं तूं आतां खालीं जा अन् आचाऱ्याला बजाव चहाचं आधण अगदीं तयार असूं दे म्हणून. मुंबईची पाहुणी मंडळी यायची आहेत हें विसरतां कामा नये.

[ हौशा जाते. ]

काका०–( एका ठेंगण्या टेबलावरील आल्बमचीं पानें सावकाश चाळीत ) वयाबरोबर किती फरक पडत गेला ताईच्या तोंडवळ्यांत आणि रूपांत! सात वर्षांच्या वेळचा हा फोटो! एखादी दवानं भिजलेली जाईची मिटलेली कळीच जशी कांहीं! हा फोटो ताई मॅट्रिक झाली त्या वेळचा. सुखदुःखांनीं भरलेल्या या जगांत स्वच्छंदानं हिंडायसाठीं अधीर झालेल्या पण किंचित भ्यालेल्या जिवाचं हे मूर्तिमंत चित्रच नाहीं का? अन् हा गेल्या नाताळांत घेतलेला फोटो! ओंठांच्या ठेवणींत केवढा करार आला आहे आतां! अन् डोळ्यांत तर साऱ्या मुलखाची नवीनच लबाडी निर्माण झाली आहे! बेटा, तुझं आजचं हें रूप पाह्यला तुझे वडील हयात नसावेत अं! दुर्दैव! ( डोळे टिपतो. )

[ मंदाकिनी प्रवेश करते ]

**मंदा०**–काका ! ( त्यांना ऐकूं जात नाहीं ) काका ! ( तरी ते आपल्याच भानांत असतात म्हणून ती जवळ जाते. ती जवळ आलेली पाहून काका चटकन डोळे पुसतात आणि आल्बम मिटतात. ) काका, संजीवनी आली आहे काय ?

**काका०**–आली नाहीं, पण आत्तां इतक्यांत येईल. तुला कसं कळलं ?

**मंदा०**–वास्तविक तुम्हींच मला कळवायला हवं होतं. पण, चांगली बातमी एकटेच पचवणारे अप्पलपोटे तुम्ही ! बाकी तुम्ही जरी बातमी कळवली नाहींत तरी ती मला कळायची थोडीच रहाणार ?

**काका०**–समजलों; संजीवनींनच धाडलं असेल तुला पत्र झालं !

**मंदा०**–हो, संजीवनीच्या अंगीं इतका व्यवस्थितपणा आल्यावर मग काय हवं होतं ?

**काका०**–मग कशी कळली बातमी तुला ?

**मंदा०**–अहो, टपाल खात्यापेक्षां अन् तार खात्यापेक्षांही अधिक वेगानं बातम्या पोंचवणारं तिसरंच एक खातं फार पुरातन काळापासून चालत आलं आहे, माहित नाहीं तुम्हांला !

**काका०**–म्हणजे ?

**मंदा०**–अहो, संजीवनी येणार ही बातमी तुमच्या हौशाबाईनं सांगितली समोरच्या माळ्याला, त्या माळ्यानं सांगितली शेजारच्या गवळणीला, त्या गवळणीनं सांगितली आमच्या कुणबिणीला, अन् तिच्याकडून लगेच कळली मला. नोकरांचं हें तारखातं फार जलद काम करतं बरं.

**काका०**–( हंसून ) असं असं. बरं कुणीकडून तरी तुला आनंदाची बातमी कळली हें बरंच झालं.

**मंदा०**–ती बातमी कळली म्हणून मी लगेच इकडे धांवत आलें. पण, इथं पहातें तों काकांना माझ्या हांकाही ऐकूं जात नाहींत. ते आपले बेभान होऊन डोळे टिपताहेत. आनंदाच्या बातमीनं माणसं रडतात ही नव्हती बाई माझी कल्पना !



**काका०**–मंदाकिनी, आमच्या ताईची तूं जिवलग मैत्रीण. तेव्हां तिच्यासारखीच तुला थट्टा प्रिय असावी हें ठीकच आहे. पण खरंच, संजीवनी आपलं शिक्षण पुरं करून आज परत येते आहे हें पाहून मला जितका आनंद तितकं दुःखही होत आहे. आज तिला डोळे भरून पाहायला भाऊसाहेब नाहींत हें पुन्हां पुन्हां मनांत येतं अन् वाईट वाटतं.

**मंदा०**–दुर्दैव त्यांचं म्हणून स्वस्थ नको कां बरं बसायला ? अन् तसं म्हटलं तर एक प्रकारें भाऊसाहेब मोठ्या दैवाचे म्हणून त्यांच्या पश्चात् त्यांच्या लेकीला अन् दीड लाखाच्या इस्टेटीला कांचनरावांच्यासारखा पालक मिळाला. किती उत्तम प्रकारें त्यांनीं इस्टेट जतन केली अन् संजीवनीला वाढवून शिक्षण दिलं ! नाहीं कां ?

**काका०**–( स्वगत ) इस्टेट जतन केली ? हं: ! जग अजूनही समजतं आहे कीं भाऊसाहेबांनीं मरतांना दीड लाखाची इस्टेट मागं ठेवली !

**मंदा०**–बोला ना काका ?–मी म्हणतें तें खरं ना ?

**काका०**–( बळेंच हंसून ) त्यांत काय संशय ? भाऊसाहेबांच्या अखेरच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या लेकीचं शिक्षण कांचनरावांनीं पूर्ण केलं. आतां एकदां तिचं लग्न करून दिलं, कीं संपली म्हणायची कांचनरावांची जबाबदारी.

**मंदा०**–तें होइल म्हणा. शिक्षणासारखी ती कांहीं अवघड गोष्ट नाहीं. संजीवनीच्या हातचीच आहे.

**काका०**–हो हो, तुम्ही अलीकडच्या मुलींनीं घेतली आहे खरी आपल्या हातांत !

[ बाहेर मोटारचें शिंग वाजतें. तें ऐकतांच काकांची वृत्ति एकदम आनंदित होते. ]

**काका०**–खास आमचीच मोटार आली. ताई आली. हौशे, ताईसाहेब आल्या ! जिवा, पाहुणे आले. संभ्या, पळ, पळ, सामान काढ !

[ आनंदानें तारांबळ उडाल्यासारखे हेलपाटे घालतात व शेवटीं जातात. ]

**मंदा०**–केवढं प्रेम म्हाताऱ्याचं ताईवर ! हे नोकर असून ह्यांना संजीवनी प्रेमानं काका म्हणतें तें उगीच नाहीं. ( खिडकीशीं जाते आणि

वांकेत. आनंदानें टाळ्या वाजवून ) ताई ताई ! इकडे वर! हल्लो! नमस्कार म्हटलं.

[ बंगल्याच्या पोर्चमध्यें संजीवनी उभी असते. तिचें हंसणें व पुढील बोलणें ऐकूं येतें. " कोण ? मंदा ? हल्लो ! नमस्कार ह्मटलं ! " मंदाकिनी मोठ्यानें हंसून खिडकींतून दूर होते व लगबगीनें खोलीच्या दाराकडे येते. बाहेर संजीवनी जिना धांवत चढून आल्यासारखीं पावलें वाजतात. ]

**संजी०**–(प्रवेश करून व अत्यानंदानें मंदाकिनीचा हात धरून ) किती दिवसांनीं भेटलीस ग ! म्हटलं इथं भेटती आहेस, कीं बंगलोरला सासरीं गेलेली आहेस कुणास ठाऊक ! किती आनंद झाला ह्मणून सांगूं?

**मंदा०**–तर तर ! देखल्या देवा दंडवत म्हणायला काय जातंय ? माझ्या भेटीची येवढी इच्छा होती तर तूं येणार हें बोटभर चिठीनं कळवायचं तरी होतंस.

**संजी०**–चुकलं बाई. खरंच, माझ्या अंगीं व्यवस्थितपणा केव्हां येणार आहे कुणास ठाऊक ?

**मंदा०**–खरं सांगूं ? तुझ्यावर सत्ता गाजवणारं माणूस तूं निवडून काढल्याखेरीज तुझ्या अंगीं शिस्त यायची नाहीं.

**संजी०**–खरंच कां हें ? मग मला शिस्त लागायला आतां फार अवकाश नाहीं म्हणायचा.

**मंदा०**–ह्मणजे ? कोणी शोधून काढलं आहेस वाटतं माणूस ?

**संजी०**–हो, हो. शोधलं आहे !

पद १ लें

( यमन : एकताल )

**हृदयरमण सुजन कान्त शोधिला ।**
**सुनंदधाम खचित शोभला ।**
**विलोभनें मनें वरिला ॥ ध्रु० ॥**
**बहर जेथ तरुणपणा । नाहिं उणिव मानधना ।**
**सदनचि जें ज्ञानगुणा । परमसुखद दयितजनां ।**
**त्या स्थलिं नित मन रमविन ध्यास मला ॥१॥**



अन् नुसतं शोधलंच नाहीं, बरोबरसुद्धां आणलं आहे !

**मंदा०**–इश्श, काय फाजील आहेस ग !

**संजी०**–ए, थांब हं. मी बाबांच्या खोलींत धांवत जातें अन् त्यांना— ( जाऊं लागते. )

**मंदा०**–अग पण ए वेडे, कांचनराव आहेत कुठं आपल्या खोलींत ? इकडे ये.

**संजी०**–म्हणजे ?

**मंदा०**–त्यांना काल कोर्टाच्या कामासाठीं जावं लागलं गुलबर्ग्याला. आज संध्याकाळीं येणार आहेत.

**संजी०**–खरं ह्मणतेस ? बरं, आतां येऊं देत संध्याकाळीं, ह्मणजे अशी रागावतें कीं—

[ इतक्यांत दोनतीन ट्रंका घेऊन संभू गडी येतो व त्याच्या मागोमाग काका व मोहन येतात. ]

**काका०**–(गड्याला) त्या पलीकडच्या खोलींत नीट ठेव हं पेट्या. ताई, येवढंच कां सामान, अन् येवढेच कां पाहुणे ?

**संजी०**–म्हणजे ? मी काय दहावीस होयबांचा तांडा बरोबर घेऊन हिंडणारी एखादी राष्ट्रीय पुढारीण बनलें आहे असं वाटलं कीं काय तुम्हांला ?

**काका०**–तसं नाहीं, पण तुझ्या तारेंत होतं पाहुणे आणतें आहे, तेव्हां आम्हांला वाटलं तीनचार मैत्रिणी घेऊन येणार तूं ! म्हणून आम्ही सोय केली तीसुद्धां बायका येणार अशा हिशेबानंच–

**संजी०**–शाब्बास ! ( मोहनला ) आतां बायकासाठीं केलेल्या सोयी तुमच्या वाट्याला येणार म्हणायच्या ? ( काकांस ) अन् काका, चार मैत्रिणींच्या जागीं एक मित्र मानणं भाग पडणार तुह्मांला. नाहीं तरी चार बायकांबरोबर एक पुरुष असा न्याय अंकगणितांत सांगितलाच आहे !

**मोहन०**–कमाल आहे बुवा. कोट्या करायच्या हौसेपुढं आमची ओळखदेख करून द्यायचीसुद्धां शुद्ध राहूं नये माणसाला म्हणजे काय !

POONA 5.

**संजी०**—अय्या ! खरंच कीं ! Please excuse अं !

**मंदा०**—पाहिलंस संजीवनी ! स्त्रीला शिस्तींत धरणारं पुरुषी यंत्र लागलं काम द्यायला !

**संजी०**—( मोहनला ) ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. हिचं नांव मंदाकिनी. फार फाजील आहे हें दिसलंच तुम्हांला. माझी फार आवडती आहे. ( तिला कुशींत घेते. )

**मंदा०**—अग, हें काय ?

**संजी०**—हिनं बंगलोरच्या एका मोठ्या कारखानदाराला कायमचा सेवेला ठेवला आहे.

**मोहन०**—म्हणजे ?

**संजी०**—म्हणजे त्याच्याशीं प्रीतिविवाह केला आहे !

**मोहन०**—चांगलं ! हीच तुझी प्रीतिविवाहाची व्याख्या कीं काय ? तसं असेल तर मी आपला वेळींच—

**संजी०**—इश्श, इतकं बिनसायला नको कांहीं ! फिरवून सांगतें. बंगलोरच्या एका कारखानदाराची ही मंदाकिनी जन्माची दासी झाली आहे !

**मोहन०**—अहाहा ! ही वाक्यरचना किती बालबोध झाली बरं !

**संजी०**—होईल तर काय झालं ! बरं तें असो. ) काकांकडे बोट दाखवून ( हे आमचे काका. काका म्हणजे काका नाहींत हो !

**मोहन०**—आज सरळ न बोलायची प्रतिज्ञा केली आहेस कीं काय तरी ?

**काका०**—मी सांगतों तुह्मांला. मी ताईचा काका ह्मणजे चुलता खरंच नव्हे. तिच्या मयत वडलांचा फार जुना नोकर आहे. ती मला दिवाणजी म्हणायच्या ऐवजीं प्रेमानं काका म्हणते इतकंच.

**मंदा०**—भाऊसाहेबांनीं मरतांना आपली लेक अन् इस्टेट कांचनरावांच्या हातीं दिली तेव्हांपासून या संजीवनीवरच्या लोभामुळं हे इथें कांचनरावांच्या नोकरीला राहिले. कांचनरावांनीं पित्याप्रमाणें हिला वाढवली, अन् काकांनीं आईप्रमाणें हिला लाडावून ठेवली !

MODERN COLLEGE
POONA 4.



काका:– भले ! असला प्रकार आहेतर ! (अंक १, पृष्ठ ९ )

**काका०**—हो हो ! जसं कांहीं मंदाकिनीला कोणी लाडावून ठेवलं नाहींच. बरं ताई, आमची ओळख करून दिलीस, पण—

**संजी०**—यांची राहिलीच ह्मणतां ? वा ! देतें ना करून. हे आमच्या कॉलेजांत केमिस्ट्रीचे प्रोफेसर आहेत—आहेत म्हणजे आतां नाहींत ! कारण, आतां हे नोकरी सोडून जपानला जायच्या तयारींत आहेत. यांनीं एक फार महत्वाचा शोध लावला आहे आणि जपानच्या सरकारपुढें तो सिद्ध करून कीर्ति अन् संपत्ति मिळवायचा त्यांचा बेत आहे.

**काका०**—असं ? कसला शोध ? मला समजण्यासारखा आहे कां ?

**संजी०**—हो हो. विस्तवानं वस्तू जळते हें तर कळतं तुम्हांला ?

**काका०**—वा ! येवढंही कळलं नाहीं म्हणजे भागलंच.

**संजी०**—जपानमध्यें घरदारं लाकडाचीं असतात अन् त्यांना आगीपासून फार भय असतं. यांनीं एका देशी वनस्पतीपासून रोगण तयार केलं आहे तें लाकडाला फासलं कीं, लाकूड कांहीं केल्या जळत नाहीं. यांचा हा शोध जपानी सरकारला पटला तर लाखो रुपये देऊन तें सरकार यांची कल्पना विकत घेईल. या हिशोबानं हे जाताहेत जपानला.

**काका०**—ओहोहो ! फार मोठ्या विद्वान गृहस्थांची ओळख झाली म्हणायची आज ! पण यांचं नांव नाहीं तूं सांगितलंस ताई.

**मंदा०**—काका, ती नाहीं सांगायची. बायका कितीही शिकल्या तरी ज्याच्यासाठीं माहेरचं नांव सोडायचं तें नांव घ्यायला त्या लाजायच्याच !

**काका०**—भले ! असला प्रकार आहे तर ! पण ही तर म्हणाली हे गुरु अन् आपण शिष्या ! बाकी, आधीं शिष्या अन् मग प्रिया हा क्रम ठरलेलाच आहे ह्मणा.

**मोहन०**—झाली तुमची थट्टा पोटभर ? संजीवनी जात्या लाजरी नसली तरी आतां तुमच्या थट्टेला उत्तेजन द्यायसाठीं माझं नांव न सांगतां उभी राहील, म्हणून मीच तें सांगतों. मला मोहन म्हणतात.

काका०–आज मोठाच भाग्याचा दिवस उगवला म्हणायचा. आमची ताई शिक्षण संपवून आली येवढ्याच आनंदांत आम्ही होतों, तों ताईनं विद्वान पति निवडला या आनंदाची त्यांत गोड भर पडली. कांचनराव संध्याकाळीं परत आले, त्यांची तुमची गांठभेट झाली, अन् ताईचा मनोदय त्यांना कळला, कीं त्यांनासुद्धां फार फार आनंद होईल! खरंच ताई, तूं मोठ्या भाग्याची!

मंदा०–वा, काका! आपला वधूपक्ष समजून कमीपणा घेतां कीं काय आपल्याकडे? ताई कसली भाग्याची? ताईसारखी अप्सरा मिळाली तेव्हां मोहनच भाग्याचे म्हणा!

मोहन०–असलीं बोलणीं बोलून माझ्यांत अन् संजीवनीच्यांत कलागत लावायचा बेत दिसतो आहे तुमचा!

मंदा०–इश्श, पहा हो!

[ हौशा प्रवेश करते. ]

हौशा०–मंदाकिनीताईसाहेबांचे वडील मोटार घेऊन आले आहेत. बाजारांत चलणार ना विचारताहेत.

मंदा०–जातें हं संजीवनी.

संजी०–अग चहा तरी घेऊन जा.

मंदा०–नको बाई, बाबांचा खोळंबा झाला तर ते रागावतील.

संजी०–मग आतां केव्हां येशील?

मंदा०–केव्हांही! पण दोघांत तिसरं आलेलं खपत नाहीं म्हणतात.

संजी०–मारुं कां या लुसलुशीत गालावर एक! येशील ना?

मंदा०–बरं येईन. ( मोहनला नमस्कार करून ) येतें हं. ( जाते. संजीवनी तिला दारापर्यंत पोंचवायला जाते. )

काका०–अजून कसा चहा आला नाहीं बरं? ( मोहनला ) धाडून देतों हं. ( जातो. )

मोहन०–( स्वगत ) स्वभावानं गोड दिसताहेत सारीं माणसं. सगळ्यांचं संजीवनीवर अनिवार प्रेम आहे. कांचनराव अजून भेटायचे



आहेत. पण त्यांचं तर संजीवनीवर विलक्षण प्रेम असणारच. हें असं वैभव तिच्याभोंवतीं त्यांनीं पसरलं आहे तें काय उगीच? त्यांच्या प्रेमाची कल्पना मनांत आली कीं वाटतं संजीवनीला दूर करून माझ्या हातीं द्यायला ते नाहीं तर म्हणणार नाहींत? शंका भलतीच, पण मनांत येते खरी. प्रीति अन् भीति जुळ्या बहिणीच आहेत कीं काय कुणास ठाऊक!

पद २ रें

( पूरिया : त्रिताल )

**मम प्रणयरत मानसीं तरल पसरती**
**भयविभाव ॥ ध्रु० ॥ प्रेमसफलता येतां**
**निकटीं, हृदय केंवि वरितें सभयता?।**
**प्रीतिभगिनी कीं भीति? ॥ १ ॥**

[ संजीवनी चहाचा ट्रे घेऊन येते व पलंगाशा टेबलावर मांडते. ]

संजी०–यावं म्हटलं.

मोहन०–हें काय? इतकीं चाकरमाणसं असतांना तूं स्वतः तसदी घेतलीस?

संजी०–तसदी? कां आनंद?– पण प्रेमांतल्या माणसाची सेवा करण्यांत केवढा आनंद असतो हें तुम्हां पुरुषांना नाहींच कळायचं. तुम्ही बाकीचे शोध पुष्कळ लावाल, पण स्त्रीहृदय तुम्हांला पुरतं कधींच कळायचं नाहीं हेंच खरं.

मोहन०–पण मी एक इंग्रजी पुस्तक नुक्तंच पाहिलं, त्याचं नांव "स्त्रीहृदयाचं स्वरूप." नांव सोनेरी शाईंत छापलं आहे, अन् बांधणी उंची आहे. पण आंतल्या दोन अडीचशे पानांवर कांहींसुद्धां छापलेलं नाहीं. सगळं पुस्तक कोरं! स्त्रीहृदय असंच कोरं असतं असा त्या लेखकाचा अभिप्राय दिसतो!

संजी०–नाहीं नाहीं. त्या कोऱ्या पुस्तकाचा अर्थ इतकाच, कीं त्या लेखकाच्या प्रेमाचा स्वीकार एकाही स्त्रीनं केला नाहीं, अन् म्हणून सूड उगवायसाठीं द्राक्षं आंबट असं तो जगाला खोटंच सांगूं लागला.

मोहन०–छे छे. तसं नाहीं—

संजी०–बरं नसूं दे. आपल्या वादाला कढ येईल खरा, पण चहा निवून जाईल. हं या.

मोहन०–एकूण हरलीस ( हंसतो. )

संजी०–बरं बरं, तसं कां होईना !

[ दोघे चहा पितात. ]

संजी०–तुमच्याशीं असं एकांतांत बोलत बसलं, कीं सारखं मनांत येतं, आतां हें सुख लवकरच दूर होणार ! लग्न झालं अन् तुम्ही जपानला गेलां कीं विरह हाच माझा एकटा सोबती.

मोहन०–पण मी शक्य तों लवकर परत येणार नाहीं का ? अन् येतांना लक्ष्मी अन् कीर्ति नांवाच्या दोन दासी तुझ्या सेवेला ठेवायसाठीं घेऊन येणार नाहीं का ?

पद ३ रें

( पटदीप : त्रिताल )

विरहास या ना गणी ।
वरि धीरता मन शांत ठेवी ॥ ध्रु० ॥
धनसन्माना जिंकुनि येतां ।
निजठायीं मी तुज सुखवीन ॥१॥

पण संजीवनी, तुझं माझं लग्न झाल्यासारखंच आपण बोलत आहोंत हें वेड्यासारखंच ह्मणायचं !

संजी०–तें काय ह्मणून ? तसं आपण बोललों नाहीं तर तेंच वेड्यासारखं होईल ! मी तुम्हांला आपलं प्रेम अर्पण केलं, तुम्ही तें स्वीकारलंत ! झालं; आतां आडकाठी ती काय उरली ?

मोहन०–तुझ्या पालकाची–कांचनरावांची संमति मिळायची आहे अजून ! ती त्यांनीं नाहीं दिली—



संजी०–इश्श ! उगीच काय कांहीं तरी ? कांचनबाबांची संमति क्षणार्धांत मिळेल ! तुम्हांला डोळ्यांनीं पाहिल्याबरोबर ते मला शाबासकी देतील अन् तुमच्या स्वाधीन करतील ! तुम्हांला माहित नाहीं अजून बाबा माझ्या सुखासाठीं किती तत्पर असतात तें !

मोहन०–पण—

संजी०–पण काय आतां ?—

मोहन०–कांचनरावांना कदाचित् वाटेल मी गरीब, परदेशी [illegible] मला पैसे पाहिजेत ह्मणून तुला मी प्रेमाच्या खोट्या सोंगानं ठकवतो आहे !

संजी०–आली कां पुन्हां लहर या वेड्या शंकेची ?

मोहन०–संजीवनी, लोक खरोखरच माझ्यावर असा आरोप केल्यावांचून राह्यचे नाहींत. तुझे पैसे मिळणार नसते तर माझं परदेशीं जाणं घडलं नसतं हें उघडच नाहीं कां ?

संजी०–पण प्रीतीनं सारा दुजाभाव नाहींसा केल्यावर माझे पैसे अन् तुमचे पैसे अशी भाषाच संभवत नाहीं हेंही उघडच नाहीं कां ?

मोहन०–तुझ्या माझ्यापुरतं आहे, पण लोकांच्या दृष्टीनं नाहीं. गुणांच्या कौतुकापेक्षां मत्सर अन् द्वेष करायची लोकांची प्रवृत्ति अधिक असते. तूं गरीब असतीस तर बरं झालं असतं.

संजी०–पण मग तुमच्या महत्वाकांक्षेची पूर्तता केल्याचं समाधान मला कसं लाभलं असतं ? कितीदा सांगूं गडे, कीं लोकापवादाचा विचारच मनांत आणूं नये ह्मणून !

मोहन०–लोकांचं राहूं दे. कांचनरावांच्यासुद्धां मनांत येईल कीं मी केवळ स्वार्थासाठीं—

संजी०–पुरे पुरे तर्कट आतां अं ! मुंबईहून आपण निघालों तेव्हां कबूल केलंत तें विसरलांत वाटतं, कीं या साऱ्या शंका मुंबईस टाकायऱ्या ह्मणून ?– हं, चला आतां कपडे बदलायचे असले तर बदला. मोटारींतून जाऊन येऊं घटकाभर. आमचं शहर पाह्यचं आहे कीं नाहीं ?

MODERN COLLEGE POONA 5.

**मोहन**०–म्हणजे ? तुझ्याखेरीज आणखी कांही पाहण्यासारखं आहे या शहरांत ?

**संजी**०–हो हो, आहे बरं !

[ संभू प्रवेश करतो. ]

**संभू**०–साहेबांना स्नान करायचं असलं तर पाणी काढलं आहे.


**मोहन**०–चल, आलोंच ( दोघे जातात. )

**संजी**०–दिवस केव्हां सरेल, बाबा केव्हां परत येतील अन् आमच्या लग्नाला त्यांची संमति केव्हां एकदां मिळेलसं झालं आहे मला ! त्यांना कल्पनाही नसेल मी काय विचारणार आहे त्याची ! पण तें कळलं म्हणजे आश्चर्यापेक्षां आनंदच अधिकं होईल त्यांना ! आमच्या लग्नाचा थाट कसा उडवून द्यावा याचे बेत करतां करतां पुरे वाट होईल स्वारीची ! मोठी गंमत उडणार आहे ! अहाहा ! चार प्रहरांच्याच अंतरावर असलेल्या त्या आनंदासाठीं वाटणारी उतावळी किती सुखाची !

पद ४ थें
( मांड : केरवा )

प्रीतिरागें मानस रंगलें ।
अतिलोलुपता सुख पावलें ॥ ध्रु० ॥
कमलिनीसम लालसावलें ।
शशिकलासुखा जणुं भाळलें ।
सुख मानीत घाईत भोळें खुळें ॥ १ ॥

[ पडदा ]



मोहनः–तुझ्याखेरीज आणखी कांहीं पाहण्यासारखं आहे या शहरांत. (अंक १, पृष्ठ १४)

## प्रवेश २ रा

[ कांचनरावांचा बगीचा. वेळः पहिल्या प्रवेशाच्या दिवशीं संध्याकाळची. म्हातारा खंडूजी माळी बागकाम करीत आहे. ]

खंडूजी०–( स्वतःशीं गुणगुणत )

खुन बाळपनांत । माझ्या मनांत । आंबेवनांत ।
पहिली वळख गोडिची । कशि इसरन त्या घडिची ॥

उषा! न्हाईंच जमत! सूरबी नीट लागना अन् ताल तर ग्येला का या बुड्ढपनांत! भलतं काम भलत्या वयांत साधत न्हाई ह्येच खरं! लावनी म्हनाया शिकायची तर जवानींतच शिकाया व्होवी. पर चुकत माकत का असंना, या खंडूजीच्या जिवाला लावनीची लकेर सुचाया लागली तवा अंगामंदी नवी जवानी आली यांत संशे न्हाई! ( दंडाला बांधलेल्या ताईताकडे पाहून ) या तायताच धा रुपय दिल त्या दर्ग्यातल्या मांतिरिकाचा. पर गुनबी हाय खरा तसाच. अंगामंदी जवानी अशी सळसळाया लागलीया कीं काय सोय न्हाई. ती हौशा नजरला पडली की इष्कानं सारं अंग कसं पेटतंया! अन् ती तर काय दाद देईना. पर आतां जाती कुठं! ( कुडत्याच्या खिशांतली पुडी बाहेर काढून तिच्याकडे पहात ) मांतिरिकाला पंचीस रुपय देऊन काल हा रामबान दवा आनलाया! करनी करुन हौशीला यवढं अवशाद खाया लावलं, कीं हौशाचा जीव माझ्यावर जडलाच पाहिजे! मांतिरीक काय म्हनाला बरं? ······राजाची रानी असली तरी या अवशदानं कब्जांत आलीच पाहिजे, नव्हं का? मग हौशीचा काय पाड? पर आज ही पोर हाय तरी कुटल्या कामांत? उगवतीचा सूर्य मावळतीकडं झुकला तरी अजून यकदांबी ही झुकली न्हाई इकडं! ( काम करूं लागतो व लावणी गुणगुणतो. )

खुन बाळपनांत । माझ्या मनांत । आंबेवनांत ।
पहिली वळख गोडिची । कशि इसरन त्या घडिची ॥

MODERN COLLEGE POONA 5.

[ हौशा प्रवेश करते. ]

**हौशा**०–खंडूजी, अहो खंडूजी! इश्श, ही गाण्याची लकेर आज कुठली नवीनच आली आहे? आजपर्यंत कधींच ऐकलं नव्हतं तुम्हांला गाणविणं गुणगुणतांना.

**खंडूजी**०–हा ऽऽऽ त्येचं असं हाय बग. माघ फाल्गुनामंदी झाडा झुडपावर पान पाला कधींबी दिसत न्हाई. पर चैतराची नवती सुरूं झाली, कीं झाडाझुडपाला पालवी फुटतीया का नाय?

**हौशा**०–असं असं. तसा तुम्हांला कंठ फुटला म्हणतां होय? छान!

**खंडूजी**०–अन् असं बग, सकाळधरून तूं दिसली न्हाईस तवा जिवाला गमना म्हून धरला जरा मनाशीं लावनीचा सूर.

**हौशा**०–बरं तें तुमचं कांहीं कां असेना. मी येवढ्याचसाठीं आतां मुद्दाम आलें, कीं फुलदाण्यांत सकाळीं घातलेलीं फुलं काढून आतां ताजीं भरायचा हुकूम दिला आहे काकासाहेबांनीं. तेव्हां जलदी आटपा, आणखी ताज्याताज्या फुलांचे गुच्छ बनवून वर घेऊन या. जातें मी. लावणीच्या नादांत विसराल!

**खंडूजी**०–अग पन जाशील. यवढं काय अगदीं? ह्ये बग, तूं अन् मी मिळूनशानच फुलं तोडून गुच्छ करूं या. बास बास! ये.

**हौशा**०–( स्वगत ) झाला मेल्याचा लघळपणा सुरूं! प्रेमबीम करतो कीं काय थेरडा माझ्यावर कुणास ठाऊक! स्मशानांत गोवऱ्या गेल्या तरी पुरुषांची वासना निवत कशी नाहीं? ( उघड ) छे छे. इतका वेळ कुठं आहे मला आज? ताईसाहेब आणि खासे पाहुणे फिरायला गेले आहेत ते आत्तां येतील.

**खंडूजी**०–बरं मग? पाव्हनं काय आल्याबरोबर हौशी कुठं हाय म्हून विचारनार हायत व्हय?

**हौशा**०–अहो तसं नाहीं, पण–

**खंडूजी**०–पन बीन कांहीं न्हाई. जरा ऱ्हाच उभी. लै दिस झालं तुला एक गोष्ट सांगायची हाय बग.



**हौशा**०–असं! ती काय बाई?

**खंडूजी**०–( घुटमळून तिच्याकडे पहात रहातो )

**हौशा**०–सांगा ना?

**खंडूजी**०–सांगूं? अं ऽऽ ह्ये बग हौशे, तूं कांहीं तरी अवशाद [illegible] व्होवं असं मला दिसतंया.

**हौशा**०–मी? तें काय ह्मणून बाई? मला काय झालंय?

**खंडूजी**०–तुला वाटत नसल पर झालंया खास. (स्वगत) झालं [illegible] तर व्होवं असं मला वाटतंय ना? ( उघड ) तुझा चेहरा सुकल्या-[illegible] न्हाई दिसत तुला आतांशा?

**हौशा**०–नाहीं बाई. तुम्हांला दिसतो?

**खंडूजी**०–तर! अन् हातपाय तर काय झाल्याती? ( तिचा हात [illegible] घेऊन ) बग कीं. अंगातलं रगत जसं काय पार गेलंया.

**हौशा**०–( स्वगत ) तुझ्या रक्ताचा घोंट घ्यावासा वाटतो आहे [illegible]! ( हात सोडवून उघड ) अहो, गोरं माणूस असंच दिसायचं.

**खंडूजी**०–तर तर. मी काय तुला आजच पाहातुया जनूं? तूं [illegible] म्हन, आत्तांशा तुझी तब्येत ठीक न्हाई खास! हौशे, कुनाच्या [illegible] झुरत तर न्हाईस!

**हौशा**०–इश्श, प्रीति कशाशीं खातात मला माहितसुद्धां नाहीं अजून.

**खंडूजी**०–(स्वगत) व्हईल माहित, व्हईल माहित! जातिस कुठं? तिचं मन कुठं गुतलेलं न्हाई ही आपल्या सोयीचीच गोष्ट हाय म्हनायची. ( उघड ) पीर्तिचा जाच न्हाय तर दुसरं काय तरी कारन असल. पन तुझी तब्येत ठीक न्हाई बघ.

**हौशा**०–(हंसून) बरं नाहीं ठीक तर नाहीं. आतां काय करायचं?

**खंडूजी**०–काय करायचं म्हंजी, अवशाद घ्यायचं.

**हौशा**०–तुम्ही मला आजारी बनवलीत, आतां तुम्हीच मला औषध द्या.

खंडूजी०—अवशाद म्हनतां अवशाद. ह्ये घे.

हौशा०—( त्याच्याकडे आश्चर्यानें पहात रहाते. )

खंडूजी०—पहातीस काय अशी ? नीट ठेव हें खिशांत रातीला ही पुडी उशाला ठिवायची अन् सकाळीं उठल्याबरावर तिच्या भवती एक परदक्षिना घालून ती घ्यायची. घेशील ना ?

हौशा०—घेईन ना. ही पुडी घेतली कीं मी लठ्ठ होणार कां ?

खंडूजी०—काय व्हईल त्यें दिसलच कीं.

( पडद्यांत " खंडू, अरे खंडू, मालक तुला हांका मारताहेत. " )

खंडूजी०—अरच्या, मालक कवा आलं मला माहित बी न्हाई !

हौशा०—अर्धा तास होऊन गेला मालक गुलबर्ग्याहून आल्याला तुम्हांला दाद असेल कशाला ? लावण्या घोका.

[ पुन्हां " खंडूजी, खंडूजी. " अशा हांका. ]

खंडूजी०—( मोठ्यांदा ) आलों आलों— ( हौशाकडे पाहून त्यवढं अवशद घ्याया इसरूं नकोस अं. ( जातां जातां स्वगत ) आत बघूं या इष्काची गोळी लागतीया का फुकाट जातीया ! ( जातो. )

[ हौशाही उलट दिशेनें जावयास निघते. इतक्यांत बाजी शोफर प्रवेश करतो आणि तिला थांबवतो. ]

बाजी०—हौशे, कालपासून तुला एक वस्तु द्यायची आहे. पण तुझी भेटच होईना ! काल मालकांनीं गुलबर्ग्याची खेप काढली म्हणून जा[illegible] लागलं मोटार घेऊन, अन् आत्तां परत आल्यावर लगेच तुझी गां[illegible] घ्यायची तों मालकांनीं पिटाळलं बाजारांत.

हौशा०—( स्वगत ) कायमचेच कां नाहीं मालक पिटाळीत तु[illegible] मसणांत ! त्या खंडुजीचं थेरडं प्रेम अन् या मेल्याचं मोटार ड्रायव्ह[illegible] धटिंगण प्रेम या कात्रींतनं मी कशी सुटणार आहें देव जाणे ! ( उघड बाजी, खरंच मोटार हांकायची नोकरी मोठ्या त्रासाची. बरं मला का[illegible] देणार आहेस ?

बाजी०—औषध आणलंय तुझ्यासाठीं.



हौशा०—माझ्यासाठीं ? मला काय झालंय ?

बाजी०—कांहीं झालं नाहीं असं तुला वाटतंय हेंच झालंय. अग, [illegible] पहातों आहें, तुझा चेहरा किती सुकल्यासारखा दिसतो आहे !

हौशा०—इश्श. कांहीं तरीच बोलणं.

बाजी०—अग, खोटं नाहीं सांगत. अन् हात पाय बघ कसे ओढले आहेत. ( स्वगत ) हिला वश करायसाठीं त्या मांत्रिकापासून [illegible] औषध तर हिला खायला घातलं पाहिजे. अन् तें घालायचं [illegible] हिला अशी भेवडवलीच पाहिजे. प्रीतिच्या खेळांत खोटं नाटं सारं माफ असतं. ( तिचा हात धरून उघड ) बघ काय दशा झाली आहे [illegible] ! थेंब उरला नाहीं रक्ताचा अंगांत ! काय पांढरी फटक दिसते आहेस !

हौशा०—( स्वगत ) तुझी मदनबाधा झाली तर रतिसुद्धां घाब-रून पांढरी फटक पडेल खरी ! ( हात सोडवून उघड ) अहो गोरं [illegible] असंच दिसायचं.

बाजी०—तर तर. मी काय तुला आजच पहातों आहे ? तूं [illegible] तुझी तब्येत ठीक नाहीं आतांशी. कुणाच्या प्रीतींत सांप-डून झुरत तर नाहींस ?

हौशा०—इश्श. प्रीति म्हणजे काय पदार्थ आहे मला माहित-[illegible] नाहीं.

बाजी०—( स्वगत ) होईल माहित, होईल माहित. मांत्रिकबाबाचं औषध पोटांत जायचाच अवकाश. हिची प्रीति कुठें जडलेली नाहीं हें ठीक झालं. ( उघड ) प्रीतीचा ताप नसला तर दुसरा कांहीं विकार असेल. पण तुझी तब्येत बिघडली आहे खास.

हौशा०—बरं, बिघडली तर बिघडली. आतां काय करायचं ?

बाजी०—काय करायचं म्हणजे, हें औषध घ्यायचं. तुला आपल्या तब्येतीचं कांहीं वाटत नाहीं. पण तुझा असा सुकलेला चेहरा पाहिला, कीं माझा जीव तिळतिळ तुटतो.

हौशा०—( हंसून ) त्या तिळांचंच कुटून औषध केलं आहे वाटतं ?

बाजी०-कर चेष्टा. मी आपला सद्भावानं वागतों आहे खरा. माझ्या ओळखीचे फार मोठे वैद्यराज आहेत सदरेमध्यें. त्यांच्यापासून आणलं आहे तुझ्यासाठीं हें औषध. हें घे.

हौशा०-कसं घ्यायचं हें औषध ?

बाजी०-ही पुडी रात्रीं उशागती ठेवायची, आणि सकाळीं उठलं, कीं तिला एक प्रदक्षिणा घालायची अन् घ्यायची. हंसतेस काय! घेशील ना ?

हौशा०-घेईन तर. हें घेतलं, कीं मी लठ्ठ होणार नाहीं कां ?

बाजी०-कांहीं तरी गंमत होईल खास.

[ पडद्यांत मोटारीचा हॉर्न वाजतो. ]

बाजी०-अरे बापरे ! मालकांना क्लबांत घेऊन जायचं आहे. विसरलोंच कीं ! ( हौशाकडे पहात. ) तेवढं औषध घे हं. ( जातां जातां स्वगत. ) आतां बघूं मांत्रिकबाबाची करामत. पंचवीस रुपये गेले आहेत कडोसरीचे औषधासाठीं ! ( जातो. )

हौशा०-या दोघांचीं डोकीं तर फिरलेलीं नाहींत ? हे मेले पुरुष आम्हां स्त्रियांना समजतात तरी काय ? या पुड्या मीं खायच्या काय ! इश्श ! ( हंसते, पुड्या फेंकून देते, आणि जाते. )

—०—



## प्रवेश ३ रा

[ कांचनरावांची बसायची भव्य खोली. वेळः दुसऱ्या प्रवेशानंतर घटकाभराची. काका कांचनरावांच्या टेबलावरचे कागद व्यवस्थित जुळवीत आहेत. जरा वेळानें बंगल्याच्या आवारांत मोटारचें हॉर्न वाजतें. ]

काका०-कांचनराव क्लबावरून परत आले वाटतं ? गेले काय अन् चक्कर झाली नाहीं तों आले काय ? बाकी त्यांचं मन कुठलं आज क्लबांत रमायला ? ताई केव्हां भेटेल असं झालं असेल त्यांना ! मघाशीं मुक्कामाहून आले तेव्हां ताई फिरायला गेली होती म्हणून वेळ काढायला नाहीं येणे झालं क्लबावर !

[ दोन तीन रॅकेट्स, कॅमेऱ्याचें एक मोठें पार्सल, व दोन तीन छोटीं पार्सलें घेऊन बाजी प्रवेश करतो. तो तें सामान वेगवेगळ्या जागीं नीट ठेवूं लागतो. ]

काका०-कां रे, लवकर आले मालक क्लबावरून ?

बाजी०-खेळतील तर वेळ लागेल ना ? नुस्ता सोडा घेतला, एकदोघांशीं थोड्या गोष्टी केल्या, अन् बास निघालेच. वाटेंत बाजारांत खरेदीला काय वेळ लागला तेवढाच.

काका०-खरेदी कांहीं विशेष झालेली दिसते आहे.

बाजी०-नाहीं. सिगारेट, चिरुट बिरूट......

काका०-कांचनराव बाजारांत गेले अन् चिरूटाच्या चार पेट्या त्यांनीं आणल्या नाहींत असं कधीं झालं आहे ? पण बाजी, हें मोठं पार्सलसुद्धां चिरूटाचंच ?

बाजी०-वेड लागलं आहे काय ? इतक्या चिरूटांचा धूर काढणाऱ्या माणसाचं तोंड म्हणजे गिरणीचं धुराडंच म्हणतील लोक ! त्या पार्सलांत कॅमेरा आहे. भारी किंमतीचा आहे.

काका०-( स्वगत ) ताईला भेटल्याबरोबर भेट दिली पाहिजे, त्याची तयारी दिसते आहे ही !

**बाजी**०–मालकांना फोटो काढीत बसायला वेळ तरी केव्हां सांपडणार कोर्टापुढें ? उगीच खरेदी—

**काका**०–शुः !—

[ कांचनरावांची बाहेर चाहूल झाल्याचें खुणेनें सुचवितात. बाजी जीभ चावतो, तोंडावर हात ठेवतो, आणि हलक्या पावलांनीं निघून जातो.

कांचनराव प्रवेश करतात. ]

**कांचन**०–( खुर्चीवर बसतां बसतां ) काय काका, आली कीं नाहीं मंडळी अजून ?

**काका**०–ताई अन् पाहुणे होय ? अं......नाहीं. पण आतां येतीलच पांचदहा मिनिटांत.

**कांचन**०–( कांहीं वेळ टेबलावरचे कागद वाचण्यांत घालवून ) मी क्लबांत गेल्यावर कुणाचा फोन बीन आला होता कां ?

**काका**०–फोन नाहीं, पण ते हे येऊन गेले.

**कांचन**०–कोण ?

**काका**०–ते चित्रकार. वहिनीसाहेबांचं मोठं चित्र करायची ऑर्डर आपण ज्यांना दिली होती ते. त्यांनीं तयार झालेलं चित्र बरोबर आणलं होतं, पण आपण घरांत नव्हतां म्हणून चित्र ठेवून ते निघून गेले. अंऽ ऽ ऽयाच खोलींत लावायचं ना तें चित्र ?

**कांचन**०–( स्वगत ) माझ्या मृत पत्नीची आठवण करून देणारं तें चित्र आजच्या माझ्या मनोवृत्तींत माझ्या नजरेला शल्यासारखं वाटेल. ( उघड ) नाहीं. या खोलींत नको तें चित्र.

**काका**०–मग कुठं लावायचं ? मोठ्या दिवाणखान्यांत ? फार सुबक झालं आहे ! वहिनीसाहेब गेल्याला दहा वर्षं झालीं, पण त्या चित्राकडं पाहिलं, कीं वाटतं या घटकेला त्या आपल्या डोळ्यांना प्रत्यक्ष दिसताहेत ! कुठं लावायचं तें सांगावं म्हणजे......

**कांचन**०–सध्यां राहूं दे तसंच.



**काका**०–चित्रकार म्हटला कीं अव्यवस्थित असायचा. पण या चित्रकारानं अगदीं वक्तशीर काम केलं म्हणायचं. आपण बजावलं होतं [illegible] अगदीं नेमकं आजच्या तारखेला–आपल्या वाढदिवसाला त्यानं चित्र तयार करून दिलं !

**कांचन**०–वाढदिवस ? माझा वाढदिवस आहे आज ?

**काका**०–हो आज आपल्याला पन्नासावं वर्ष लागलं.

**कांचन**०—( स्वगत ) पन्नास ! पण माझ्या मनांत तर ऐन पंचविशीची वासना उसळली आहे ! ( उघड ) काय हो काका, संजीवनीला किती वर्षं आहे ?

**काका**०–अं...तेविसावं. कां ?

**कांचन**०–नाहीं...सहज. (स्वगत) पन्नास...! तेवीस...!(उघड) का, तुम्ही जा. संजीवनी बाहेरून आली कीं तिला इकडे धाडा हं. रेसिडेन्सीवर खान्याला जायचं आहे मला; माहित आहे ना ? जाण्यापूर्वी तिची माझी भेट झाली नाहीं म्हणजे मग उद्यां सकाळपर्यंत लांबेल.

**काका**०–छे छे ! ताईसाहेब आल्याबरोबर त्यांना धाडतों. (जातो)

**कांचन**०–( टेबलाच्या ड्रावरमधून संजीवनीचा फोटो काढून ) संजीवनी, तुला कल्पनाही नसेल कीं प्रेमी तरुणाच्या लोभी नजरेनें मी तुझ्याकडे आत्तांशा पाह्यला लागलों आहे ! ( टक लावून पहातो ) अहा ! तपस्व्यांची कसोटी पाह्यला इंद्रानं धाडलेल्या अप्सरांतसुद्धां कोणी इतकी सुंदर नसेल ! अशा सौंदर्याचा मला अभिलाष वाटला तर मी दोषी कीं हें सौंदर्य दोषी ? हा अभिलाष या वयांत धरल्याबद्दल लोक हंसतलि ! खुशाल हंसू देत. माझं ठरलं तें ठरलं. सौंदर्या, केव्हां तुला बाहूंत असं [illegible] धरून तुझं चुंबन—( फोटो ओंठांजवळ नेतो तोंच टेलिफोन खणखणून वाजतो त्यामुळें दचकतो. ) च् ! काय त्रास आहे ! ( टेलीफोन हातीं घेऊन ) हॅलो, कोण तें ? कोण ? बिहारीलाल ? Evening! अं ? हो. मला जायचं आहे खान्याला. आपण गाडी घेऊन येतां ? ठीक; मिळून [illegible]. थँक्स. आं ? आणखी काय ? काय ह्मणतां ? माझं अभिनंदन ?

तें कशाबद्दल बुवा ? वाढदिवस ! हं: ! That's all right ! Thanks anyway ! ( त्रासून टेलीफोन बंद करतो. ) माझ्या वाढदिवसाचा मला विसर पडायला पाहिजे आहे, अन् जो तो कां मला त्याची आठवण करून देतो आहे ? पण जगानं केवढाही कल्लोळ करून मला माझ्या उतारवयाची आठवण करून दिली तरी मी ती मनावर घेणार नाहीं. माझं ठरलं तें ठरलं. आतां संजीवनी भेटली, कीं वेळ न घालवतां—

[ पडद्यांतून संजीवनीचा आवाज ऐकूं येतो, " टायगर, टायगर, ए वेड्या त्यांना चावायचं काय ? " ती मोठ्यांदा हंसते. ]

**कांनच**०–आलीच वाटतं संजीवनी. ( फोटो परत ठेवतो. )

[ संजीवनी व मोहन प्रवेश करतात. ]

**संजी**०–( एकदम घाईनें पावलें टाकून कांचनरावांच्या जवळ जात ) बाबा ! ( ती त्याला बिलगायच्या बेतांत असते, पण त्यालाच संकोच वाटून तो किंचित् मागें सरतो. )

**कांचन**०–( स्वगत ) नव्या वासनेनं हिऱ्याकडे पाह्यला लागल्याबरोबर पहिल्यासारखं निष्पाप मोकळ्या मनानं वागणं कसं अशक्य झालं मला !

**संजी**०–( स्वगत ) हें काय आश्चर्य ? मी फारा दिवसांनीं परत आलें, कीं पहिल्या भेटीच्या वेळीं बाबांनीं एखाद्या लहान मुलासारखं मला उराशीं धरायचं हें ठरलेलं ! त्यांनीं ताई असं गहिंवरून पुटपुटायचं ! त्यांचा कढत श्वास माझ्या गालाला लागायचा ! पण आज यांनीं मला जवळही घेतलं नाहीं, अन् ताई ह्मणून वात्सल्यानं हांकही मारली नाहीं ! ( उघड ) बाबा !—

**कांचन**०–( मनाचा गोंधळ लपवून हंसत ) आज सकाळींच आलीस ना ?

**संजी**०–हो, आह्मी सकाळींच आलों.

**कांच**०–आह्मी ?



**संजी**०–हो, मी आणि हे. बरोबर पाहुणे आणतें आहें ह्मणून मी तार केली नव्हती कां ? ते हे !

**कांचन**०–हे पाहुणे होय ? आमची ओळख करून दे ना.

**संजी**०–हे आमच्या कॉलेजांत प्रोफेसर होते. यांनीं एक मोठा शोध लावला आहे अन् हे लवकरच जपानाला जाणार आहेत. यांचं नांव मोहन. ( कांचन व मोहन हस्तांदोलन करतात. ) मोहन, हे आमचे बाबा. यांच्याविषयीं आधींच तुम्हांला मी इतकं सांगितलं आहे, कीं आतां पुन्हां सांगितलं तर ह्मणाल—

**मोहन**०–( हंसून ) नको, नकोच सांगूस.

**कांचन**०–( स्वगत ) हं ? अग तूंगपर्यंत गेली आहे कां मजल प्रोफेसरसाहेबांची ?

**संजी**०–बाबा, मी तुमच्यावर फार फार रागावलें आहें बरं कां ! तुम्ही मोठ्या ह्यानं इथे यावं अन् तुम्ही आपलं खुशाल गुलबर्ग्याला चालावं ह्यावं काय ? बरं !

**कांचन**०–अग, त्याचं असं झालं, कोर्टाच्या कामासाठीं—

**संजी**०–हो हो, आहे माहित ! वकीलांना वाटतं, कीं कोर्टाची खबर सांगितली कीं अपीलच उरत नाहीं.

**कांचन**०–बरं, कोर्टापेक्षांही वरचा अधिकार तुझा म्हणायला मी तयार आहे. तूं सुनावशील ती शिक्षा—

**संजी**०–इश्श् ! असं नाहीं कांहीं. पण बाबा, मी यायच्या वेळीं तुम्ही इथें नसावं याचा मला विशेष राग कां आला माहित आहे ?

**कांचन**०–सांग.

**संजी**०–तुमच्यासाठीं मी एक जम्मत आणिली आहे, अन् बंगल्यांत पाऊल टाकतांच तुम्ही मला भेटाल अन् ती मी तुम्हांला देईन असे बेत मनाशीं करीत मी आलें.

**कांचन**०–पाहूं पाहूं तरी काय आणलं आहेस तें !

**संजी**०–( खिशांतून एक सुंदर सिगारेट केस काढून ) पाहिलंत ?

MODERN COLLEGE POONA 5.

कांचन०–ओहो ! सिगारेट केस !

मोहन०–आपल्याला खात्रीनं आवडेल असा डिझाइन मिळवायसाठीं हिच्याबरोबर किती हिंडावं लागलं विचारूंच नका. मला तर वाटतं अखेर हवी तशी केस मिळाली नसती तर इकडे यायचंसुद्धां हिनं रद्द केलं असतं !

कांचन०–होय ग ? शाबास ! येवढं काय अडलं होतं अगदीं ?

संजी०–वा ! आज तुमचा वाढदिवस म्हणून मुद्दाम आणली !

कांचन०–( दचकून स्वगत ) अरेरे ! संजीवनीनं तरी माझ्या वयाची आठवण मला आज करून द्यायला नको होती ! ( हंसत सिगारेट केस घेतो व त्यांतली सिगारेट काढून पेटवतो.) संजीवनी, थँक्स. तुझ्या प्रेमाची ही खूण मी अशी हृदयापाशीं सदा ठेवीन. अरे संभू ! ( संभू येतो ) हें बघ, खालीं पोर्चमध्यें उभा रहा. बिहारीलाल गाडी घेऊन येणार आहेत. ते आल्याबरोबर मला वर्दी दे. ( मोहन व संजीवनीकडे पाहून. ) You'll have to excuse me. मला रेसिडेन्सीवर खान्याला जायचं आहे हं !

संजी०–जा गडे ! सदा तुमची आपली घाई ! मी येवढी इतक्या दिवसांनीं आलें तरी—

कांचन०–रागावूं नकोस. आतां मुळीं मी असं करणार आहे, कीं तूं अन् मी दोघांनींच सारखं बोलत बसायचं !

संजी०–हं हं ! अशा गोड बोलण्यांनीं मी फसणार नाहीं कांहीं ! तुम्ही घटकाभरसुद्धां माझ्याशीं बोलल्या बसल्यावांचून निघालांत हें कांहीं–

कांचन०–हें आपलं भांडण उद्यां भांडूं सावकाश ! यांच्या देखत आपण अशीं भांडलों तर हे काय म्हणतील ? ( मोहनकडे पाहून ) हं, काय, आमचं शहर आवडलं कीं नाहीं तुम्हांला ?

मोहन०–अतिशय आवडलं. हा सुंदर बंगला आणि इथल्या साऱ्या माणसांचा गोड प्रेमळपणा पाहिल्याबरोबरच मुळीं माझी खात्री पटली, कीं या शहरांत सौंदर्य आणखी प्रेम याशिवाय दुसरं कांहीं दिसायचंच नाहीं.



कांचन०–तुम्हांला आमचं घर अन् गांव आवडलं हें बरं झालं. पुष्कळ दिवस रहाण्याचा आग्रह तुम्हांला करायला हरकत नाहीं. संजीवनीलाही परत जायची नेहमींसारखी या वेळेस कांहीं घाई नाहीं. तिचं शिक्षण पूर्ण झालं यांत मला केवढा आनंद होतो आहे तो कुणाला सांगून कळायचा नाहीं. संजीवनीच्या स्वतःच्या आनंदाला तर आज सीमाच नसेल. खरं ना ग ?

संजी०–सर्वस्वीं कांहीं खरं नाहीं. कारण, कॉलेजांतला अखेरचा दिवस संपवून घरीं परतणाऱ्या मुलाला किंवा मुलीला जितका आनंद तितका खेदही होत असतो. मनांत धरलेली महत्वाकांक्षा पुरी झाली म्हणून हर्ष होतो खरा, पण मनमोकळ्या खेळांचे, गंमतीच्या वादविवादांचे, अन् ईर्षेच्या अभ्यासाचे दिवस संपले म्हणून भारी वाईटही वाटतं.

**पद ५ वें**

( पहाडी : केरवा )

**मुलवी जिवाला पाठशाला ।**
**मधुकालींची सुखसीमा ॥ ध्रु० ॥**
**व्यासंगवांछा–निःशंक लीला–**
**–वादसाधना भर येतां जीव रमला ॥१॥**

मला तर कॉलेजच्या आठवणीचे सारे पाश तोडून दूर घरीं रहाणं जिवावरच आलं असतं.

कांचन०–आलं असतं ? म्हणजे पुन्हां मुंबईस कॉलेजांत जायचा बेत आहे कीं काय तुझा ?

संजी०–छे छे. पण ज्यांचा अन् कॉलेजचा सतत संबंध असणार अशांची जन्माची सोबत मिळायची आहे मला.

कांचन०–म्हणजे ? कळलं नाहीं मला.

संजी०–न समजणारा विषय छान समजून सांगायचं काम प्रोफेसरांचं ! हे सांगतील तुम्हांला. मी जरा खालीं जातें अन् सरबत

करायला सांगून येतें. पण बाबा, हे विचारतील त्याला होय म्हणायचं अं! नाहीं तर मी रागावेन, रुसेन, रडेन—( हंसते व निघून जाते. )

[ ती गेल्यावर कांचनराव आश्चर्यानें तिच्याकडे पहात रहातात व जरा वेळानें मान वळवून मोहनकडे पहातात; जणुं तिच्या त्या बोलण्याचा व वागण्याचा अर्थ त्यांनीं सांगितला पाहिजे असेंच त्यांना म्हणावयाचें असतें. ]

**मोहन**०–आपणाला आश्चर्य वाटणं साहजिक आहे. पण माझं मागणं ऐकल्यावर तें दूर होईल.

**कांचन**०–मागणं ? तुमचं मागणं ? कां बोलणं ?

**मोहन**०–बोलणं, मागणं, कांहीं म्हटलं तरी एकच. कारण मागायसाठींच मी बोलणार आहे.

**कांचन**०–माझं आश्चर्य नाहींस करायच्या ऐवजीं तुम्ही वाढवीतच आहांत.

**मोहन**०–त्याचं कारण इतकंच कीं गेल्या वर्ष दीडवर्षांत जी एक गोष्ट सुरूं झाली अन् वाढत गेली, अन् जी संजीवनीनं वास्तविक यापूर्वीच आपल्याला तोंडी अगर पत्रानं कळवायला हवी होती, ती अजून आपल्याला मुळींच माहित नाहीं.

**कांचन**०–कोणती गोष्ट ?

**मोहन**०–तिची माझी एकमेकांवरची प्रीति !

**कांचन**०–तुमची प्रीति ?— ( जणू आपल्याशींच पुटपुटत ) सुरूं झाली ?······अन् वाढली ?······

**मोहन**०–हो. इतकी वाढली कीं आतां आम्ही दोघं सर्वस्वीं एकमेकांचीं आहोंत.

**कांचन**०–लग्नाशिवायच ?

**मोहन**०–तें काय आपण मान्यता दिली, कीं लगेच होईल. ती मागण्यासाठींच मी संजीवनीबरोबर इथं आलों आहे.

**कांचन**०–उगीच आलांत.



**मोहन**०–असं कसं ? पत्रापेक्षां आपली गांठ घेऊन विचारणंच–

**कांचन**०–माझ्या बोलण्याचा अर्थ तुमच्या लक्षांत आला नाहीं. उगीच म्हणजे व्यर्थ आलांत असं माझं म्हणणं.

**मोहन**०–व्यर्थ ?

**कांचन**०–हो. तुमच्या मागणीला माझ्याकडून रुकार मिळणं शक्य नाहीं !

**मोहन**०–काय, ह्मणतां काय ? माझ्या योग्यतेबद्दल शंका––

**कांचन**०–छे छे! तुम्ही कुबेराहून श्रीमंत अन् बृहस्पतीहून विद्वान् असाल. पण जिचं लग्न मी आधींच मनानं ठरवलं आहे—

**मोहन**०–काय ? संजीवनीचं लग्न तुम्ही आपल्या मनानं आधींच ठरवलं आहे ?

[ संजीवनी प्रवेश करते. ]

**संजी**०–( दारांतून ) काय ? माझं लग्न, बाबा, तुम्ही आपल्या मनानं आधींच ठरवलं आहे ?

**कांचन**०–होय. संजीवनी हें तुला केव्हां एकदां सांगेनसं मला झालं होतं.

**संजी**०–काय ऐकतें मी हें ? अन् बाबा, माझी संमति ?

**कांचन**०–ती तुला द्यावी लागेल.

**संजी**०–( एकदम मोहनजवळ धांवत जाऊन आपले हात त्याच्या हातांत देऊन ) छे छे ! तें शक्य नाहीं !

**कांचन**०–या दुनियेंत अशक्य काय आहे ?

**संजी**०–म्हणजे आजपर्यंत जी प्रीति माझ्यावर दाखवलीत ती खोटीच म्हणायची !

[ संभू प्रवेश करतो. ]

**संभू**०–खालीं बिहारीलाल वाट पहाताहेत.

**कांचन**०–आलोंच म्हणून सांग. ( संभू जातो. ) संजीवनी माझ्या मनांत काय आहे तें मी तुला उद्यां सांगेन. ( मोहनला ) तोंपर्यं हिचा नाद सोडण्याची तुम्ही आपल्या मनाची तयारी करून ठेवा.

**मोहन**०–तुमच्या रुकारावांचून संजीवनी अडणार नाहीं हें पाह्यर्च तयारी तुम्हीच केलेली बरी.

**कांचन**०–उद्यां दिसेल काय तें ! ( जातो. )

[ पडदा. ]

**अंक पहिला समाप्त.**



कांचनगंगा:– [illegible] (अंक १, पृष्ठ ३०)

# अंक दुसरा

## प्रवेश १ ला

[ पहिल्या अंकांतल्या दिवसानंतर दुसऱ्या दिवशींची सकाळ. कांचनरावांच्या बंगल्यांत पोर्चजवळचा व्हरांडा. ]

काका०–(प्रवेश करून) बाजी! अरे बाजी! कुठें गेला आहे हा लहरी गडी कोणास ठाऊक! साहेब लोक यंत्रं पुरवतात तशीं वक्तशीर वागणारीं चाकरमाणसं पुरवतील तर फार बरं होईल! बाजी! ए बाजीऽ ऽ ऽ!

बाजी०–(धाईनें येऊन) आलों, आलों नाहीं कां......

काका०–अरे आठ वाजायला आले. ताई अन् पाहुणे औरंगाबाद पहायला जायचे आहेत ना! कालच ठरला नव्हता कां प्रोग्राम? रात्रीं तुला ताकीदसुद्धां दिली मीं कीं सकाळीं साडेसातला मोटार पोर्चमध्यें जय्यत तयार पाहिजे म्हणून! पण तुझी ढिलाई कधीं चुकायची नाहीं! आत्तां येतील पाहुणे अन् ताई जामानिमा करून खालीं, अन् तुझ्या मोटारीला ठिकाणही नाहीं! हं, आतां तरी पळ––

बाजी०–पण काकासाहेब, गाडी उगीचच काढून आणूं कां?

काका०–म्हणजे?

बाजी०–ताईसाहेब अन् पाहुणे जायचे नाहींत औरंगाबादेला. त्यांनीं बेत रहित केला आहे!

काका०–खरं?

बाजी०–काल रात्रीं निजायच्या आधीं म्हटलं, उद्यां जरा लांबची मजल मारायची आहे तेव्हां गाडी खोलून साफसूफ करावी. पण तित-

ऱ्यांत संभ्या आला अन् म्हणाला ताईसाहेबांनीं सांगितलं आहे कीं पाव्हण्यांची नाहीं इच्छा औरंगाबाद पाह्यची, तेव्हां गाडीची जरूर नाहीं उद्यां.

**काका**०–असं? पाव्हण्यांची इच्छा नाहीं? पण काल तर त्यांनींच फार उत्सुकता दाखवली म्हणून बेत केला ताईनीं! त्यांची हौस एकदम कशी नाहींशी झाली बुवा?

**बाजी**०–संभ्या सांगत होता, कीं काल संध्याकाळीं मालकांचा अन् पाव्हण्यांचा कांहीं तरी खटका झाला असावा—

**काका**०–बाज्या! नोकरांनीं असल्या उठाठेवी केलेल्या अन् तर्क लढवलेले मला खपत नाहींत विसरलास वाटतं? संभ्या तुला असं म्हणाला? आडून लोकांचीं बोलणीं ऐकायची त्याची संवय जात नाहीं म्हणायची! त्याचा कान पिळला पाहिजे चांगला! बरं, तूं जा. पण तबेला सोडून जाऊं नकोस कुठं. औरंगाबादचा बेत रद्द झाला असला तरी ताईना किंवा पाहुण्यांना गाडी केव्हां लागेल नेम नाहीं!

**बाजी**०–आहे ध्यानांत. कुठं जात नाहीं तबेला सोडून (स्वगत) हौशी जिथं भेटेल तिथेंच माझा तबेला समजा म्हणजे झालं! (जातो.)

**काका**०–(स्वगत) मोहनरावांचा अन् मालकांचा खटका? हं:! कांहीं तरीच! पण औरंगाबादचा बेत कां फिरावा कांहीं कळत नाहीं!

[ टॉवेलनें झांकलेला चहाचा ट्रे घेऊन संभू प्रवेश करतो. ]

**काका**०–काय रे पाहुणे उठले ना? त्यांच्या चहाची व्यवस्था चोख ठेवली होतीस ना?

**संभू**०–ठेवली होती, पण तिचं चीज झालं असतं म्हणजे बरं वाटलं असतं.

**काका**०–म्हणजे?

**संभू**०–पाव्हण्यांच्या खोलींत चहाचं टेबल लावून मी किती वेळ उभा राहिलों पण त्यांचं मुळीं लक्षच जाईना चहाकडे. खिडकीशीं आपल्याच विचारांत उभे! शेवटीं मी जवळ जाऊन सांगितलं. पण



पाहून त्यांचे मला चहाविही कांहीं नको. मग मी कांहीं वेळ थांबलों अन् अखेर नाइलाजानं हें सामान घेऊन परत आलों!

**काका**०–चमत्कारच आहे म्हणायचा! बरं तूं जा. (तो जाऊं लागतो) पण जरा थांब पाहूं. काय रे संभू, आडून लोकांचीं बोलणीं ऐकण्याची संवय टाकायची आहे कीं नाहीं बऱ्या बोलानं?

**संभू**०–(गोंधळून) कधीं...अं...मी कधीं ऐकलं आत्तां आपण अन् बाजी काय बोलत होतां तें? अं...शपथ नाहीं.

**काका**०–(हंसून स्वगत) आतां या खुळ्यापुढे हंसावं कां रडावं? (उघड) मूर्खा, मग मी अन् बाजी बोलत होतों हें तरी कसं कळलं रे तुला!

**संभू**०–अं...अं...आपल्याला...शपथ नाहीं. शपथ.

**काका**०–हं पुरे पुरे. जा. पण लक्षांत ठेव, तुझी ही खोड पुन्हा दिसली तर मालकांच्या कानावर घालीन हं!

**संभू**०–खरंच नाहीं...अं...शपथ नाहीं. (जातो.)

**काका**०–(स्वगत) मोहनरावांनीं चहा कां नाहीं घेतला? काय बिनसलं आहे कांहीं कळत नाहीं! पाहिलं पाहिजे. (जातो.)

[ पडदा उघडतो. ]

## प्रवेश २ रा.

[ एका भव्य खोलींत मोहन अस्वस्थपणें येरझारा घालीत आहे. एका कोपऱ्यांतल्या ठेंगण्या टेबलावरच्या फुलदाणींत फुलांचा गुच्छ नीट ठेवण्यांत खंडूजी गुंतला आहे. ]

**मोहन०**–(स्वगत) चोवीस तासांपूर्वीं हा बंगला मला जितका रमणीय वाटत होता तितकाच त्याचा आतां तिटकारा आला आहे. कांचनरावांनीं काल आमच्या प्रेमाचा जो उपमर्द केला, त्याला वास्तविक पाहतां, मी अन् संजीवनीनं मिळून मुंबईस निघून जाणं हें एकच योग्य उत्तर आहे. त्यांचं मन वळविण्याची संजीवनीची आशा वेडीच नव्हे कां ?–– मला तर आतां इथं काढावा लागणारा एकेक पळ दुःसह वाटतो आहे !

### पद ६ वें.

(काफीः त्रिताल.)

**या सदना सौख्यविहीना ।**
**मन पुरें विटलें वना विजना ॥ ध्रु० ॥**
**जाहली वश अंगना ।**
**रंजवी मधुकामना ।**
**मन रुचिरसुखगणनिं अधिर भारि**
**करि ललना ॥ १ ॥**

[ फुलदाणींत गुच्छ ठेवून झाल्यावर बरीचशीं सुटीं फुलें ओंजळींत घेऊन खंडूजी मोहनजवळ येतो व त्यास अदबीनें फुलें देऊन मुजरा करतो. ]

**मोहन०**–तूं या बंगल्याचा माळी वाटतं ?

**खंडू०**–हां, हाये आपला मोडका तोडका माळी. अलीकुडच्या फ्येशनवाल्या गार्डनी सजवनाऱ्या गाडन्येरावानी इलायती झाडाझुडपाची मशागत काय ठांव न्हाइ आपल्याला ! पर खरं सांगूं ? साह्यबाची बाग अन् साह्यबाची मडम–दोनी सारख्याच ! निसता रंगाचा भपका ! दम न्हाई ! बिनवासाच्या दिखाऊ बगीच्याला घेऊन करायचं काय साहेब ? आमच्या मालकास्नी तरी न्हाई असल्या साह्यबी बगीच्याचा शोक ! म्हून त्येनीं ठिवलाया या म्हाताऱ्याला अजून नोकरीवर ! बगा तरी साहेब माझ्या या गांवठी गुलाबाचा वास !



**मोहन०**–(स्वगत) इथलीं हीं सुवासिक फुलंसुद्धां मला नकोशींच वाटताहेत.

**खंडू०**–बगा ना वास साहेब. भारी मेहनत करूनश्यान काढल व्हती ह्ये गुलाब.

**मोहन०**–मला पडसं झालं आहे रे. वासच समजेनासा झाला आहे कसलासुद्धां.

**खंडू०**–झोंप ठीक लागली नव्हती जनू ?...

**मोहन०**–(स्वगत) या बंगल्यांत आतां कुठली झोंप ! (उघड) नाहीं, झोंप लागली होती.

**खंडू०**–मग पहाटला गार झुळुक सुटली व्हती ती तर न्हाई बाधली सायबासनी.

[ तितक्यांत काका प्रवेश करतात. त्यांस पाहून खंडूजी निघून जातो. ]

**काका०**–औरंगाबादची सफर रद्द केली वाटतं ? अं......गेला असतां तर फार बरं झालं असतं. पहाण्यासारखं आहे ठिकाण.

**मोहन०**–हो पण त्याचं असं झालं, संजीवनीचं कांहींतरी काम दिसतं आहे कांचनरावांशीं. तेव्हां म्हटलं तें एकदां होऊन जाऊं दे आज अन् मगच जाऊं कुठं ट्रिपला जायचं तें.

**काका०**–संभू म्हणत होता, कीं आपण चहा घेतला नाहीं !

**मोहन०**–घेऊं मग जरा वेळानं !

**काका०**–झोंप छान लागली होती ना ?

**मोहन०**–अं...हो !

**काका०**–(वर्तमानपत्राचा अंक देत ) हा इथला ताजा पेपर.

**मोहन०**–असं कां ? (पत्र हातीं घेतो पण न उघडतां तसेंच ठेवतो.)

**काका०**–आतां या पेपरमध्यें लवकरच आपला अन् ताईचा जोडप्याचा फोटो येणार !

**मोहन०**–उंः! त्यांत काय मोठंसं! (वर्तमानपत्र उलगडून त्यांत तोंड लपवितो.)

**काका०**–(स्वगत) स्वारी नाराज आहे यांत तर शंकाच नाहीं. प्रेमकलह तर नाहीं झाला ताईशीं ? ही तरुण मंडळी घटकेंत मेतकूट करतील अन् घटकेंत भांडतील! (उघड) खंडूजीला माझी ताकीद आहे, कीं आपल्या खोलींत देशी गुलाबाचे ताजे गेंद नेहमीं दिसले पाहिजेत. मुंबईच्या माणसांना गुलाबाचा फार षोक असतो म्हणतात. आपल्याला आहे ना ?

**मोहन०**–आं......हो, आहे कीं !

**काका०**–कुणीही पाहुणा या बंगल्यांत आला, कीं त्याची सारी व्यवस्था चोख राहिली पाहिजे अशी मालकांची मला नेहमींची सांगी असते. आपली सरबराई तर आम्हांला मोठ्या दक्षतेनं ठेवली पाहिजे. कारण, आपण म्हटलं तर पाहुणे, नाहीं तर जामात–म्हणजे मालकांच्या पेक्षांसुद्धां वरचेच ! मी म्हणतों तें खरं कीं नाहीं ?

**मोहन०**–(जणूं स्वगत विचारांतून जागें होऊन) काय हो काका-साहेब, तुमचे कांचनराव मोठे हटवादी आहेत काय ?

**काका०**–नाहींत......अं......आहेत. पण आपण असं कां विचारलं ?

**मोहन०**–कांहीं नाहीं; सहज. आणखी तुमची संजीवनीही हट-वादी आहे काय ?

**काका०**–ताई म्हणतां होय ? तिच्या हट्टापुढें ब्रह्मदेवालासुद्धां वांकावं लागेल. पण ताई आतां आमची कुठली ? तुमचीच म्हटली पाहिजे, नाहीं कां ?

**मोहन०**–हो हो; म्हणूनच आपली चवकशी करून ठेवतों.

**काका०**–अजून चवकशीचं प्रयोजन आहे ? मला नाहीं खरं वाटत. पण माझ्यापासून माहिती हवीच असली तर ऐका. आमच्या



ताईसारखं रूप अन् प्रेमळ स्वभाव जसा कुठं मिळणार नाहीं तशीच तिच्यासारखी हट्टी, आग्रही, लहरी, छांदिष्ट मुलगी—

**संजीवनी०**–(प्रवेश करून) ऐकलं ऐकलं बरं काका मीं सगळं! माझ्या पाठीमागं माझी निंदा चालली आहे काय ? छान! आमच्या बेतांत मोडता घालायचा बेत दिसतो आहे तुम्हां सगळ्यांचा.

**काका०**–सगळ्यांचा ? म्हणजे, माझ्याखेरीज आणखी कोण ?

**संजी०**–(चपापून जीभ चावते.) आणखी कुठलं कोण, माझ्या आपलं सहज तोंडांत आलं. बरं काका, मंदाच्या घरीं एक निरोप पाठवायला पाहिजे बरं का. आजचा औरंगाबादचा बेत रद्द झाला आहे तें तिला कळवायला पाहिजे. नाहीं तर ती बसेल वाट बघत.

**काका०**–समजलों, तुमच्या एकांतांत माझी अडचण होत असेल ती दूर करायची ही युक्ति आहे!

**संजी०**–अशानं मी बोलायची नाहीं हं तुमच्याशीं!

**काका०**–अग रागावूं नकोस. बाजीलाच धाडतों मंदाकडे मोटार घेऊन म्हणजे झालं. (जातो.)

**संजी०**–चहासुद्धां घेतला नाहींत म्हणे ? अन् खुशाल झोंपे-वांचून रात्र काढलेली दिसते आहे! हें काय बरं ?

**मोहन०**–संजीवनी, तुला काल सांगितलं तेंच पुन्हां सांगतों, आपण दोघं या बंगल्यातनं बाहेर पडूं तेव्हांच माझ्या जिवाला बरं वाटेल. कांचनरावांची समजूत घालायचा एकदां प्रयत्न करावा असं तुला वाटतं आहे तें वावगं नाहीं; पण आपल्या लग्नाला कांचनरावांचा विरोध आहे हें एकदां समजल्यावर त्यांच्या घरांत पाहुणा म्हणून रहाणं मला अवघड वाटावं हेंही तुला समजलं पाहिजे. तुला दुखवायचं नाहीं म्हणून, नाहीं तर कांचनरावांची समजूत घालायला तुला इथं सोडून आजच्या आज मुंबईस जावं असं माझ्या फार फार मनांत येतं. खरंच, जातों मी!

संजी०–आजपर्यंत तुमच्या पुष्कळ लहरी पाहिल्या. पण ही लहर अजबच आहे!

मोहन०–संजीवनी, ही लहर नव्हे, रात्रभर जागून केलेला हा विचार आहे!

संजी०–पण इतका त्रागा कशासाठीं?

मोहन०–तूं हें विचारावंस? आश्चर्य आहे. संजीवनी, तुझ्यावरचं माझं प्रेम अमर्याद आहे, अन् म्हणून तें कदाचित् अविचारीही असेल. पण आपल्या लग्नाला कुणी नकार द्यावा हें कल्पनेंत सुद्धां मला सहन व्हायचं नाहीं. तुझ्या प्रत्यक्ष पित्यानं तो दिला असता तरी तो मला खपला नसता. मग कांचनराव तर काय तुझा मानलेला पिता!

संजी०–इश्श! पण बाबांनीं नकार दिला असला तरी मानलाय कुणी? काल बाबांचं तें बोलणं ऐकतांच मलासुद्धां एकदम राग आला खरा, पण नंतर माझं मलाच वाटायला लागलं, कीं असं रागावण्यांत काय अर्थ? त्यांचं म्हणणं काय आहे तें तर ऐकलं पाहिजे!

मोहन०–हो, हो, खरंच. त्याचा काय नेम, कांचनरावांनीं असा एखादा फक्कड, श्रीमंत मुलगा काढला असेल शोधून कीं ज्याच्यापुढं माझं रूपाचं अन् पैशाचं दुबळेपण केविलवाणं वाटेल! ज्यास्ती चांगला सवदा होत असेल तर—

संजी०–हं, हं! महाराज चेष्टा वाहवायला लागली हं! अशानं– (आवाज रडवा करते.)

मोह०–अरे अरे! माफ कर अं! खरंच मला वाटतं अतिप्रेमाच्या पोटीं अतिअसूया येते! तूं कांचनरावांच्या तोंडून दुसऱ्या पुरुषाचं नांव ऐकावंस ही कल्पनासुद्धां मला असह्य होते.

संजी०–कमाल आहे बाई! बायकांपेक्षां पुरुषच अधिक मत्सरी असतात तर!



पद ७ वें.

(बिहागः त्रिताल)

कां हिणवितां अम्हां अबलांना ?।
सबलता मनिं कांहिं दिसेना ॥ ध्रु० ॥
हंसतां खुलतां जरि रिझवीतां ।
धरितां रुसवा शंकुनीया ।
कोप नारिसारखा ॥ १ ॥

पण गडे, बाबांचं म्हणणं एकदां ऐकणं माझं कर्तव्य नाहीं कां? त्यांनीं माझ्या लग्नाची कांहीं योजना केली असली तर तें साहजिक नाहीं का? त्यांना काय माहित तुमचं अन् माझं कांहीं ठरलं आहे तें?—आपण चोरून प्रेम करावं कशाला?

मोह०–मी मुळींच चोरून प्रेम केलेलं नाहीं. कांचनरावांच्यापासून सारा बेत लपवून ठेवण्याची कल्पना तुझीच.

संजी०–मला त्यांची गंमत करायची होती जराशी.

मोह०–पण ती गंमत आतां अंगचटीस आली ना?

संजी०--अंगचटीस कसली? तुम्ही उगीचच राईचा पर्वत करतां आहांत. मी बाबांना एकदां भेटलें अन् सगळं समजावून सांगितलं कीं ते आपल्या लग्नाला रुकार देतात कीं नाहीं पहा.

मोहन०–पण मी म्हणतों, तूं कांचनरावांचीं आर्जवं काय म्हणून करायचीं? त्यापेक्षां मीच त्यांची भेट घेतों, अन् त्यांना सांगतों, त्यांच्या नकाराची पर्वा न करतां—

संजी०--वा, भलतंच! मघांशीं म्हणालांत त्याप्रमाणं अविचार करण्याइतके प्रेमानं वेडे झाला आहांत खरे! पण प्रेम अमर्याद आहे हें सिद्ध करायला अविचार केलाच पाहिजे असं नाहीं कांहीं. बाबांच्या नकाराबद्दल अगदीं फिकीर करूं नका.

संभू०–(प्रवेश करून) ताईसाहेब, मालक म्हणाले आपण खोलींत आहांत कां पाहून ये. आपल्याशीं त्यांना कांहीं बोलायचं आहे.

संजी०—मी आहे, या म्हणून सांग. (संभू जातो.) (मोहनकडे पाहून) जाऊं द्या मला माझ्या खोलींत. आतां बघा हं, बाबांची समजूत घालून त्यांचा रुकार मिळवून येतें कीं नाहीं.

मोहन०—तशी आलीस तर उत्तमच. पण, नाहीं तर कांचनरावांच्या डोळ्यांदेखत तुला अशी धरून नेणार हें खास.

संजी०—त्याला माझी कुठं ना आहे? प्रेमपाशांत सांपडलेल्या स्त्रीचं पुरुषाजवळ नेहमीं काय मागणं असतं ऐका—

पद ८ वें.
( झिंजोटी : धुमाळी )

कुरबान केला । दिल् भोळा ।
गुणराजसा, बाला हृदयिं धरा झणिं, आलबेला ॥ ध्रु० ॥
दिल्बाग हा बहरावला । मनिं रंगली प्रीतीची लीला।
दिल्दार घ्या पदरीं जिवाला ॥१॥


[ जाते. ]

मोहन०—(स्वगत) कां कोणास ठाऊक, पण या वेळीं असं मनांत येतं कीं कांचनरावांनीं संमति देण्यापेक्षां दिली नाहीं, अन् त्यांना न जुमानतां संजीवनीला घेऊन जायची वेळ आली तरच छान होईल! वल्लभेचं बलात्कारानं हरण करण्यांत विशेष आनंद नाहीं का?

पद ९ वें.
( अडाणा : त्रिताल )

प्रिया केवि सुजनातें मोहविते नाचवीते ।
समरचि त्यातें रंजवीतें ॥ ध्रु० ॥
प्रेमल बाला जिंकुनि नेतां । हृदय फुलत सौख्यभारें ॥१॥

[ पडदा. ]



## प्रवेश ३ रा.

[ एका बाजूनें हौशा व दुसऱ्या बाजूनें बाजी प्रवेश करतात. त्यांची मधोमध गांठ पडते. ]

**बाजी॰**–कोण ? हौशे ? बरं झालं भेटलीस. सकाळपासून तूं केव्हां भेटशीलसं झालं आहे.

**हौशा॰**–तुझं सदा बरं कांहीं तरी काम असतं माझ्याशीं. अशानं तुझं नोकरीकडं दुर्लक्ष मात्र होत आहे हं बाजी.

**बाजी॰**–अग, जवानींत नोकरीची फिकीर नाहींच वाटत माणसाला तितकीशी. पैशापेक्षां प्रीतीचीच व्यवस्था लावायसाठीं माणूस अधिक उतावळं झालेलं असतं. नोकरीची हौस काय कशीही करतां येईल, पण हौशीची नोकरी करायला मिळायची ती तूं करून दिलीस तरच.

**हौशा॰**–अरे वा बाजी, बऱ्याच कोट्या करून बोलायला शिकला आहेस कीं !

**बाजी॰**–अग त्याचं असं आहे, एखाद्या तरण्या ताठ्या मुलीवर लक्ष गेलं कीं कोटीमागून कोटी आपोआप सुचते.

**हौशा॰**–अस्सं. एकूण सध्यां तुझं लक्ष ठिकाणावर नाहीं तर.

**बाजी॰**–वा, वा ! या वयांत असावं त्या ठिकाणावर आहे म्हण.

**हौशा॰**–बरं तसं म्हणूं. पण बाजी तूं आपल्या लक्षाचा मुद्देमाल जिथं ठेवतो आहेस तिथं त्याची कांहीं परतफेड होते आहे कीं नाहीं ?

**बाजी॰**–तें सारं तुझ्या हातीं आहे बघ.

**हौशा॰**–म्हणजे काय बाई ?

**बाजी॰**–हौशे, उगीच वेड पांघरण्यांत काय अर्थ आहे ? माझं प्रेम तुला कळत नाहीं असं किती दिवस दाखविणार तूं ?

**हौशा॰**–( स्वगत ) आज सरळ हल्ला होणारसं दिसतंय. हा मुगा एकदां संपवलाच पाहिजे. ( विचार करून. ) ठीक, असंच करावं.

बाजी०–हौशे, खरं सांग, तुला माझ्याविषयीं आजपर्यंत कधीं कांहींच वाटलं नाहीं? निदान कालचं तें औषध घेतल्यावर आज तरी कांहीं वाटायला लागलं आहे कीं नाहीं?

हौशा०–म्हणजे असलं कां होतं तें औषध? काय लबाड आहेस रे! तरी मला वाटलंच त्यांत कांहीं तरी गडबड असली पाहिजे म्हणून!

बाजी०–(हंसून) अन् तसं वाटूनसुद्धां घेतलंस ना? मग झालं–समजलं मला जें समजायला हवं तें!

हौशा०–इश्श्! काय समजायला हवं होतं? अन् काय समजलं!

बाजी०–हेंच, कीं बायका वरवर दाखवतात तेवढ्यावर जाऊन उपयोग नाहीं!

पद १० वें.

(गझल.)

वरि दावितसां सारा । नखरा तो असे न खरा ।
लाजून "नको" म्हणतां । दिल् खूष खरा असता ॥
हा नारिचा बहाणा । गुल्ज़ारसा इशारा ।
दिल्रंग मजा मीठा । मर्दासि बडा प्यारा ॥ १ ॥

तूं मारे माझ्याकडं लक्षही न दिल्यासारखं दाखवीत होतीस—पण खरं सांग, तुला माझ्याबद्दल कधीं कांहीं वाटत नव्हतं?

हौशा०–तसं म्हटलं तर पुष्कळच वाटत होतं! (स्वगत) नकोसं वाटणं म्हणजे तरी वाटणंच कीं नाहीं?

बाजी०–तेंच म्हणतों मी! अन् कालचं औषध घेतल्यावर तर तें वाटणं खूपच वाढलं कीं नाहीं? अं?

हौशा०–अरे घ्यायची गोष्ट दूरच राहूं दे, तें तूं माझ्या हातीं दिलंस त्या क्षणापासूनच मुळीं तुझ्यावांचून–(स्वगत) तुझ्या प्रेमाचा त्रास कसा चुकवावा या विचारावांचून—(उघड) दुसरा विचारच सुचेना!—

बाजी०–खरं म्हणतेस? (स्वगत) जय मांत्रिकबाबा!



हौशा०–झोंपसुद्धां धड आली नाहीं. सारखी तुझी आठवण होई. (स्वगत) अन् वाटे, आतां या मेल्याच्या प्रेमाचं प्रकरण संपवलंच पाहिजे कांहीं तरी युक्ति करून! (उघड) नजरेपुढं पुन्हां पुन्हां तुझी मूर्ति उभी राही! (स्वगत) अन् वाटे या ध्यानाच्या आचरटपणाला म्हणावं तरी काय? (उघड) जिवाला असं झालं कीं तूं केव्हां एकदां भेटतील!— (स्वगत) अन् तुझा कान पकडून तुझे डोळे उघडायला मिळतील!

बाजी०–अहाहा हौशे! काय गोड बोललीस! तुझं हे बोलणं ऐकून जिवाला असं वाटतं आहे, कीं आठ सिलिंडरच्या रोल्सरॉइसमधें बसून साठ मैलांच्या स्पीडनं दस्तुऱ्या चुकवीत निघालों आहे अस्मानांत! हौशे, मग आतां सरळ सांगत कां नाहींस, माझ्या प्रेमाचा स्वीकार केला आहे म्हणून?

हौशा०–सांगितलं असतं रे पण—

बाजी०–छे छे हौशे, तो घातकी 'पण' शब्द उच्चारूं नकोस. तो ऐकल्याबरोबर गाडींतलं पेट्रोल सरावं अन् दोन मैलाच्या टापूंत पेट्रोलची बाकी नसल्यावर वाटावं तसं वाटायला लागलं बघ! घे, घे परत तो अपशकुनी शब्द.

हौशा०–अरे परत कसा घेतां येईल?

बाजी०–कां? चांगली सांगते आहेस माझा निदिध्यास लागला आहे म्हणून, आणखी मग—

हौशा०–अरे होय, लागला आहे निदिध्यास. पण तो तुझा एकट्याचाच नाहीं.

बाजी०–म्हणजे काय?

हौशा०–अरे, त्याचं असं झालं, तूं मला औषध दिलं होतंस ना, आणखीन दुसऱ्या एकाचं औषधही मला घ्यावं लागलं आहे, अन् त्याचा परिणामही तसाच झाला आहे. त्यामुळं तुझा आणि त्या माणसाचा—असा दुहेरी ध्यास मला लागला आहे. तुझी मूर्ती डोळ्यापुढं उभी

राहते खरी, पण अधूनमधून त्याचाही चेहरा त्यांत मिसळतो; आणखी हें दुतोंडी प्रेम दत्त म्हणून माझ्यापुढं येऊन उभं राहिलं, कीं माझी स्थिति भ्रमिष्टासारखी होते. तुझा विचार मनांत येतो, पण त्यांतच त्या माणसाबद्दलचे विचार दाटी करून घुसतात. तुझ्या भेटीची इच्छा होते, पण तिच्यांतच त्याच्या भेटीची इच्छाही सामील झाल्यासारखी वाटते. त्या दुसऱ्या माणसाचा हा नसता त्रास जर माझ्यामागं लागलेला नसता, तर बाजी, खचित या वेळीं मी तुला सांगितलं असतं तुझं प्रेम स्वीकारलं म्हणून.

बाजी०--अस्सं. एकूण माझ्याकडे ओढ घेऊं लागणाऱ्या तुझ्या मनाला खेंचणारा दुसरा एक दावेदार आहे म्हणायचा ! हौशे, त्याचं नांव सांग म्हणजे--

हौशा०--छे बाई. त्याचं नांव नका विचारूं. मी नाहीं सांगणार.

बाजी०--अग माझं नांव घ्यायला लाजलीस तर मला हवं आहे. तों त्या उपट सुंभ्याचं नांव घ्यायला लाजते आहेस ?

हौशा०--अहो लाजत नाहीं. पण नांव नाहीं सांगणार.

बाजी०--असं छळूं नकोस मला. अग सुरळीत चालणाऱ्या माझ्या प्रेमाच्या गाडीला पंक्चर करणारा हा कांटा दूर केल्याशिवाय मला चैन पडणं शक्य तरी आहे कां ? हं, सांग नांव. आटप.

हौशा०--अं हं !

बाजी०--निदान खाणाखुणा तरी सांग त्याच्या. उंच आहे कां ठेंगणा आहे ? कोऱ्या करकरीत प्रायव्हेट गाडीसारखा देखणा आहे, कां जुन्या, खिळखिळित सर्विस गाडीसारखा ओंगळ आहे ? भरल्या टायरसारखा टुमटुमित आहे, कां शंभरदां व्हल्कनाइझ करून अखेर टाकलेल्या इनरसारखा सपाट वायफळ आहे ? --अग, हंसतेस काय नुसती ? थोडं तरी वर्णन सांग.

हौशा०--अं हं !



बाजी०--आतां काय करावं तुझ्या हट्टाला ? बोल ! घाटांतल्या बिकट वळणाखालीं सेकंड, फर्स्ट, सगळ्या स्पीडवर घालून पाहिलं तरी अडून राहणाऱ्या गाडीसारखी अडूं नकोस ! माझ्या प्रेमाच्या उद्योगांत भागीदारीचं संकट आणणाऱ्या या अगांतुकाची मानगुट धरून त्याच्या डोक्यांत एक भला मोठा पान्हा घातल्याशिवाय माझ्या जिवाला चैन नाहीं पडायचं आतां !

हौशा०--येवढंच ना ? --मग त्याला त्याचं नांव तरी कशाला, अन् वर्णन तरी कशाला हवं आहे ?

बाजी०--तर ?

हौशा०--त्याची तुझी गांठच घालून देतें म्हणजे झालं.

बाजी०--कुठं ? केव्हां ? सांग.

हौशा०--तें सगळं नीट ठरवून सांगतें तुला मग येऊन.

[ संभू प्रवेश करतो. ]

संभू०--अरे बाजी, तुला सोधायचा तरी कुठे कुठे ?

बाजी०--इतर वाटेल तिथं सोधायचं होतंस, पण या वेळीं इथं यायचं नव्हतंस माझ्या भाऊ ! ( स्वगत ) किती वेळ आड उभा होता हा संभू महादेव, अन् आमचीं काय काय बोलणीं पडलीं आहेत याच्या कानीं कोणास ठाऊक ! काकासाहेबांनीं नीट पिळले नाहींत वाटतं कान स्वारीचे ! ( उघड ) हं, बरं बोल, कां सोधित आलास मला ?

संभू०--काका बोलावताहेत तुला ताबडतोब. गाडी घेऊन जायचं आहे मंदाकिनीबाईंच्याकडे. निरोप आहे कांहीं तरी ताईसाहेबांचा.

बाजी०--(स्वगत) च् ! असं वाटतं अशा वेळीं कीं--(उघड) बरं, हो तूं पुढं. इथं आड उभा राहिलास तर खबरदार हं ! आलोंच मी. ( संभू जातो. ) हौशे, सांग हं मला येऊन. आत्तां गेलंच पाहिजे मला. पण हौशे, जाण्यापूर्वीं एकदां खरं सांग मला, तुझा जीव माझ्यावर जडला आहे ना ?

हौशा०–अरे, हें काय विचारतोस? जीव हैराण झाला आहे म्हणून तर तुझी अन् त्या दुसऱ्या माणसाची गांठभेट घालणार आहे मी!

बाजी०–तरी माझी हौशा! (जातो.)

[ हौशा दुसऱ्या बाजूनं जावयास निघते तोंच त्या बाजूनं खंडूजी येतो. ]

हौशा०–(हंसून) कोण, खंडूजी ? बरं झालं बाई भेटलां ! तुमचीच आठवण काढली होती.

खंडू०–(आनंदानें) माझी ? हौशे, माझी याद केली व्हतीस ? (स्वगत) पुडी लागू झाली जनू ! जय मांत्रिक बाबा ! (उघड) तूं कां याद करीत व्हतीस माझी माहित हाय मला !

हौशा०–मोठे मनकवडेच कीं नाहीं तुम्ही. मी न सांगतां ओळखलंत ?

खंडू०–हा, तर.

हौशा०–मग बरंच झालं म्हणायचं! मी जातें तर.

खंडू–जातीस? अन् मला असा एकट्याला सोडूनच? मंग ज्या कामासाठीं माझी याद केलीस तें व्हायचं कसं?

हौशा०–म्हणजे? माझं कसलं काम होतं असं समजलांत तुम्ही?

खंडू०–त्ये काय असं तोंडानं सांगायसारखं हाय व्हय? तूं भेटलीस त्याबराबर तुझ्या मनांत काय हाये त्यें म्या वळाकलं, अन् म्यां वळाकलं ह्ये तूंबी वळाकलंस ! दाटून न्हाई म्हनू नगस.

हौशा०– इश्श! तुमचा कांहीं तरी गैरसमज झालेला दिसतो आहे.

खंडू०–गैरसमज? तूंबी समजलीस ज्ये समजाया व्हावं त्ये, अन् मीबी समाजलों ज्ये समजायचं त्ये ! अन् मंग आतां त्यांत गैर त्ये काय राहिलं बुवा? चांगली चक्क सांगतियास माझी याद करीत व्हतीस म्हून. अन् तरीबी माझ्या समजाला गैरसमज म्हन्तीस? हौशे, बास कर ना आतां ह्या हुलकावन्या, अन् शपथ खाऊन सांग, माझी याद



तुला हमेश होतीया कां नाय? निदानीला कालचं त्यें अवशद खाल्ल्यापरनं लई व्हायला लागलीया का नाय?

हौशा०–अहो तेंच तुम्हाला विचारावं म्हणून तुमची आठवण केली. काय, होतं तरी काय त्या पुडींत ?

खंडू०–काय कां असना ? पुडी लई गुनाची व्हती यवढं खास ! ती खाल्ल्यापासनं आतां खंडूजी कवा भेटल असं तुला झालं ना ?

हौशा०–हो, तसं झालं हो. पण मनांत आलं खंडूजीना एकदां विचारावं, असल्या या भानगडी म्हातारपणीं कशाला सुचतात तुम्हांला ?

खंडू०–(हंसून) बरं झालं इच्यारलंस. मला व्हताच संशय, कीं माझ्या म्हातारपनाकडे बगून तूं जरा बाचकत असशील. हौशे, इष्काचा अन् उमरीचा काय हिसाब ठरलला न्हाई बग ! पिर्ती काय जवानींत सुचल तशीच म्हातारपनीबी सुचल. यवढच न्हाई तर जवानाच्या पिर्तीपेक्षां माझ्यासारख्या म्हाताऱ्याच्या पिर्तीत लई गंमत असती बग. शहानी आवा पोरसवद्या तरन्याच्या प्रेमापेक्षां म्हाताऱ्याचंच प्रेम पसंत करती. अनुभवानं मुरलेल्या प्रेमाची लज्जत काय न्यारीच असती ! तवा माझ्या वयाकडं पाहुनशान बिचकायचं काही कारन न्हाई बग. तुझं मन माझ्याकडे धांव घ्यायला लागलंय ना ? माझी याद तुला व्हतीया ना? बास ! झालं तर!

हौशा०–अहो, पण त्यांत थोडा घोटाळा झाला आहे हो.

खंडू०–घोटाळा ? म्हंजी कसं म्हनतीस ?

हौशा०–अहो, तुमच्यासारखंच दुसऱ्या एका माणसानंही मला एक औषध खायला लावलं, अन् त्याचाही गुण तुमच्या औषधासारखाच झाला. त्यामुळं तुमची अन् त्या माणसाची दोघांची सरमिसळ आठवण होती आहे मला सारखी. यापूर्वी एकाही माणसावर मीं प्रेम केलं नव्हतं, अन् आतां एकदम दोन माणसांकडे माझं मन धांव घेऊं लागल्यामुळं मी अगदीं गोंधळून गेलें आहे !

खंडू०–खरं सांगतियास ह्ये तूं हौशे ? माझ्या पिर्तीच्या रोपट्यावर आपल्या पिर्तीचं कलम बांधनारा दुसरा कुनी तुला भेटला हये म्हन-

त्येस ? बागायतीमंदी कलमी झाडांची मला कितीबी हौस असली तरी माझ्या हौशीवरच्या पिर्तींत दुसऱ्याच्या पिर्तीचं कलम खपायचं नाहीं मला ! सांग, कुनी दुसऱ्यानं अवशद दिलं तुला ? सांग त्येचं नांव.

हौशा०–अं हं. नांव नाहीं सांगायची.

खंडू०–वा ! मंग मी त्येचा बंदोबस्त करायचा कसा ? निदानीला यवढं तरी सांग त्यो काळा हाय, कां गोरा हाय ? पपईच्या झाडावानी उच हाय, का मोगऱ्याच्या झुडपापरमानं ठेंगनाठुसका हाय ?—अग निस्ती हंसतीस काय ? माझ्या पिर्तीच्या वाफ्यांत आपलं बी टाकनाऱ्या या अगांतुकाची मानगुट धरूनशान खुरप्यानं त्येचा परान घेतल्याशिवाय माझ्या जिवाला गमायचं न्हाई बग.

हौशा०–येवढंच ना ? मग त्याची अन् तुमची गांठच घालून देतें म्हणजे झालं कीं नाहीं ?

खंडू०–लई ब्येस ! कुठं घालून देतीयास गांठ ? अन् कवा ?

हौशा०–तें सगळं सांगतें तुम्हांला. तिकडे तुमच्या खोपटांत चला. इथें उघड्यावर नको.

खंडू०–हां, त्येबी खरंच. पन हौशे, खरं सांग, माझ्या वाटतला ह्यो यवढा अगांतुक कांटा दूर केल्यावर मग तरी माझ्या पिर्तीला व्हय म्हनशील ना खास ?

हौशा०–तर तर ! ( स्वगत ) बाजीच्या पान्ह्याच्या तडाख्यांतनं तुमची म्हातारी प्रीती शीरसलामत बाहेर पडेल तेव्हां ना ?

[ दोघे जातात. पडदा वर जातो. ]



## प्रवेश ४ था

[ संजीवनीची खोली. संजीवनी खुर्चीत बसून एक पुस्तक वाचीत आहे. ]

संजी०–( पुस्तकांत लक्ष लागत नसल्यासारखें करून तें खालीं ठेवीत, व उठत स्वगत ) बाबांचा विरोध मी सहज दूर करीन अशी बढाई मीं मारली खरी; पण बाबांच्या भेटीचा प्रत्यक्ष क्षण जवळ येतांच मन बावरतं ! असं कां बरं ? आजपर्यंत माझ्या प्रत्येक कृतीचं बाबांनीं कौतुक केलं, अन् त्यांचा विरोध अनुभवण्याचा हा पहिलाच प्रसंग, म्हणून तर माझ्या मनाची ही चलबिचल होत नसेल ?

पद ११ वें.

( तिलक कामोदः अद्धा. )

अजवरि प्रेमा सुखलालना । अजवरि मधुरवचनांना ॥
सेवियलें नित, कोप, रोष अजि साहेना ॥ ध्रु० ॥
सदा सुखाची लाभालि छाया ।
रोषताप लव साहेना ॥ १ ॥

बाबांनीं माझ्या लग्नासंबंधी मनाशीं काय योजलं असेल बरं ? तें त्यांनीं आजपर्यंत माझ्यापासून लपवून कां ठेवलं ! जें योजलं तें वावगं आहे असं त्यांचं त्यांनाच वाटलं कीं काय ? ...केव्हां एकदां बाबा भेटतील मग सोक्षमोक्ष होईल—( दचकून दाराकडे पाहून ) आलेच वाटतं बाबा. ( काका प्रवेश करतात त्यांस पाहून ) कोण, काका ? मला वाटलं बाबा.

काका०–ही तार आली आहे मोहनरावांच्या नांवाची. तुझ्याजवळ दिली तर चालेल कां त्यांच्याकडे पाठवू ?

संजी०–द्या कीं इकडे. ( तार घेऊन फोडून वाचते )

काका०–कोणाची आहे ग ? पाहुण्यांना तातडीनं परत मुंबईस तर नाहीं ना कुणीं बोलावलं ? ते इथं आठ दहा दिवस मजेंत रहातील या कल्पनेच्या आनंदांत आम्ही सारेजण आहोंत. त्यांना परतबिरत जावं लागलं म्हणजे—

संजी०–नाहीं नाहीं, काका. तसली नाहीं तार. ते लवकरच जपानला जायचे आहेत ना? तेव्हां बोटीवरची जागा रिझर्व करण्याबद्दल कंपनीला लिहिलं होतं त्याचं हें उत्तर आहे. अगदीं उत्तमांतल्या उत्तम बोटीवर मिळते आहे जागा. पैसे मात्र तारेनें भरले पाहिजेत. आता बाबा भेटले, कीं घेतेंच मी पैसे मागून, आणखी—

काका०–कांचनरावांच्याकडनं पैसे घ्यायचे? तें कां बुवा? (हंसत) हुंडा बिंडा कबूल केला आहेस कीं काय?

संजी०–(हंसून) हो हो. तसंच कां म्हणानात! काका, तुम्हांला सारं सांगायचंच आहे बर कां एकदां. माझी त्यांची पहिली भेट कशी झाली, मग आम्ही एकमेकांकडे यायला जायला कशीं लागलों, नंतर काय काय गंमती झाल्या, माझ्या इस्टेटीचा त्यांना उपयोग झाला तर देशाचं केवढं कार्य होईल असं मला कसं वाटलं—खूप खूप सांगायचं आहे तुम्हांला.

काका०–(स्वगत) या इस्टेटीच्या गैरसमजापायीं कांहीं घोंटाळे तर होणार नाहींत? (हंसून उघड) हो मलासुद्धां सारं ऐकायचं आहे तुझ्याकडनं. अग, तरुणांच्या गंमती ऐकण्यांत मोठी गंमत वाटूं लागते म्हातारपणीं! हं सांग, सांग बरं सारं.

संजी०–(हंसून) वा! सांगेन असं म्हटलं याचा अर्थ अगदीं आत्तांच सांगतें असा नाहीं कांहीं. मग केव्हां तरी.

काका०–अशी लबाड आहेस.

संजी०–तुम्ही आत्तांशा माझी फार निंदा करायला लागलांत हं काका. बरं ही तार धाडून द्या मोहनरावांच्याकडे. म्हणजे त्यांची एक चिंता दूर होईल. (काका जाऊं लागतात.) काका, एक गोष्ट विचारूं कां तुम्हांला?

काका०–विचार ना, अशी प्रस्तावना कशाला?

संजी०–विचारूं? एकदम सांगाल ना? हं. बाबांनीं माझ्यासाठीं एखादं स्थळ पाहून ठेवलं आहे होय?



काका०–(आश्चर्यानें) कुणी सांगितलं तुला? भलतंच!

संजी०–बाबांनीं स्वतः सांगितलं! तुमच्याजवळ नाहीं ते कधीं बोलले?

काका०–छेः! एका अक्षरानंसुद्धां नाहीं. मला सांगितल्याशिवाय कांचनराव कांहींसुद्धां करीत नाहींत. तुला स्थळ पहायचं असतं, तर त्यांनीं मला अवश्य विचारलं असतं. आश्चर्य आहे! खरंच ते तुला म्हणाले तुझ्यासाठीं स्थळ पाहिलं आहे म्हणून?

संजी०–(एकदम हंसून व टाळ्या वाजवून) कशी गंमत झाली एका माणसाची! काय फसले पण आमचे काका! अहो कुठलं स्थळ अन् कुठलं काय? तुमची गंमत करायसाठीं कांहीं तरी सांगितलं झालं.

काका०–वा! ताई, एम्. ए. व्हायला झालीस तरी असले पोरकट चाळे करायचे कां?

संजी०–रागावूं नका अं. बरं तेवढी तार नेऊन देतांना?

काका०–हो. (जातो.)

संजी०–(स्वगत) बाबांचा बेत काकांनासुद्धां माहित नाहीं तर? त्यांच्यापासूनसुद्धां तो लपवून ठेवावा असं बाबांना कां बरं वाटलं?

[पडद्यांत "संजीवनी" अशी कांचनरावांची हांक ऐकूं येते.]

संजी०–(स्वगत) आलेच बाबा. (उघड) बाबा, या ना.

[कांचनराव प्रवेश करतात.]

कांचन०–(एक खुर्ची सरकवून घेऊन तीवर बसत) काय संजीवनी, चहा बिहा झाला ना?

संजी०–(दूर उभी राहूनच) अं...हो, झाला कीं.

कांचन०–आज हवा मोठी विचित्र पडली आहे नाहीं?

संजी०–हं, निदान आपल्या घरांत तरी इतकी बिघडलेली हवा पूर्वी कधींच पाहिली नव्हती.

कांचन०–काका म्हणाले, तूं जरा उंच झाल्यासारखी दिसतेस. पण मला कांहीं तसं वाटत नाहीं.

संजी०–तर काय? मी अजून इतकी लहान आहे, कीं माझं हिताहित मला न विचारतां पहावसं लोकांना वाटावं.

कांचन०–(खोलींत इकडे तिकडे पाहिल्यासारखें करून) तुझ्या ह्या खोलीला नवा रंग द्यावा म्हणतों. कोणचा रंग आवडेल तुला?

संजी०–एकूण माझी आवड निवड विचारांत घ्यावी असं तुम्हांला वाटतं म्हणायचं? लहानसहान गोष्टीपेक्षां मोठ्या गोष्टींत तें वाटणं अधिक अवश्य नाहीं कां?

कांचन०–संजीवनी, तूं अशी कडवटपणानं उत्तरं कां देते आहेस हें मी ओळखूं शकतों. माझ्यावरचा तुझा रोष घालवावा, अन् माझ्या मनांत जें कांहीं आहे तें एकदां मोकळेपणानं तुला सांगून टाकावं म्हणूनच मी आतां आलों आहें. ये, इथं बैस ना अशी.

[ संजीवनी त्याच्या समोरच्या खुर्चीवर बसते ]

कांचन०–संजीवनी! (तिच्या दृष्टीला दृष्टि लावतात, आणि पुढें कसें बोलावें तें न समजून स्तब्ध होतात. पुन्हां एकदां तशीच हांक मारून तसेंच पाहातात आणि गप्प बसतात.)

संजी०–कां? सांगा ना.

कांचन०–संजीवनी, मी आतां जें सांगणार आहे तें तुला कदाचित् फार चमत्कारिक वाटेल. तें ऐकून तुला आश्चर्याचा जबर धक्का बसेल, कदाचित् माझ्याविषयीं मनस्वी तिरस्कारही तुला वाटूं लागेल–पण एकच लक्षांत ठेव कीं जें कांहीं करायचं मी योजलेलं आहे त्यांत तुझ्यावरच्या अनावर प्रेमाखेरीज दुसरा कसलाही हेतु नाहीं. तुझ्या लग्नाबद्दल जो निश्चय मी केला आहे त्यांत माझी इच्छा एकच, कीं माझ्याकडून तुला जन्मभर सुख मिळावं.

संजी०–पण बाबा, तुमचे हे सारे बेत गैरहिशोबी नाहींत कां? स्त्रीनं एकदां एखाद्या ठिकाणीं आपलं प्रेम अर्पण केलं, कीं साऱ्या



[illegible] तिला त्या ठिकाणीं दिसूं लागतात. तें सोडून तिला [illegible] नेली तरी ती दुःखी कष्टीच रहाणार. बाबा, तुम्ही जी कांहीं योजना केली असेल ती रद्द केली असं तुम्ही सांगितलंत तर त्यानंच मी जन्माची सुखी होईन.

कांचन०–पण मी जन्माचा दुःखी होईन! चालेल?

संजी०–तें कसं? तुम्ही कुणाशीं वचनानं गुंतला तर नाहींत ना?

कांचन०–नाहीं. पण मनानं इतका गुंतलों आहे, कीं माझं म्हणणं तूं मान्य केलं नाहींस तर माझी सारी सुखाशा संपेल, आणि मला हें जग भयाण अरण्यासारखं वाटूं लागेल!

संजी०–समजलें नाहीं मी तुमच्या बोलण्याचा अर्थ.

कांचन०–संजीवनी, आजपर्यंत तुझ्या सुखांत माझ्याकडून कधीं उणीव राहिली कां?

संजी०–असं म्हणायचं पातक मी कधींच करणार नाहीं. पण बाबा, हा तुमच्या निस्सीम प्रेमाचा प्रश्नच नाहीं. तुम्ही माझी संमति न विचारतां जें दुसरं स्थळ पाहिलं तिथं मी जाणं शक्य नाहीं हाच खरा–

कांचन०–पण दुसऱ्या कुठें जायला मी तुला सांगतच नाहीं. माझा हेतू इतकाच, कीं तूं सदैव या बंगल्यांत, माझ्या घरीं रहावंस अन् मला सुखी करावंस!

संजी०–म्हणजे?

कांचन०–या माझ्या संपत्तीची, कीर्तीची, वैभवाची, अन् माझ्या जीविताची स्वामिनी तूं व्हावंस हीच माझी इच्छा!

संजी०–(दचकून उठत) काय, काय ऐकतें मी हें?—

कांचन०–मीं तुला प्रथमच सांगितलं होतं कीं माझ्या बोलण्याचा तुला विस्मय वाटेल. पण संजीवनी, विस्मयाचा पहिला धक्का ओसरूं देऊन मग माझ्या बोलण्याचा जरा शांतपणें विचार केलास तर—

संजी०–विचार? अफाट अविचाराचा शांत विचार करणं शक्य आहे? प्रत्यक्ष पित्यापेक्षांहि अधिक मायेनं मला लहानाची मोठी केलीत,

अन् आतां एकदम त्या मायेचा विध्वंस करायचा म्हणतां याला विचार कोण म्हणेल? जो माझा हात पित्याच्या अधिकारानं माझ्या वल्लभाच्या हातीं आशीर्वादपूर्वक द्यायचा तोच पती म्हणून धरून माझं प्रेम शापदग्ध करायला निघालांत याला विचार म्हणायचं! पिता आणि पती या नात्यांत फक्त एका वेलांटीचा फरक आहे असं तुम्हांला वाटलं?

**कांचन॰**–तुझ्या या कठोर भाषणाचा प्रहार माझ्यावर होणं शक्य नाहीं. कारण हीं सारीं कटुवचनं मीं कल्पनेनं अनेक वेळां आधींच ऐकलीं आहेत. माझा हेतू मीं बोलून दाखविला, कीं तूं माझी कोणत्या शद्बांनीं निर्भर्त्सना करशील याची मी आपल्या मनाशीं इतके वेळां कल्पना केली आहे, कीं नवे अपशब्द वापरणं तुला कठीण जाईल. पिता आणि पती या शद्बांच्या काव्यार्थाची मला कां भीति दाखवतेस! —अन् तूं तरी कां मानतेस? मी तुझा पिता नव्हतों, पालनकर्ता होतों. अन् पालनकर्त्याला न शोभेलसं माझ्या मागण्यांत काय आहे? लहान मूल म्हणून मीं तुझं प्रेमानं संगोपन केलं येवढ्याच कारणानं तुझ्या तारुण्यांत तुझ्याकडे प्रेमानं पाह्यचा माझा अधिकार नाहींसा कसा होतो? माझ्यासारखी इच्छा सहसा कोणाला झाली नसेल, किंवा होऊनही कोणी बोलून दाखवली नसेल. पण केवळ तेवढ्यामुळें ती पाप ठरावी?

**संजी॰**–हाय, हाय! काय ऐकतें मी हें?—मी जागी आहे कां? कां हें सारं एक भयंकर अभद्र स्वप्न पडतं आहे मला? ज्या मुखांतून ममतेचे लडिवाळ शब्दच आजपर्यंत बाहेर पडले त्यांतून निघणारे शब्द मी ऐकतें आहे, कीं भेसूर यमदूतांनीं पाप्यांना डागायसाठीं तयार केलेल्या तप्त लोहरसाचे सांडलेले थेंब माझ्या कानांत पडताहेत? बाबा!

**कांचन॰**–पित्याचं नातं ध्वनित करणारी ही हांकच यापुढें नको. म्हणजे केवळ संस्कारामुळं जें माझं मागणं तुला भयंकर वाटत आहे तें वाटणार नाहीं. तुझ्या लक्षांत आलं असेल, कीं मीं तुला कालपासून एकदांही ताई अशी हांक मारली नाहीं...

**संजी॰**–( अर्धवट स्वगत ) हो...खरंच! ...



**कांचन॰**–तसंच तूंही यापुढें मला बाबा म्हणूं नकोस.

**संजी॰**–( निराळ्या अर्थानें ) नाहीं म्हणणार. मला म्हणवणारच नाहीं. तुम्हांला बाबा म्हटलं तर साऱ्या पितृप्रेमाच्या नाजूक उमाळ्याला वाट देणाऱ्या त्या दोन गोड, पवित्र अक्षरांची विटंबना होईल! तुम्ही मला लहानाची मोठी केलीत येवढ्याचसाठीं तुम्हांला बाबा म्हणायचं? कसाईसुद्धां अखेर कोयत्यानं कंठनाल चिरायसाठीं कोंकराला खाऊपिऊं घालून घष्ट पुष्ट करतो! त्या कसायाप्रमाणंच माझ्या यौवनावर दूरदृष्टि ठेवून तुम्ही मला माझ्या पित्याच्या हातून घेतलंत म्हणायचं!

**कांचन॰**–संजीवनी, येवढा भयंकर आरोप सोडून दुसरे वाटतील ते कठोर शब्दप्रहार माझ्यावर कर. हा आरोप मला सहन व्हायचा नाहीं; कारण तो खरा नाहीं.

**संजी॰**–हें आतां कुणाला खरं वाटेल?

**कांचन॰**–तुला वाटलं म्हणजे पुरे. शपथपूर्वक सांगतों, तूं म्हणतेस तसं दूरच्या हेतूनं माझं तुझ्यावद्दलचं वात्सल्य गढूळ झालेलं नव्हतं. मीं तुझ्यावर वात्सल्याचा वर्षाव केला तो शुद्ध अन् प्रामाणिक होता.

**संजी॰**–मग आतां तें सारं वात्सल्य एकदम कसं ओसरूं देतां?

**कांचन॰**–हा प्रश्न स्वतःच्या उन्मादक सौंदर्याला विचार. कारण तें कसं ओसरलं, अन् त्याच्या जागीं यौवनसुलभ भावना कशी अन् केव्हां उद्भवली तें माझं मला सुद्धां कळलेलं नाहीं. गेल्या वर्ष दीड वर्षांत नव्या नजरेनें मी तुझ्याकडे पहात आहे येवढं खरं. माझ्या अंतःकरणांत अंकुर धरणारी नवी भावना वेळींच दाबून टाकावी यासाठीं मी यत्न केले नाहींत असंही समजूं नको. संजीवनी, त्या माझ्या यत्नांची, आणि ते करतांना मला झालेल्या मनस्तापाची कहाणी मोठी हृदयद्रावक आहे. ती सांगून तुझं कोवळं मन शिणवण्याऐवजीं येवढंच सांगतों, कीं माझे सारे प्रयत्न फसून मी हतबल झाल्यावरच माझी इच्छा पूर्ण करायचं मीं ठरवलं.

संजी०–अरेरे! हे भयंकर शब्द मला ऐकविण्यापेक्षां, बाबा, एखाद्या विखारी शस्त्रानं माझ्या या देहाचे तुकडे कां करीत नाहीं ? बाबा, तुमच्या मनांत जी गलिच्छ, पाशवी वासना बळावू दिलीत तिच्या–

कांचन०–माझ्या प्रेमाला हें नांव देऊन त्याचा तूं धिःकार करशील हें मला माहितच होतं.

संजी०–तुमचं प्रेम ? त्याला प्रेम कोण म्हणेल ? सारं जग त्याला पशुतुल्य वासनाच—

कांचन०–जगाच्या म्हणण्याला काय किंमत द्यायची तें तुझ्या-पेक्षां मला अधिक माहित आहे. स्वतःच्या मनांत उद्भवणारी स्वर्गीय प्रीति आणि दुसऱ्याच्या मनांत येणारी मात्र पाशवी वासना असं म्हणायचा जगांतल्या प्रत्येक माणसाचा न्याय आहे. लोकनिंदेला उलट जबाबानं गप्प करण्याइतकंसुद्धां महत्व मी देणार नाहीं. पण तुला मात्र विचारतों कीं माझ्या प्रेमाला तूं पाशवी वासना कां समजतेस?

संजी०–कां म्हणजे ? अं...अं... ( गोंधळते. )

कांचन०–तूं गोंधळलीस ! तुझ्या माझ्या वयांत फार अंतर आहे म्हणून माझ्या प्रेमाला प्रेम न म्हणतां पशुवासना म्हणायचं असं उत्तर तूं देशील अशी माझी कल्पना होती.

संजी०–मग ? तसं उत्तर दिलं तर तें खोटं आहे कां ?

कांचन०–शद्बांचे काव्यार्थ आणि रूढी एवढ्यापुरतंच पाहिलं तर तें कदाचित् खरं ठरेल. पण एरव्हीं नाहीं. माझं मन तुझ्यावर जडलं तर मी पशु ठरतों. मग तुझे मोहनराव पशु कां नव्हेत ? त्यांची आसक्ति स्वर्गीय प्रीति, आणि माझी इच्छा तेवढी हिणकस वासना काय ?

संजी०–तुम्ही एक गोष्ट विसरतां. मोहनरावांच्या इच्छेला माझी मान्यता आहे, अन् तुम्ही आपल्या इच्छेचा माझ्यावर जुलूम करायला निघाला आहांत !



कांचन०–म्हणजे मान्य होईल तेवढं स्वर्गीय प्रेम आणि न होईल तें पशुवासना असं म्हणतेस ? वेडे, अव्यक्त आणि अमान्य अशा प्रेमानंच मानवी अंतःकरणाचा प्रचंड सागर बहुतांशीं भरलेला आहे! ज्याचं बंड साधेल तो राजा ठरून सिंहासनावर चढतो, आणि ज्याचं फसेल त्याला गुन्हेगार म्हणून फांसावर चढावं लागतं. पण दोघांच्या अंतःकरणाची तळमळ पाहिली तर ती सारखीच दिव्य असते. स्वर्गीय प्रेम आणि वासना यांचंही तसंच आहे. नांवापलीकडे त्यांत काय अंतर आहे ? – सांग !

संजी०–(गोंधळून) काय अंतर आहे तें मला सांगतां येत नाहीं, पण आहे खास !—अन् मी म्हणतें केवळ वादानं मला जिंकण्याची ही गोष्टच नाहीं. तुम्ही तर्काची केवढीही कसरत केलीत तरी तुमची इच्छा जगाला ओंगळच वाटणार, आणि धिःकाराखेरीज दुसरं उत्तर माझ्या-कडून मिळणार नाहीं. तुमच्या वयाला, नात्याला, आजपर्यंत माझ्यावर जे उपकार केलेत त्याला–कशालाच तुमची ही वासना–हो! वासनाच !– शोभत नाहीं हें तुम्ही कसं लक्षांत घेत नाहीं ? मायेनं वाढविलेल्या या माझ्या देहावर वासनेचं वज्र टाकण्याची इच्छा तुम्हांला अजिंक्य कां वाटावी ? कांचनराव !– बाबा ! विवेक करा—

कांचन०–संजीवनी, विवेकाच्या गोष्टी सांगणं सोपं आहे. एकीकडे प्रेमाच्या तहानेनं कंठ शुष्क झाला असला तरी मीच व्यास वाल्मीकी-सारखीं विवेकसूक्तं वाटलं तर म्हणून दाखवतों ! महापुरांतल्या भोंव-ऱ्यांत सांपडलेल्या माणसाला सांगणं सोपं आहे कीं विवेकानं भोंवऱ्याची धार कापून म्हणजे वांचशील ! तें करणं सोपं नाहीं ! संजीवनी, माझा तिरस्कार न करतां माझी कींव केलीस तर तेंच योग्य होईल !

संजी०–छे छे ! तुमची वासना प्रबळ असली म्हणून ती कांहीं वाजवी ठरत नाहीं ! ती तुम्ही प्रयत्नानं सोडलीत तर आजपर्यंतच्या उपकारांत भर घातलीत म्हणून जन्मोजन्मीं त्यांची आठवण ठेवीन ! पण, त्या वासनेचा असा उघड उच्चार करूं लागलांत तर मला तुमच्याबद्दल तीव्र तिरस्काराखेरीज दुसरं कांहीं वाटणंच शक्य नाहीं.

**पद १२ वें.**

(सारंगः त्रिताल)

**हीना विटंबना अमंगला कुवासना कुटिला !।**
**त्यजिला नयसुविनय सारा ॥ ध्रु० ॥**
**गणुनि बालिका आत्मदुहिता ।**
**मलिन विषयिं तिजला बलि देतां ।**
**मदयुत पशुसम ॥ १ ॥**

**कांचन**०–अरेरे! मला वाटलं होतं माझ्या संजीवनीच्या हृदयांत माझ्याविषयीं थोडीशी अनुकंपा तरी असेल ! मी मनाशीं म्हणत होतों, संजीवनीचं माझ्यावर आज प्रेम नसलं तरी कालांतरानं तिला मी प्रेम करायला शिकवीन ! संजीवनी, माझ्या निःसीम प्रेमाच्या सहवासांत या घरांत तूं कांहीं काळ राहिलीस म्हणजे—

**संजी**०–छे छे ! तें शक्य नाहीं ! किळसवाण्या वासनेनं अभद्र झालेल्या या घरांत मी आतां क्षणभरसुद्धां राहणार नाहीं ! प्रियकराच्या हाताचा आसरा मला लाभलेला आहे. सुदैवानं माझ्या वडिलांनीं मोठी इस्टेटही ठेवलेली आहे. माझ्या मिळकतीचा ताबा अन् तुमचा अखेरचा निरोप मला एकदमच घेतां येईल !

**कांचन**०–माझा निरोप घ्यायचाच म्हटलंस तर येईल घेतां. पण मिळकतीचा ताबा घ्यायची तुझी कल्पना अशक्य कोटींतली आहे.

**संजी**०–तें कां ? – मी आतां सज्ञान झालें आहे !—

**कांचन**०–वयाच्या दृष्टीनं सज्ञान झाली आहेस, पण तुझ्या वडिलांच्या मिळकतीच्या बाबतींत अजून तूं अज्ञान आहेस ! अन् यापुढेंहि त्या बाबतींत तूं अज्ञानच राहशील तर तें तुला सुखाचं होईल.

**संजी**०–कसं म्हणतां ? मिळकतीच्या बाबतींत मी सदा अज्ञानच रहावं ? म्हणजे मी ती कधीं मागूं नये अन् तुम्ही कधीं देऊं नये ?

**कांचन**०–तसं नव्हे. पण जी इस्टेट मागायची अन् द्यायची ती आधीं असली पाहिजे ना ?



**संजीवनी**:— हाय ! काय ह्मणतां ? दिवाळखोर बापाची ? धर्मादायावर वाढलेली मी मुलगी आहे ? (अंक २, पृष्ठ ५९)

संजी०–काय, म्हणतां काय ?—हं, समजलें, माझी मिळकत गिळंकृत करून खाका वर करायचा तुमचा बेत असेल ! मित्राच्या कन्येवर पापी नजर ठेवलीत, तसं मित्राचं वित्तही लुबाडलंत ? हाय, हाय ! बाबा!—कांचनराव ! आणखी काय काय सांगून तुमच्याविषयींच्या माझ्या सद्भावना उन्मळून टाकणार आहांत ! माझ्या वडिलांच्या दीड लाखाच्या इस्टेटीचा अपहार करतांना—

कांचन०–संजीवनी, तुझे हे वाक्प्रहार मला कसे लागणार ? कारण, केवळ अज्ञानामुळं तूं असं बोलत आहेस या खात्रीचं चिलखत माझ्या अंगावर आहे ! तुझ्या वडिलांनीं दीड लाखांची इस्टेट तुझ्यासाठीं ठेवली असं तुला कुणीं सांगितलं ? मी सांगितलं ?

संजी०–( गोंधळून ) अं...नाहीं ! असल्या गोष्टीं मी तुम्हांला कधीं विचारल्याच नाहींत...

कांचन०–मग, काकांनीं सांगितलं ?

संजी०–अं...नाहीं. त्यांनींही नाहीं...

कांचन०–मग कुणीं सांगितलं तुला तुझ्या वडिलांनीं दीड लाखाची इस्टेट ठेवली म्हणून ?

संजी०–( अतिशय गोंधळून ) अं...तसं अगदीं स्पष्ट शब्दांत कुणीच नाहीं. पण साऱ्या लोकांचा असा समज आहे, अन् त्याचे ओझरते उल्लेख माझ्या कानीं वारंवार आले आहेत. ज्या वैभवांत मी लहानाची मोठी झालें त्यावरूनही माझा असाच समज होत गेला, कीं माझ्या वडिलांनीं मोठी इस्टेट मागं ठेवली...

कांचन०–तुझा अन् साऱ्या लोकांचा असा समज व्हावा, आणि तूं प्रसन्न, मोकळ्या मनानं लहानाची मोठी व्हावीस अशीच माझी इच्छा होती. दिवाळखोर बापाची त्याच्या मित्राच्या धर्मादायावर वाढलेली मुलगी असं आपलं खरं वर्णन आहे हें जर तुला कळलं असतं—

संजी०–काय म्हणतां ? ...दिवाळखोर बापाची !...धर्मादायावर ...वाढलेली... !

**कांचन०**—हे भयंकर शब्द तुला ऐकविण्याची वेळ तूंच आणलीस. तुझ्या वडिलांबद्दलचं सत्य फार कडू आहे. त्या कडूपणानं तुझ्या मुग्ध मोकळ्या आनंदाचा नास कधीं होऊं नये अशीच माझी इच्छा होती. पण माझा नाइलाज केला आहेस, तेव्हां सांगतो. ऐक. तुझे वडील वारले तेव्हां दीड लाखाच्या इस्टेटीऐवजीं त्यांना दीड लाखाचं कर्ज होतं. माझ्या त्या मानी मित्राला आपला गुप्त कर्जबाजारीपणा उघड होऊन मरण्याचं दुःख मरणाहूनही अधिक वाटेल हें जाणून मी त्याचं सारं कर्ज भागवलं, त्याच्या श्रीमंतीचा लौकिक कायम राहूं दिला, अन् त्याच्या एकुलत्या एक कन्येबद्दलची त्याची चिंताही सर्वस्वीं दूर करून त्याचा अंतकाळ मी सुखाचा केला! ही गोष्ट काका, आणि मंदाकिनीचे बाबा या दोघांनाच काय ती ठाऊक आहे. त्यांना विचार, मी मित्राच्या मिळकतीवर दरोडा घालणारा नराधम आहे, कीं त्याची अब्रू वांचवून त्याच्या आत्म्याला शांति देणारा मित्र आहे!

**संजी०**—म्हणजे तुमच्या दयाधर्माच्या संजीवनानंच केवळ जगलेली अन् वाढलेली ही संजीवनी आहे म्हणतां? (स्वगत) हाय हाय! मग मी माझ्या वल्लभाच्या मनोरथांना कसलं संजीवन देणार?...... मोहनराव, श्रीमंतीच्या भ्रमानं मी तुम्हांला आशेच्या किती उंच उंच शिखरावर घेऊन गेलें, अन् आतां..... (उघड) कांचनराव, खरंच मी एक पोरकी, शतदरिद्री, अनाथ स्त्री आहे कां? माझ्या मालकीची एक कपर्दिकसुद्धां नाहीं?

**कांचन०**—छे छे! संजीवनी, असं तूं कां विचारावंस? या संस्थानांतल्या दोनचार नबाबांना विकत घेतां यावं इतकी माझी संपत्ति मोठी आहे. ती संपत्ति तुझ्या चरणांवर अर्पण करायची मला परवानगी दे, आणि प्रत्यक्ष लक्ष्मीसारखी माझ्या या घराची शोभा हो. मी तुझ्या पित्यासाठीं अन् तुझ्यासाठीं जें कांहीं केलं त्याची थोडी तरी जाणीव ठेव.

**संजी०**—अस्सं? उपकाराची परतफेड म्हणून माझं यौवन आणि सौंदर्य मीं तुम्हांला अर्पण केलं पाहिजे असं तुमचं म्हणणं?



**कांचन०**—माझ्या उपकाराला व्यापाराचं रूप द्यायची इच्छा मला कधींच झालेली नाहीं. इतकंच नाहीं तर जें मीं केलं तें कर्तव्याच्या हौसेनं केलं, उपकाराच्या बुद्धीनं मुळींच नाहीं. माझ्या मित्रासाठीं केलेल्या सत्कृत्याचा या जिभेनं कधीं कुठें उच्चारही आजपर्यंत केला नव्हता. तुझ्याजवळ आज केला तो येवढ्याचसाठीं कीं, तूं समजतेस तसा अगदींच पाषाणहृदयी खलपुरुष मी नाहीं हें तुला पटावं—

**संजी०**—छे, छे. तसे तुम्ही खचित नाहीं. पण तसे असतां तर फार बरं झालं असतं! मग मला तुमचा तिरस्कार करणं सोपं झालं असतं! आतां......(अर्धवट स्वगत) आतां मला तुमचा तिरस्कार करणंही शक्य नाहीं, आणि......तुम्ही म्हणतां......तसलं......प्रेम तर......

**कांचन०**—नको, नको. माझ्या साऱ्या सुखस्वप्नांवर निखारे ठेवणारे ते शब्द मुखावाटे काढूं नकोस. संजीवनी, माझ्या प्रेमाची कसोटी तुला हवी तशी पहा, पण त्याचा असा अव्हेर करूं नकोस. तूं माझ्या प्रेमाचा स्वीकार करशील या एका आशेवरच गेलीं दोन वर्षं मी जगलों आहे. संजीवनी, अशी निष्ठुर होऊं नकोस. माझ्या गाढ प्रेमाबद्दल किंतू कां ठेवतेस? तुला सुखाच्या शिखरावर नेऊन बसविण्यासाठीं अधिर झालेल्या माझ्या हृदयाची तुला ओळख कां पटत नाहीं? माझ्या सर्वस्वाची स्वामिनी—(जवळ जाऊन तिचा हात धरतो.)

**संजी०**—हां! कांचनराव! (हात सोडवून घेऊन दूर होते.) तुमचं सर्वस्व कुबेराच्या भांडाराएवढं असलं तरी त्याचा मला काय मोह वाटणार? पुन्हां आपल्या गलिच्छ वासनेचा एक शब्दसुद्धां मला ऐकवूं नका! माझं उत्तर एकच. या घरांत मी आतां राहणं शक्य नाहीं!

**कांचन०**—(रागानें) ठीक आहे. माझंही अखेरचं उत्तर एकदां ऐक. माझ्या म्हणण्याला रुकार दिलास तर तुला जन्मभर फुलासारखी झेलून तुझं दास्य करीन! पण, माझा अव्हेर करायचा असेल तर या घराबाहेरचं उघडं अफाट जग तुला मोकळं आहे! मोहनरावासारख्या

शिक्षकाचा धंदा करणाऱ्या इसमाजवळ पैसा तो कितीसा असणार ? आज तारुण्याच्या अविचारांत तुला गरिबीचं कांहीं वाटत नसलं तरी पुढें लवकरच कष्टांत आपल्या आयुष्याची माती केल्याबद्दल तुला पश्चात्ताप होईल ! मी जातों. मी सांगितलं त्याचा नीट विचार कर. मोहनरावाचा नाद सोडून जन्माचं सुखी होऊन मलाहि सुखी करायचं, किंवा मोहनरावाचा हात धरून या घरांतून बाहेर पडून आयुष्याचं मातेरं करून घ्यायचं—हे दोनच मार्ग तुला मोकळे आहेत ! यांतला कोणता पत्करायचा तें विचारपूर्वक ठरव, आणि मला येऊन सांग. मी आपल्या खोलींत तुझी वाट पहात आहे ! ( जातो. )

संजी०–( कांहीं वेळ सुन्न झाल्यासारखें उभें राहून स्वगत ) दोनच मार्ग !...हो...खरंच, दोनच ! कांचनरावांना नकार देऊन खऱ्या प्रीतिसाफल्याचा उपभोग घ्यायचा !...पण मग मोहनरावांचं परदेशीं जाणं अशक्य होणार !...त्यांच्या साऱ्या महत्वाकांक्षा लयास जाणार !...ते कीर्तीला मुकणार !......असं व्हायला नको असेल तर कांचनरावांच्या संपत्तीची स्वामिनी होऊन मोहनरावांना पैसे देऊन त्यांची महत्वाकांक्षा पुरी करायची !...पण मग प्रेमशून्य शुष्क जीविताचा वाळवंट जन्मभर तुडवावा लागणार !

पद १३ वें.

( जोगियाः त्रिताल )

जल नाहीं लव सागरीं जरी । तळमळते मीना ती भारी ॥ ध्रु० ॥
परिणय होतां प्रणयावांचुनि ।
सजीव मरणें; शमे कोठुनि ।
प्रेमपिपासा हृदंतरीं ? ॥ १ ॥

माझं कर्तव्य कोणतं ? ... हाय हाय ! काय भयाण घटका आली ही ! ( मूर्छित होते. )

[ पडदा. ]

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा

## प्रवेश १ ला

[ कांचनरावांची प्रशस्त, शृंगारलेली खोली. संभू खुर्च्या टेबलांवर झाडणी मारीत आहे. खंडूजी प्रवेश करतो. ]

खंडू०–( खोलींत इकडे तिकडे पाहून ) अरच्या ! हतंबी न्हाइती मालक ? काय र संभ्या, मालकांची सवारी झालीया तरी कुनीकडं ? तिकडं हपिसांत पाह्यलं तर ट्येसनावर तिकटाच्या खिडकीपाशीं व्हावी तशी कुळांची दाटी झालिया, पर मालक तर आपल्या खुर्चीत न्हाईत. भाइर ग्येलं असत्याल म्हनावं तर तबेल्यापुढं बाज्या सिगरेट वढतुया ! तवा म्हटलं हतं तरी हटकून—

संभू०–( हलक्या अवाजांत ) ए ए ! पाण्याच्या झारींतल्या फवाऱ्यासारखं हें बोलणं बंद कर ! मालकांनीं ऐकलं म्हणजे ? आंतल्या ड्रेसिंग रूममधें आहेत मालक !

खंडू०–( जीभ चावून ) अररर !—( हलक्या अवाजांत ) अकलच्या कांद्या, पहिल्या झट न्हाई सांगायचं ?

[ कांचनराव प्रवेश करतात. ]

कांचन०–अरे संभू, काकांना मी बोलावलं आहे म्हणून सांग बरं. ( खंडू मुजरा करतो. ) कां रे, तूं कां इकडे ?

खंडू०–न्हाई–जरा काम व्हतं......

कांचन०–( खुर्चीवर बसून टेबलावरचें वर्तमानपत्र घेऊन चाळवीत ) काम आहे माझ्याशीं ?—

खंडू०–हां...पैसे व्होवेत थोडे...

कांचन०–( वर्तमानपत्रांतून तोंड वर न करतां ) मग मूर्खा, माझ्याकडं कशाला यायला पाहिजे त्यासाठीं ? काकांना भेट.

खंडू०–अं...थोडं म्हंजी लई हवे हायती. निदानीला येक वोट तरी व्होवं...

कांचन०–( त्याच्याकडे न पाहतां ) तरी काय झालं ? काकांजवळ माग, जा.

खंडू०–त्येंच्याजवळ म्यां मागितलं न्हाई जनूं ?–पर त्ये रागाला आल अन् म्हनाल तू गाढाव हयेस इकत्या म्हातारपनीं लगीन करतुयास तवा !

कांचन०–( एकदम वर्तमानपत्र दूर करून त्याच्याकडे पाहून ) म्हणजे ? तुला लग्नासाठीं पैसे हवे आहेत ? लगीन ठरविलं आहेस तूं आपलं ?

खंडू०–ठरिवलं म्हंजी...हां ठरल्यासारखंच हाय !

कांचन०–कुठली बायको काढलीस शोधून ? पाटाची—एखादी म्हातारी असेल झालं !

खंडू०–कां म्हून ? चांगली तरनी ताठी हये जी !

कांचन०–तिच्याशीं लग्न करावंसं तुला वाटलं ? अन् तिनं तुला पसंत केलं म्हणतोस ?

खंडू०–( लज्जेनं ) हां मालक काय म्हनतील त्ये खरं !

[ काका प्रवेश करतात. ]

कांचन०–काका, तिकडे ऑफिसांत जाऊन कारकुनाला सांगा मी आज कोणाचेही कागद पाहणार नाहीं, कुळं आलीं असतील त्यांना जाऊं द्या. अन् तसंच कारकुनाला म्हणावं आज आपले जे कज्जे कोर्टात निघायचे असतील त्यांना ज्यूनिअर वकिलाकडून पुढची तारीख मागून घ्या. मी जाणार नाहीं आज कोर्टात !

काका०–असं ?



कांचन०–हो, अहो शिष्टागमने अनाध्यायः ! संजीवनी आली आहे ना ? तेव्हां आमच्या शाळेला आज सुट्टी !

काका०–( किंचित् हंसून ) बरं. सांगतों मी कारकुनाला. ( जाऊं लागतो. )

कांचन०–अन् हें पहा, या खंडूजीला शंभर रुपये द्या बरं कां. ( खंडूजीस ) जा तूं. देतील काका. ( खंडूजी मुजरा करून आनंदानें जातो. ) किती आनंद झाला बिचाऱ्याला ! काका, तुम्ही कां त्याच्यावर रागावलांत ?

काका०–रागावूं नाहीं तर काय करूं ? आपण उदार आहांत तेव्हां शंभर रुपये खंडूजीला दिले तर आपण कांहीं म्हणणार नाहीं हें मलाही माहित होतं ! पण मूर्खाच्या मूर्खपणाला उत्तेजन दिल्यानं औदार्याचा गुण अवगुण ठरतो असं आपलं माझ्या बुद्धीला वाटतं !

कांचन०–खंडूजीच्या लग्नाला तुम्ही मूर्खपणा म्हणतां होय ? तें कां बुवा ?

काका०–माणसानं आपल्या वयाकडे कांहीं पाह्यला पाहिजे कां नको ?

कांचन०–अहो, अमुक वयानंतर पुरुषाच्या मनांत लग्नाची इच्छा उरत नाहीं असं थोडंच आहे ? निसर्गाच्या प्रेरणांपैकीं ती एक आहे. म्हातारा मनुष्य खातोपितो म्हणून त्याला आपण पापी समजतो कां ? मग स्त्रीसहवास त्याला हवासा वाटला तर तेवढ्यामुळं मात्र तो पापी किंवा मूर्ख कां ठरावा ?— काका, अलीकडे या प्रश्नाविषयीं मी फार विचार करीत आहे. तीं पाहिलींत या विषयावरचीं किती पुस्तकं मी खरेदी करून वाचून काढलीं आहेत ! त्या सर्वांचा मथितार्थ पाहिला तर खंडूजीला मूर्ख म्हणणं शास्त्रशुद्ध ठरत नाहीं !

काका०–साहेब लोक काय नाहीं नाहीं त्या कल्पना काढून त्यांना शास्त्र म्हणायला सांगतात ! माहित आहे मला ! कोठल्याशा देशांत तर साहेब लोकांनीं दिगंबर स्त्रीपुरुषांचे मेळे काढले आहेत म्हणे !

आम्हां जुन्या लोकांना नाहीं पटायचीं असलीं सोंगं ! लग्न म्हटलं कीं तें योग्य वयांत झालं तरच त्याची शोभा !

कांचन०–( किंचित हंसून ) हः हः ! तुमचीं आमचीं मतं जुळत नाहींत म्हणायचीं ? जाऊं द्या. वाद नको. पण काय हो काका, मग मी जर आतां लग्नाचा बेत केला तर तुमच्या दृष्टीनं तें कांहीं शहाणपणाचं ठरणार नाहीं ! होय ना ?

काका०–आपण ?...अं...लग्नाचा बेत ? समजलों, माझ्या मताची कसोटी पाह्यसाठीं काढला असावा आपण असा प्रश्न......

मोहन०–हः हः ! बरं जा तुम्ही. कारकुनाला तेवढं सांगा अं. अन् खंडूजीला देऊन टाका लागतील तेव्हां शंभर रुपये.

काका०–ठीक आहे. ( जातो. )

[ कांचनराव कांहीं वेळ वर्तमानपत्र चाळतात. ]

कांचन०–( स्वगत ) संजीवनीची किती वेळ वाट पाहावी लागणार आहे कुणास ठाऊक ? एकेक पळ घटकेसारखा वाटत आहे ! ( उठतो व टेबलावरच्या पुस्तकांतील एक घेऊन उघडतो. ) या पुस्तकांनीं केवढा विसावा दिला आहे आतांशा माझ्या मनाला ! ( वाचूं लागतो. )

[ संभू प्रवेश करतो. ]

संभू०–रोजच्या वेळेस जेवण करणार ना ? आचाऱ्यानं सांगितलं आहे कीं तयारी आहे.

कांचन०–त्याला सांग मला पुष्कळ अवकाश आहे अजून. अन् बाजीला म्हणावं गाडी काढूं नकोस. कोर्टांत जायचं नाहीं मला आज. ( दाराशीं चाहूल झालेली ऐकून ) कोण ?—संजीवनी ? ये कीं.

[ संजीवनी प्रवेश करते, पण दूर उभी राहते. कांचनराव गोंधळून इकडे तिकडे पहातात. ]



कांचन०–( संभूस ) तूं जा. ( तो जातो. पण जातांना " आतां यांचं बोलणं आडून ऐकलंच पाहिजे " असें मनाशीं म्हटल्यासारखा स्वतःशीं अविर्भाव करतो. त्याच्या मागोमाग जाऊन कांचनराव दार बंद करून येतात. ) मला वाटलं माझ्यावर रागावून तूं कदाचित् इकडे यायचीच नाहींस. पण आलीस. माझ्यावरचा तुझा राग थोडा तरी कमी झाला म्हणायचा. बैस ना इथें अशी, उभी कां ?

संजी०–उभीच बरी आहे. कारण मी आत्तां तुमच्याकडे आलें आहे ती एक याचना करायसाठीं आलें आहे. याचकानं काय मागायचं तें उभं राहूनच मागणं उचित !

कांचन०–छे छे, संजीवनी, याचना करणारा मी, अन् ती पूर्ण करणारी तूं. तूं अशी या आसनावर बैस, अन् मी तुझ्या प्रेमाची याचना–

संजी०–ही भाषा पुन्हां कशाला ? माझी याचना काय आहे ती ऐकून घेणार असाल तरच मी थांबतें. नाहीं तर—

कांचन०–छे छे, जाऊं नकोस. सांग.

संजी०–मी हें घर सोडून मोहनरावांच्या बरोबर जाणार. ( तो बोलणार असें पाहून ) थांबा. मधें बोलूं नका. मी काय म्हणतें तें सगळं नीट ऐकून घ्या. मी इथून निघून जायचं तर ठरवलंच आहे. पण तुम्ही एक भिक्षा मला घातलीत तरच मला जातां येईल. ती अखेरची भिक्षा मागायसाठीं मी आलें आहे.

कांचन०–काय म्हणते आहेस कांहीं कळतच नाहीं.

संजी०–सांगते. दीड लाखाची इस्टेट माझ्या वांट्याला येणार अशा भ्रमांत तुम्ही मला लहानाचं मोठं होऊं दिलंत हे तुमचे उपकार झाले यांत संशयच नाहीं. पण या उपकारांनीं माझा एक मोठा घात केला आहे.

कांचन०–तो काय ?

संजी०–त्या भ्रमामुळें एका अत्यंत बुद्धिमान् पण गरीब तरुणावर मी प्रेम केलं—

कांचन०–मोहनरावावर म्हणतेस ?—

संजी०–हो, जपानला जाऊन आपला एक शास्त्रीय शोध पटवून कीर्ति मिळवायची त्यांची महत्त्वाकांक्षा त्यांच्या गरीबीमुळें वांया जात होती हें पाहून माझं त्यांच्यावर अधिकच प्रेम जडलं. प्रियकराची एखादी असहायता दिसली कीं बायकांचं मन तिथें अधिकच जडतं. माझ्या इस्टेटीचा मोहनरावांना उपयोग होईल, तेव्हां आमचं लग्न होतांच त्यांनीं जपानला जायचं असं आम्ही ठरवलं होतं. त्यांच्या जाण्याची सगळी तयारी सुद्धा झालेली आहे. मी आतां निष्कांचन ठरलें, पण त्यांच्या कीर्तीचा मार्ग बंद व्हायला नको. मला वीस हजार रुपये भिक्षा म्हणून घाला. मी अन् मोहनराव ते पुढें फेडूं. ते फेडण्यासाठीं मला काबाडकष्ट करावे लागले तरी मी करीन. पण कसंही करा, अन् माझ्या दारिद्र्याच्या आकस्मिक आघातानं मोहनरावांच्या मनोरथांचा चुराडा होणार आहे तो वांचवा! आजपर्यंत अलौकिक उपकार करून या अनाथ मुलीला वाढविलीत त्यांत येवढी भर घाला.

पद १३ वें.

(गझल)

दीना मनिं अबला बाला ।
लीन पदावरिं माना ॥ ध्रु० ॥
प्रीतिलता कुसुमाला । राजिवशा कोमला ।
छेदु नका करिं, दिव्य जला घाला ॥ १ ॥

कांचन०–कसं म्हणतेस? मोहनराव दरिद्री आहे, अन् तुझे पैसे घेऊन परदेशीं जायचा त्याचा बेत आहे ?

संजी०–त्यांचा नव्हे! माझा !

कांचन०–हंः ! अल्पवयांतल्या अजाणपणामुळं तो तुझा असं तुला वाटतं आहे! तो बेत त्याचाच ! तुझ्या पैशावर काकदृष्टि ठेवून त्यानं तुला भूल घातली आहे, दुसरं काय? केवळ मोहनराव तरुण आहे म्हणून त्याच्या वासनेला प्रेम म्हणायचं कीं काय असं मी तुला



विचारलं होतं, आठवतं आहे? आतां तर त्याची वासना स्वार्थी, कपटी आहे हें तुझ्या सांगण्यावरनंच दिसतं आहे. त्याच्या कपटाला तूं खुळेपणानं प्रेम समजत असशील तर—

संजी०–हां पुरे! पुरे ! आमच्या परस्पर प्रेमाचा अपमान करणारे शब्द मी साफ ऐकणार नाहीं ! दुसऱ्याच्या भावना हिणकस ठरविल्यानं स्वतःच्या गलिच्छ वासनेचं समर्थन होतं असं वाटतं कीं काय तुम्हांला ?

कांचन०–संजीवनी, असाच प्रश्न मलाहि तुला विचारतां येईल. माझे तुझ्यावर अगणित उपकार झाले असतांना, मी लाचार होऊन तुझ्यापाशीं प्रेमाची याचना करीत असतांना, केवळ माझ्या प्रीतीला अमंगळ नांव दिल्यानं तुझ्या कृतघ्न आणि निर्दय नकाराचं समर्थन होईल असं तुला तरी वाटलं कीं काय ?—

संजी०–काय म्हणतां? माझा नकार म्हणजे कृतघ्नपणा ? म्हणजे तुमच्याविषयीं कृतज्ञता दाखवायची असली तर तुमच्या कामवासनेला मी स्वतःचा बळी द्यावा ? हाय हाय ! असले हे भयंकर शब्द ऐकून माझे प्राण आधींच कासावीस झाले आहेत ! ते पुरते घ्यायची तुमची इच्छा नसेल, तर मी मागितली ती अखेरची भिक्षा मला घाला, अन् मला या यमपुरीचा निरोप घेऊं द्या !

कांचन०–संजीवनी, तूं आपल्या हट्टानं मला खलपुरुष बनवते आहेस ! वीस हजारच काय, माझी सारी संपत्ति आपलीशी करून घेणं तुझ्याच हातीं आहे. पण तुला माझं ऐकायचं नसेल तर एक पैसुद्धां तुला माझ्याकडून मिळायची नाहीं !

संजी०–ठीक आहे. हा माझा अखेरचा नमस्कार घ्या. जातें मी ! (जाण्यासाठीं वळते.)

कांचन०–मग तुझ्या मोहनरावाचे मनोरथ ? होऊं दे त्यांचा पार चुराडा ?—

संजी०–(स्वगत) हाय रे दैवा! यांच्या वासनेचा धिःकार करून निघून जायचं सामर्थ्य कुठं मला ठेवलं आहेस तूं ?–(वळून) कांचनराव, काय वाटेल तें करा पण मोहनरावांच्या कीर्तीचा मार्ग बंद करूं नका !

**कांचन**०-येवढंच ना? माझं ऐक. माझ्या म्हणण्याला रुकार दे, मोहनरावाला हवे तेवढे पैसे मी देतों.

**संजी**०-(गोंधळून) म्हणजे माझ्या यौवनाचा विक्रय करूं म्हणतां?...मोहनरावांच्या भाग्योदयाचा तेवढाच एक मार्ग उरला असला तर करीनही!...

**कांचन**०-वेडे, उगीच काय भेसूर शब्दांचीं जाळीं स्वतःभोवतीं पसरायचीं? माझी पत्नी झालीस तर—(तिचा हात धरूं लागतो.)

**संजी**०-कृपा करा; जरा दूर उभे रहा. तुमच्या स्पर्शाबरोबर मी कदाचित् मरेन!...अन् मोहनराव कीर्तिवंत झाल्याशिवाय मला मरतां येत नाहीं! (दोन्ही हातांनीं मस्तक धरून उभी राहते. नंतर हात दूर करून) कसं म्हणालांत? वीस हजार रुपये द्याल?

**कांचन**०-तुला संशय कां वाटतो?

**संजी**०-ठीक आहे...कांचनराव,...मी तुमची...पत्नी...होईन!

**कांचन**०-(आनंदानें) अहाहा! संजीवनी!—

**संजी**०-पण माझ्या अटी मान्य केल्या पाहिजेत.

**कांचन**०-सांग.

**संजी**०-वीस हजारांचा चेक आत्तांच्या आत्तां तुम्ही माझ्या स्वाधीन केला पाहिजे. मी तुम्हांला दिलेल्या कबुलीचं अवाक्षरही कोणाला कळतां कामा नये. आज दिवसभर तुम्ही माझी भेट घेतां कामा नये. संध्याकाळीं मी तुम्हांला भेटेन तेव्हां मला तुमच्या विकाराबादच्या बंगल्यावर नेलं पाहिजे, अन् तिथून उद्यांच्या उद्यां कुठें तरी लांब दूर देशीं निघालं पाहिजे.

**कांचन**०-या साऱ्या अटी मला कबूल आहेत. हा घे चेक!

[ चेक लिहिण्यासाठीं कांचनराव टेबलापाशीं बसतात. संजीवनी खुर्चीवर मटकन बसते, व "हाय" असा दीन स्वर काढून दोन्ही हातांत मस्तक लपविते. ]

(पडदा)



## प्रवेश २ रा.

[ मोहनच्या खोलीपुढचा व्हरांडा. मोहन प्रवेश करतो. ]

**मोहन**०-कोण आहे रे तें? बाजी?

**बाजी**०-(उलट बाजूनें प्रवेश करून) हो मीच. काय हुकूम आहे?

**मोहन**०-तुझे मालक तुझ्या ताईसाहेबांच्या खोलींत अजून बोलत बसले आहेत कां गेले पाहून येतोस कां?

**बाजी**०-पाहून कशाला यायला पाहिजे? मला माहित आहे. मघांशींच मालक आपल्या खोलीकडे परत गेले.

**मोहन**०-खरं?

**बाजी**०-हो ना. ते खोलींत गेले, अन् आज कोर्टात जायचं नाहीं असं त्यांनीं सांगून पाठवलं म्हणून तर असा सुटी असल्यासारखा हिंडतो आहे. आपल्याला गाडी हवी असली तर—

**मोहन**०-छे छे. मला काय करायची आहे? जा तूं.

**बाजी**०-(स्वगत) देव तुमचं भलं करो. (जातो.)

**मोहन**०-(स्वगत) कांचनराव हिच्याशीं बोलून गेले, तरी ही आपल्याच खोलींत काय करीत आहे? काय झालं तें कळायची मला केवढी उतावळी आहे हें समजूं नये हिला? कधीं कधीं संजीवनी अशी चमत्कारिक वागते. आपणच जावं कां आतां हिच्या–कोण? संजीवनी?–(संजीवनी प्रवेश करते.) संजीवनी, तुझा चेहरा असा कष्टी कां? हें काय? तुझ्या गालांवर आंसवांचे डाग आहेत!

**संजी**०-(बळेंच हंसून) कांहीं तरीच काय? आंसवांचे डाग? (रुमालानें गाल पुशीत) कुठें आहेत? (हंसते.)

**मोहन**०-अशानं ते दिसूं लागतील, कीं दिसेनासे होतील? डाग नव्हतेच तर घाईनं रुमाल कां लावलास गालाला?

**संजी**०-मला नाहीं वाद करतां येत. अश्रू ओघळले असले तर डाग राहतील ना? सगळीच मुळीं तुमची कल्पना! कष्टी असायला काय झालं आहे मला?

मोहन०-कांचनरावांनीं तुला दुखवलं असेल कांहीं तरी कठोर बोलून. सांग, काय झालं ?

संजी०-व्हायचं आहे काय ? बाबांनीं खरंच दुसरं स्थळ ठरवलं आहे माझ्यासाठीं, अन् ते आपला हट्ट सोडायला तयार नाहींत !

मोहन०-हीं वडील माणसं अशींच. त्यांनीं कितीही ममता दाखवली तरी तरुणांच्या प्रीतींत ऐन वेळीं विघ्न आणल्याशिवाय त्यांना नाहींच बरं वाटायचं ! स्थळ तरी असं कुठलं पाहिलं आहे कांचनरावांनीं तुझ्यासाठीं ?

संजी०-त्याचा उच्चार तरी कशाला हवा आहे ? मी त्यांना अखेर स्पष्ट सांगून आलें आहे, कीं त्यांच्या रुकारावांचून आमचा प्रीतिविवाह अडून राह्यचा नाहीं.

मोहन०-तूं दृष्टीस पडल्याबरोबर मला वाटलंच कीं त्यांच्या मुलाखतीनं तुला दुःख झालं असलं पाहिजे.

संजी०-दुःख म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाहीं. बाबांचा आपल्या लग्नाला रुकार मिळाला असता तर दुधांत साखर पडल्यासारखं वाटलं असतं. पण तो मिळत नाहीं म्हणून आपले बेत अडून थोडेच राहणार आहेत ? माझ्या दीड लाखाच्या इस्टेटीची मी मालकीण आहे ! ( हंसून ) नाहीं कां ? ती तर नाहीं कुणाला हिरावून घेतां येत ?

मोहन०-( तिचे हात धरून ) अन् त्या संपत्तीहून शतपट मोलाची ही माझी संपत्ति तरी माझ्यापासून कोण हिरावूं शकेल ?

पद १४ वें.

( बागेश्रीः त्रिताल )

धना न या तुलना ।
ललनांतरिंचा हा चिरसुखद प्रेमा ॥ ध्रु० ॥
प्रणयिं बांधितां दृढतम कान्ता ।
कोण हरिल शुभ कांचनास या ? ॥ १ ॥



संजी०-( हंसत ) मीं मुळीं मनाशीं ठरवलंच आहे कीं आपण दोघांनीं आतां मुंबईस निघून जायचं !

मोहन०-चल, या क्षणींच जाऊं.

संजी०-वा ! पंख लावून उडून जायचं कीं काय ?

मोहन०-तसं जावंसं तुला नाहीं वाटत ?

संजी०-पण तें शक्य आहे कां बरं ? संध्याकाळीं जाऊं ?

मोहन०-हरकत नाहीं. आतां या मधल्या घटका केव्हां जातीलसं होणार जिवाला !

संजी०-पण एक लक्षांत ठेवायचं हं.

मोहन०-काय ?

संजी०-आपण जाणार हें बाबांना, काकांना, मंदाला, किंवा चाकरमाणसांनासुद्धां कळतां कामा नये.

[ पडद्यांत "संजीवनी ! ए संजीवनी !" अशा मंदाकिनीच्या हांका. ]

संजी०-अगबाई ! मंदा आली कीं काय ? ( मंदा प्रवेश करते. ) मला माहित आहे तूं कां आली आहेस तें ? आम्ही औरंगाबादचा बेत रद्द केला म्हणून आमची खरडपट्टी काढायसाठीं आली असशील !

मंदा०-पहा बाई, चोराच्या मनांत चांदणं.

संजी०-( मोहनला ) बघितलंत ना, तेवढ्यांत आपल्याला चोर म्हणून टाकलंन्.

मंदा०-हो हो, म्हटलं म्हटलं बरं ! साध्या बोलण्यांतनंसुद्धां अर्थाऐवजीं अनर्थ काढायचा एखादा पेपर असतो वाटतं एम्. ए.च्या परीक्षेला ?

संजी०-अशी पटाईत आहेस बोलणारी ! मला कां दाद देणार आहेस तूं ?—बरं सांग, कां आली होतीस ? सहजच ना ?

मंदा०-नाहीं, दोन कामं आहेत. त्यांपैकीं आमच्या बाबांचं आहे तें आधीं केलं पाहिजे. (मोहनला) आपल्याला आज रात्रीं आमच्या

घरीं जेवायचं अगदीं आग्रहाचं आमंत्रण करायला बाबांनीं मला पाठवलं आहे. उद्यां कदाचित् बाबांना जावं लागणार आहे परगांवीं. म्हणून त्यांनीं विनंति केली आहे कीं आज रात्रींच आपण सवड काढावी. यायलाच पाहिजे हं!

**संजी०**—अन् हें काय ग? मला नाहीं कां आमंत्रण?

**मंदा०**—तुला? तुझा स्वतंत्रपणा आतां राहिला आहे कुठं? प्रीतीची गांठ बसली कीं दोन्ही जीव एक होतात ना? काय ग, दिली ना कांचनरावांनीं संमति तुझ्या स्वयंवराला?

**संजी०**—तर? त्याबद्दल शंका कां होती कधीं?

**मंदा०**—मग आतां अभिनंदन कोणाचं करूं? तुझं कीं यांचं? पण थांब, आधीं माझ्या कामांपैकीं उरलेलं दुसरं काम करतें, अन् मग. नाहीं तर मी विसरूनसुद्धां जाईन, अन् त्या मुली बाहेर दिवाणखान्यांत तशाच तिष्ठत बसतील.

**संजी०**—कोण मुली?—ही काय भानगड आहे?

**मंदा०**—सांगतें. इथल्या तरुण सुशिक्षित मुलींनीं भगिनीसमाज नांवाची एक संस्था नुक्तीच काढली आहे. आपल्या या संस्थानांत एम्.ए.ला बसणारी तूं पहिलीच स्त्री. म्हणून तुझा गौरव करावा अन् तुझ्या तोंडून चार शब्द ऐकावे अशा हेतूनं आज संध्याकाळीं त्या भरवणार आहेत सभा. तुला आमंत्रण द्यायसाठीं त्या आल्या आहेत, अन् मध्यस्थी करून तुझा रुकार मिळवून द्यायचं मीं कबूल केलं आहे. आणतेच त्या मुलींना इकडे अं! (घाईघाईनें जाते.)

**मोहन०**—रात्रीचं जेवण! हें जमायचं कसं?

**संजी०**—जमायचं नाहीं हें उघडच आहे. पण मंदाला आपला बेत कळतां कामा नये. तिला कबूल करायचं अगदीं खचित येऊं म्हणून.

[ मंदाकिनी परत येते. तिच्याबरोबर दोन तरुण मुली, व एक आठ दहा वर्षांचा लहान मुलगा अशी मंडळी येतात. ]



**मंदा०**—(त्या मंडळीस) या अशा पुढें. ही आमची संजीवनी. संजीवनी, भगिनीसमाजातर्फें तुला आमंत्रण करायला या दोघी आल्या आहेत. यांचं नांव मालिनीबाई बेदरकर, अन् यांचं नलिनीबाई जालनापूरकर. दोघीजणी समाजाच्या जुळया चिटणीस आहेत.

**संजी०**—जुळया चिटणीस? म्हणजे?

**मंदा०**—अग Joint Secretaries. शुद्ध मराठी बोलावं असं बॅरिस्टर सावरकर बजावतात ना नेहमीं! म्हणून जुळे भाऊ, जुळया बहिणी या धर्तीवर मी काढलाय प्रयोग जुळया चिटणीस असा!

**मोहन०**—पण सावरकरांना लोक बॅरिस्टर सावरकर अशा धेड-गुजरी नांवानंच ओळखताहेत अजून!

**संजी०**—(लहान मुलाकडे बोट दाखवून) अन् मंदा, हें कोण ग? काय हो, आपणसुद्धां भगिनीसमाजाचे सभासद आहां कीं काय?

**मुलगा०**—हां! अशी थट्टा मला खपायची नाहीं हं! मालिनी-ताईबरोबर मी कधीं जातसुद्धां नाहीं तिच्या त्या बायकांच्या समाजांत! परवां एकदां कोणालाशी मेजवानी होती तेव्हां गेलें होतों तेवढाच! बायकांच्या समाजांत जातो कोण?

**संजी०**—अरे बापरे! तिखट दिसतं आहे काम बरंच!

**मोहन०**—पुढच्या पिढींत स्त्रीपुरुषांचं युद्ध चांगलंच निकराचं होणार त्याचं हें चिन्ह आहे बरं!

**मंदा०**—हं, मग काय संजीवनी? यांचं आमंत्रण स्वीकारलंस असं समजूं देत ना या?

**संजी०**—अग अशी अगदीं धिसाडघाई कशासाठीं? त्यांना चहा बिही तर देऊं देशील मला? आपण सगळींच तिकडे दिवाणखान्यांत बसूं. तूं त्यांना घेऊन पुढें हो; येतेंच मी मागोमाग.

[ मंदाकिनी व भगिनीसमाजाची मंडळी जातात. ]

**मोहन०**—मंदाकिनीच्या घरच्या आमंत्रणाप्रमाणंच हें भगिनी-समाजाचं आमंत्रणही तूं स्वीकारणार वाटतं? आपण त्यांची अखेर

MODERN COLLEGE POONA 5.

निराशा करणार आहोंत हें स्पष्ट दिसत असून त्यांना उगीच आशा लावून ठेवायची हें चांगलं कां? किती फसवतों आहोंत आपण सगळयांना?

**संजी०**–हें जगच असं चमत्कारिक आहे कीं दुसऱ्याशीं कपट करणं हेंच कधीं कधीं प्रेमाचं कर्तव्य होऊन बसतं! त्याचा काय नेम, या क्षणीं मी सुद्धां तुमच्याशीं कपट करीत नसेन कशावरून? (एकदम हंसून) बरं चला, ती मंडळी आपली वाट पाहतील.

[ दोघे जातात. ]



## प्रवेश ३ रा.

[ कांचनरावांच्या बंगल्याच्या आवारांतील जुन्या गेस्ट हाऊसमधील एक दालन. बाजी प्रवेश करतो. ]

**बाजी०**–हौशे! ए हौशे!

**हौशा०**–(आंतल्या खोलींतून बाहेर येऊन) अरे होहो! जरा हलके हांका मार. बंगल्यापर्यंत ऐकूं जाईल असं ओरडूं नकोस. अगदीं अंगांत संचार झाल्यासारखं काय करतो आहेस?

**बाजी०**–काय सांगूं तुला, खरंच कुठलं तरी विलक्षण अवसान अंगांत संचारल्यासारखं झालं आहे मला. तुझ्या माझ्या प्रेमांत भोचकपणा करणाऱ्या त्या तिसऱ्या गोम्या गणेशाचा समाचार घ्यायला ही जुन्या गेस्ट हाऊसची जागा, अन् ही तिसऱ्या प्रहरची वेळ तूं ठरवून सांगितलीस तेव्हांपासून जिवाला धीर नाहीं! पुराणांतले राजे स्वयंवराच्या मांडवाकडे धांव ठोकित असत तशी चार वाजल्याबरोबर इकडे धांव घेऊन आलों आहे. दाखव कुठें आहे माझा वैरी म्हणजे या दांडक्यानं—

**हौशा**–म्हणजे? प्राणवीण घ्यायच्या तयारीनं आला आहेस कीं काय तूं?

**बाजी०**–मग तुला काय वाटलं? अग खऱ्या मर्दाची प्रीति अशीच असते. तिला डिवचणाराची जान जायची हें ठरलेलं आहे बघ!

**हौशा०**–असा रानटीपणा करणार असशील तर आलास तसा परत जा पाहूं.

**बाजी०**–मग तुझं म्हणणं असं होय, कीं माझ्या त्या वैऱ्याला मी एक साष्टांग दंडवत घालावा, अन् म्हणावं मिस्टर, ही पथारी माझी आहे, इथें हातपाय पसराल तर कायद्याचा हिसका दाखवणं भाग पडेल मला. मी फार सॉरी आहे. हंः हंः! "शेपूट खालीं अन् धाक घाली" असलं काम बी.ए., एम.ए.वाल्यांचं! खऱ्या मर्दाचं काम

निराळं. कायद्याच्या कचेरीपेक्षां कळकाच्या काठीनंच आम्ही निकाल लावून घेतों. हं, आटप, सांग कुठें आहे तो—

हौशा॰—बाजी, तुला असला रानदांडगेपणा करायचा असेल तर ही मी चाललें बघ—

बाजी॰—अग अग—

हौशा॰—मग ती काठी आधीं टाकून दे पाहूं. सोडायचा आहे कीं नाहीं तुला आपला हट्ट ?

बाजी॰—तुम्हीं बायका काय काय सोडायला लावाल नेम नाहीं ! ही टाकली काठी ! हरकत नाहीं. नुसत्या हातांनींच त्या माणसाची कणिक अशी मऊ करतो कीं—

हौशा॰—( हंसून ) अगदीं खुशाल.

बाजी॰—कुठें, आहे कुठें तो ?

हौशा॰—आत्तां येईल. तूं या न्हाणीघरांत बैस लपून. तो माणूस आला कीं मी युक्तीनं त्याला सोडते न्हाणीघरांत. मग घे पोटभर समाचार त्याचा तुला हवा तसा.

बाजी॰—वा ! फक्कड !

हौशा॰—मग आटप तर. लप. शीर या न्हाणीघरांत.

[ तो ती दाखवते त्या खोलींत शिरतो, पण लगेच परत येतो. ]

बाजी॰—राम राम राम ! हें ग काय हौशे ?

हौशा॰—काय झालं रे ?

बाजी॰—अंधेर गुडुप आहे कीं त्या खोलींत ! डोळ्यांत बोट घातलं तरी दिसायचं नाहीं !

हौशा॰—मग काय बिघडलं ? प्रेम आंधळं असतं ना ? बोटं डोळ्यांत जाऊन तूं आंधळा झालास तर तुझं प्रेम सहजासहजीं सिद्ध होईल ! (हंसते.)



बाजी॰—अन् न्हाणीची झारी मोकळी सुटलेली दिसते आहे. भिजून जाईन कीं मी !

हौशा॰—त्यांत तरी काय बिघडलं ? नुसत्या हृदयालाच नव्हे तर नखशिखांत तुझ्या साऱ्या देहाला प्रेमाचे पाझर फुटले आहेत असं म्हणतां येईल तुला ! (हंसते.) हं, आटप. तो मनुष्य आत्तां येईल ! बैस जाऊन न्हाणीघरांत !

बाजी॰—बसतों बाबा ! प्रेमानं पागल झालों आहे खरा !

[ तो आंत जाऊन बसतो. ]

बाजी॰—(आंतून) हौशे, लवकर आण त्या माणसाला नाहीं तर या गळक्या झारीखालीं मला जलसमाधिच मिळायची वेळ येईल !

हौशा॰—( हंसून स्वगत ) तुला माहित कुठें आहे मी मुद्दामच ती व्यवस्था करून ठेवली आहे तें ! ( उघड ) अरे, चूप बैस अगदीं ! आलाच तो माणूस !

[ खंडूजी प्रवेश करतो. त्याच्याबरोबर मांत्रिक असतो. तो हौशाला मोठ्यांदा हांक मारायच्या बेतांत असतो, पण हौशा त्याला चूप राहण्याबद्दल खुणावते व त्याच्याजवळ येते. ]

हौशा॰—( हलक्या आवाजांत ) खंडूजी, इथं मोठ्यांदा बोलायचं नाहीं ही पहिली अट हं.

खंडू॰—वा ! त्यो कोन जो अगांतुक असल त्येला खुल्या आवाजानं धापांच शिया हसडल्याबिगर मला बरं वाटल व्हय ? त्येचा समाचार घ्यायसाठीं हातापरमानं जीभबी वळवळतिया बघ.

हौशा॰—वळवळत असली तरी तिला कुलुप घातलंच पाहिजे तुम्ही. अन् बरोबर ही कोण स्वारी घेऊन आला आहांत ?

खंडू॰—ह्ये व्हय ? ताजुद्दिन बाबाच्या दर्ग्यांतल मांत्रिक हायती ह्ये. बड इलमवाले हायती बघ ! पिर्ती जोडा म्हटलं जोडून देत्यात, तोडा म्हटलं तोडून देत्यात ! म्हाताऱ्याला तरन करत्यात, तरन्याला बुड्ढा करून सोडत्यात. वांझोटीला पोर देत्यात अन् पोराला कंटाळलेल्या

आवाला वांझोटी करून टाकत्यात. अस रामबान जडीबुट्टी, ताईत, गंड हायती ह्यांच्याजवळ कीं कांहीं इच्यारू नकोस. हौशे, पाया पड आधीं त्येंच्या.

हौशा०–पण ह्यांना इथं कशाला घेऊन आलांत हो ?

खंडू०–वा ! कशाला म्हंजी ? आपल्या पिर्तीच्या फडांत घुसनारा कोन रानडुकर हाय म्हनतियास, त्येचा बंदोबस्त करायसाठीं आनलया या मांत्रिकबाबांना. त्येला उभा कर तूं इथं, अन् बघ या मांत्रिकबाबांनीं भारलेल चार तांदूळ त्येच्या डोक्शीवर टाकल्याबराबर त्यो रगत वकाया लागतोया का न्हाई त्ये !

हौशा०–( स्वगत ) लोकांना फसवणाऱ्या या सोंगाड्या मांत्रिकाचीही चांगली फजीती केली पाहिजे. ( उघड ) अहो खंडूजी, असले भलते अत्याचार तुम्हांला नाहीं मी करूं द्यायची हं. या मांत्रिकबाबांना बाहेर बसायला सांगा पाहूं. नाहीं तर तुमची अन् त्या दुसऱ्या माणसाची गांठ मी नाहीं घालून द्यायची.

खंडू०–तुझी आपली काय तरीच लहर निघती. पर करतां काय ? औरतीपुढं नरमलंच पाहिजे मर्दाला. मांत्रिकबाबा, तुम्ही जरा भाईर बसतां कां ? कसुरीची माफी करा हं ! ( मांत्रिक जातो. ) हं, आतां सांग हौशे, कुठं हाये त्यो मानूस.

हौशा०–मघाशींच आला आहे तो. मीं त्याला युक्तीनं कोंडून ठेवलं आहे त्या खोलींत.

खंडू०–त्या ?

हौशा०–हो.

खंडू०–( अस्तन्या सरसावून पुढें जात ) त्याला म्हनावं घे बेट्या आतां देवाचं नांव. ( अवसानानें खोलींत शिरतो. )

[ " बरा सांपडलास लेका तडाक्यांत ! हौशीला मंतरलेलं औषध घालतोस काय ? घे ! घे !— " असे बाजीचे शब्द, त्यानें मारलेल्या चपराका, आणि " मेलों ! मेलों ! " असें खंडूजींचें ओरडणें ऐकूं येतें. ]

हौशा०–( मोठ्यांदा हंसते. )

[ मांत्रिक धांवत येतो. ]

मांत्रिक०–हें काय ? खंडूजीला काय झालं ?

हौशा०–गेला प्रेम शोधायला पण बसलं भूत मानगुटीला ! त्या खोलींत एक जबरदस्त भूत आहे. त्यानं पछाडलं वाटतं खंडूजीला ! तुम्ही जबर मांत्रिक आहांत ना ? सोडवा कीं म्हाताऱ्याला भुताच्या तडाक्यांतून ! व्हा पुढं !

मांत्रिक०–उंः ! त्यांत काय ? जय भैरवनाथ ! ( आंत जातो, पण लगेच बाजीचे तडाके खाऊन " मेलों ! मेलों ! " असें किंचाळत बाहेर येतो. )

हौशा०–कां हो, मंत्रांची दांतखीळ बसली वाटत भूत पाहिल्याबरोबर ! ( हंसते. )

मांत्रिक०–भूत कसलं, चांगला जिवंत जवान बाप्या आहे त्या खोलींत. त्याच्यापुढं आमच्या मंत्रांचा काय पाड लागणार ? आतां इथें क्षणभर राह्यची सोय नाहीं. ( पळून जाऊं लागतो. )

हौशा०–( मघांशी बाजीनें टाकलेली काठी उचलून उगारून ) जातोस कुठें ? उभा रहा. त्या दोघांच्या प्रेमाचा आचरटपणा भडकवणारा तूंच खरा अपराधी आहेस. तुला चांगली अद्दल घडली पाहिजे.

मांत्रिक०–( थरथर कांपत ) अरे बापरे ! माझे प्राण घेणार कीं काय बया तूं ?

[ " चल ये बाहेर असा. हौशीच्या पाया पड " असें म्हणत बाजी खंडूजीला धरून बाहेर आणतो. ]

बाजी०–ये असा. तुझा गांवठी चेहरा तरी पाहूं दे एकदां आतां उजेडांत ! ( खंडूजीची खालीं घातलेली मान वर करतो, व दचकतो. खंडूजीही दचकतो. ) आं ? कोण ? खंडूजी, तुम्ही ? अरे अरे अरे ! तुम्हांला कां मारलं मी अंधेरांत ?

POONA 4.

खंडू०–बाज्या, बेट्या खुशाल बडव बडव बडवलंस मला म्हाताऱ्याला ! मला काय म्हाइत हौशीला औषध खाया घालणारा तू असशील ?

बाजी०–अन् मला तरी काय माहित तुम्ही हौशीला औषध घातलं असेल हें ? म्हातारपणीं असले चाळे हवेत कशाला तुम्हांला ?

खंडू०–या मांत्रिकबाबांनीं दिलं चेतवून मला, अन् मलाबी वाटलं—

बाजी०–कोणी ? या मांत्रिकबाबांनीं ?

खंडू०–हां. कां ?

बाजी०–अहो कां काय ? मलाही यानंच चेतवलन् आणि पंचवीस रुपये उपटलेन् माझ्याकडून !

हौशा०–अन् नंदीबैलांनो, माझं प्रेम तुमच्यांपैकीं कुणालाच मिळालं नाहीं तें नाहीं ! तुम्ही पुड्या दिल्यात त्या मी लगेच फेंकून दिल्या होत्या ! (मोठ्यांदा हंसते.)

खंडू०–झालं बाज्या !

बाजी०–वाजला बाज्या !

खंडू०–आतां आपल्या दोघांस्नीबी ठकवनाऱ्या या मांत्रिकाची हाडं केलीं पाहिजेत मऊ !


बाजी०–ते आलंच ओघाला. भोळ्याबापड्यांना ठकवणाऱ्या असल्या छूमंतरवाल्यांना अखेर कोणती दक्षणा दिली पाहिजे तें दाखवूंच आपण सगळ्यांना. हौशे, आण तो बडगा इकडे !

हौशा०–(बडगा देते) मांत्रिकबाबा, इतके दिवस घी देखा, आतां बडगा देखो ! (हंसते.)


मांत्रिक०–(थरथर कांपत) ए बाबांनो, क्षमा करा, अन् जिवानिशीं सोडा ! पुन्हां जडीबुट्टी, मंत्रतंत्राचं नांव नाहीं काढणार.

[तो लोटांगण घालतो. खंडूजी, बाजी व हौशा मोठ्यानें हंसतात. पडदा पडतो.]

मांत्रिकः– बाबांनो, क्षमा करा. पुन्हा मंत्रतंत्राचं नांव नाहीं काढणार ! (अंक ३ रा, प्रवेश ३ रा, पृ. ८२)



MODERN COLLEGE POONA 5.



**मांत्रिकः–** बाबांनो, क्षमा करा. पुन्हा मंत्रतंत्राच नांव नाहीं काढणार ! ( अंक ३ रा, प्रवेश ३ रा, पृ. ८२ )

## प्रवेश ४ था

[ बंगल्याच्या व्हरांड्याची एक बाजू. काका प्रवेश करतात. ]

**काका॰**–खंडूजी ! अरे खंडूजी ! इकडेही दिसत नाहीं स्वारी ! मालकांना विचारून आजच्या दिवस रजेबिजेवर गेला आहे कीं काय हा ! – बाजी ! ए बाजी ! याचा तरी कुठें आहे ठिकाण ? मालकांना घेऊन गेला आहे कीं काय क्लबांत ? छे ! गाडी तर दिसते आहे गराजमधेंच ! मालक आज पायींच फिरायला गेले वाटतं. येते त्यांना अशी लहर कधीं कधीं. पण आतां सोडावॉटरच्या बाटल्या आणायला धाडायचं कोणाला ? कुणीच ठिकाणावर नाहीं. शोधूं तरी कुठें ? नोकरांनीं सदा हात जोडून समोर उभं राह्यचा जमाना गेला. आतां त्यांच्या मागें आम्हांला धावपळ करावी लागते आहे. काय एक एक नवा जमाना येतो आहे पहा ! ( जातो .)

[ मोहन प्रवेश करतो. ]

**मोहन॰**–( मनगटावरच्या घड्याळाकडे पाहून ) हें घड्याळ आपल्या संथ निर्विकार गतीनं माझ्या उतावळ्या हृदयाला जणूं कांहीं वेडावतं आहे ! पण माझ्या हृदयांतल्या आनंदाची याला—यालाच काय, कुणाला कल्पना असणार ? आपली प्रिया नात्यागोत्याचे पाश तोडून आपला हात धरून प्रीतीच्या नंदनवनांत पाऊल टाकते आहे या प्रत्ययाचा आनंद मोठा उन्मादकारक खराच !

### पद १५ वें.

( जीवनपुरी : एकताल )

**खुलवित जीवनसुमना रम्य भाव अंतरिचा ।**
**उमलत हांसे कलिका भ्रमरगुंजनें रमतां ।।ध्रु०।।**
**सकल जनां सोडुनिया । प्रणयपाश मानुनिया ।**
**निकटि येइ कान्ता ।। १ ।।**

( पुन्हां घड्याळ पाहून ) पण संजीवनी अजून कशी येत नाहीं ? हिच्या या उशिराला काय म्हणायचं ? बरोबर साडेपांचला फिरायला म्हणून

बाहेर पडून या बंगल्याचा कायमचा निरोप घ्यायचा असं ठरवलंन् अन् आतां आपणच उशीर करते आहे! भगिनीसमाजाच्या बायका गाडी घेऊन यायच्या आंत इथनं पाऊल बाहेर पडलं नाहीं म्हणजे चांगलाच घोंटाळा होईल! ( दाराकडे जात ) संजीवनी, संजीवनी !—

[ हौशा प्रवेश करते. ]

तुझ्या ताईसाहेबांचा पोशाख चालला आहे ना अजून? त्यांना म्हणावं—

**हौशा**०—पोशाख? छे! ताईसाहेब आहेतच कुठं खोलींत?

**मोहन**०—म्हणजे?

**हौशा**०—इकडे नाहींत ताईसाहेब. मला वाटलं आपल्या खोलींत असतील म्हणून मी निघालें होतें. मंदाकिनीबाईनीं टेलिफोनवर सांगितलं आहे पोशाख करून तयार रहा गाडी पाठवतेंच पंधरा वीस मिनिटांत!

**मोहन**०—शाबास! (स्वगत) होणार घोंटाळा! ही गेली तरी कुठें म्हणायची?

**हौशा**०—टेलिफोनच्या टेबलावर हा लिफाफा सांपडला. ताई-साहेबांना कोणाची तरी चिठी आलेली दिसते आहे.

**मोहन**०—पाहूं. (ती घेतां घेतां) बरं तूं कांचनरावांच्या खोलींत जाऊन बघ बरं संजीवनी तिथें आहे कां. (ती जाते.) हें काय?— हें माझ्या नांवाचं पत्र आहे!—अन् अक्षर संजीवनीचं?—म्हणजे?

[ लिफाफा उघडतो. त्यांत एक पत्र व चेक असतो. पत्र वाचतांच मोहनला विस्मयाचा विलक्षण धक्का बसतो. चेक व पत्र खरोखरच आपल्या हातांत आहेत काय अशा शंकेनें तो तें चाचपून व निरखून पाहतो, कपाळाला हात लावून डोळे मिटून क्षणभर उभा राहतो व नंतर पुन्हां एकदां स्वतःशीं पत्र वाचूं लागतो. ]

" प्रिय मोहन, तुमच्याबरोबर मला मुंबईस येतां येत नाहीं. इतकंच नाहीं तर या पत्रानं मी तुमचा अखेरचा निरोप घेत आहे. आपलं लग्न अर्थातच मोडलं असं समजलं पाहिजे. तुमची



जपानची सफर मात्र ठरल्याप्रमाणें व्हावी यासाठीं सोबत वीस हजाराचा चेक जोडला आहे. त्याचा स्वीकार करा. माझी भेट घेण्याचा प्रयत्न करूं नये. आतां एकदां शेवटचंच लिहून घेतें.

तुमची लाडकी,

**संजीवनी.** "

खरंच हें पत्र संजीवनीच्या हातचं आहे? का हा भ्रम होतो आहे मला सगळा? या पत्राचा अर्थ तरी काय समजायचा? सकाळीं एकदां सहज म्हणाली, ' मी तुमच्याशीं कपट करीत नसेन कशावरून?' त्याचा अर्थ हा म्हणायचा?—संजीवनी, हें तूं काय केलंस, अन् कशासाठीं?—अन् कुणाच्या धाकांत सांपडून हें तूं केलं आहेस?

[ हौशा प्रवेश करते. ]

**हौशा**०—तिकडे मालकांच्या खोलींत नाहींत ताईसाहेब.

**मोहन**०—कुठें जातें तें तुला तिनं मुळींच सांगितलं नाहीं?

**हौशा**०—छे, मला कांहींसुद्धां बोलल्या नाहींत.

[ खंडूजी प्रवेश करतो. ]

**मोहन**०—खंडूजी, तुझ्या ताईसाहेब कुठं गेल्या आहेत तुला माहित आहे?

**खंडूजी**०—न्हाई जी.

**मोहन**०—( स्वगत ) म्हणजे? विलक्षण आश्चर्य आहे म्हणायचं! ( उघड ) बाजी, अरे बाजी! ( बाजी प्रवेश करतो. ) तुझ्या ताई-साहेबांना तूं कुठें पोंचवून आलास कां?

**बाजी**०—नाहीं बुवा. आज सबंध दिवसांत गाडी काढली आहे कुठें गराजमधून?

**मोहन**०—( स्वगत ) या चमत्काराला म्हणायचं तरी काय? ( उघड ) काका! काका कुठें आहेत रे? असतील तिथनं धाडून द्या पाहूं इकडे.

[ खंडूजी, बाजी, हौशा घाईघाईनें जातात. ]

मोहन०—( पत्राकडे पाहून स्वगत ) अखेरचा निरोप !... संजीवनी हें शक्य आहे कां ? सप्त पाताळाच्या खालीं गेली असलीस तरी हा मोहन तुझ्या मागोमाग धांव घेईल !—च्! पण तूं कुठें गेलीस अन् कां गेलीस कांहींच कळत नाहीं.

[ संभू प्रवेश करतो. ]

मोहन०—अरे संभू, तुझ्या ताईसाहेब कुठें गेल्या आहेत तुला माहित आहे कां ?

संभू०—हो, मला आहे माहित.

मोहन०—( अत्यंत आश्चर्यानें व आनंदानें ) काय म्हणतोस ? तुला माहित आहे ?

संभू०—हो. सकाळीं मालकांचा अन् त्यांचा बेत ठरला तेव्हां त्यांचं बोलणं ऐकत मी दाराआड उभा होतों. मला सगळं बोलणं कांहीं नीट ऐकूं आलं नाहीं, पण जें ऐकलं त्यावरून मालक अन् ताईसाहेब आत्तां विकाराबादच्या बंगल्यांत असतील. अन् उद्यां लांब कुठं तरी दूर देशाला जाणार आहेत हें खास.

मोहन०—खरं सांगतोस हें तूं ? (त्याला एकदम गदगदा हालवून) कां मूर्खा कांहीं तरी बरळतो आहेस ?

संभू०—अहो, असं काय करतां ?...शपथ...मी...अगदीं शपथ...

मोहन०—मग आतां एका क्षणाचाही विलंब करतां कामा नये. बाजी, ए बाजी—

[ काका प्रवेश करतात. ]

मोहन०—काका, बाजीला म्हणावं ताबडतोब मोटार काढ. एका पळाचा उशीर झाला तर भयंकर परिणाम होतील.



काका०—(अर्धवट घाबरून) म्हणजे ? काय, झालं काय ? कुठें जायचं म्हणतां ?

मोहन०—कांचनरावांच्या विकाराबादच्या बंगल्यावर.

काका०—तें कां ?

मोहन०—काका, तें सांगायलासुद्धां वेळ नाहीं. पंख लावून भरारी घेणं शक्य असतं तरं तसंच केलं असतं ! बाजी ! ए बाजी ! ( जातो.)

[ काका गोंधळून त्याच्याकडे पहात राहतात, व "काय आहे कांहीं कळत नाहीं !" अशा अर्थाचा आविर्भाव करून त्याच्या मागून जातात. ]

## प्रवेश ५ वा

[ कांचनरावांच्या विकाराबाद येथील बंगल्यांतील दिवाणखाना. खिडकींतून बाहेर पहात संजीवनी उभी असलेली दिसते. कांहीं वेळानें ती अंगाला शहारे देते, खिडकींतून दूर होते, जड पावलांनीं एका टेबलाजवळ येते व पाणी पिते. ]

**संजीवनी॰**–(स्वगत) बाहेरची सारी सृष्टि थंड आहे. पण माझ्या अंतःकरणांत भावनांचा ज्वालामुखी भडकला आहे! बाहेर स्फटिकासारखं चांदणं पडलं आहे. पण माझ्या हृदयांत?—नुसता घनदाट अंधार! या सभोंवतालच्या वस्तू खऱ्या कीं खोट्या असा भ्रम वाटतो आहे. मी जिवंत आहे हें तरी खरं कां? पंचप्राणाहून जें प्रेम अधिक होतं तें कायमचं तोडून आलें, आतां माझे प्राण कोठून राहणार? मग माझे प्राण गेले असूनही मी जिवंत मात्र आहे?

पद १६ वें
( खंबावती : त्रिताल )

जीवा भासतो पसारा सारा।
लोपुनि गेला प्राणविसांवा।
जेंवि तुटावा जीवनतारा ॥ ध्रु॰ ॥
देह उरावा, जीव नसावा।
काय दशा ही? कीं भ्रम सारा? ॥ १ ॥

या अवस्थेला म्हणायचं तरी काय?—या विस्मयांतच माझं उरलेलं सारं आयुष्य जाणार आतां!

[ कांचनराव आंतल्या खोलीच्या दारांतून डोकावतात. ]

**कांचन॰**–संजीवनी! संजीवनी! (ती मान वळवून पाहते.) येतेस ना? ताटं वाढल्याची वर्दी आली आचाऱ्याकडून. (जवळ येऊन) चल ना!

**संजी॰**–मला भूक नाहीं.



**कांचन॰**–असं काय? थोडं खा. म्हणजे झोंप चांगली लागेल.

**संजी॰**–झोंप?—माझी तहान, भूक, झोंप संपली आतां कायमचीच!

**कांचन॰**–छे छे! आजची ही घटका म्हणजे माझ्या आनंदाच्या परमावधीची घटका आहे. या वेळीं मी तुला असं उदासवाणं बोलूं देणार नाहीं! संजीवनी, इकडे बघ. हांस पाहूं एकदां.

**संजी॰**–किती वेडा हिशोब हा तुमचा? फुलपांखराला धरून ठेवायचं म्हटलं तर येतं ठेवतां. पण त्याला धरल्याबरोबर त्याच्या पंखांची रंगीत खुलावट पुसली जाते, अन् तरळ हालचाल बंद पडते. ती कां जुलमानं कायम ठेवतां येईल?

**कांचन॰**–पण मी अशा दिव्य प्रेमाच्या हळुवार हातानं माझ्या फुलपांखराला धरीन, कीं—

**संजी॰**–कशाला ही भलती आशा धरतां? पेंचांत सांपडून ही संजीवनी तुमची होणार आहे खरी; पण ज्या हंसतमुख, लडिवाळ, खेळकर संजीवनीवर तुमची नजर गेली ती ही नव्हे. ती गेली, नाहींशी झाली. तुमची पत्नी व्हायचं ज्या क्षणीं तिनं कबूल केलं त्याच क्षणीं ती मृत्यु पावली. तिचं हें शरीर तेवढं तुमच्या हातीं राहिलं आहे. पेंढा भरून ठेवलेलं हरिणीचं शरीर शिकाऱ्याच्या दिवाणखान्यांत उभं असतं, तसं या संजीवनीच्या कलेवराला अर्धांगी म्हणून वागवतां येईल तुम्हांला!

**कांचन॰**–( स्वगत ) काय भयंकर शब्द हे! पण अगदीं खरे नाहींत कां?—मग मी हिच्यावर आपल्या प्रेमाचा जुलूम केला हें बरोबर कीं चूक? (बळेंच हंसून) संजीवनी, चल आपण गप्पा गोष्टी करीत चार घांस खाऊं म्हणजे तुझे हे सारे खिन्न विचार नाहींसे होतील. एका पुस्तकांत मी वाचलं आहे, कीं साऱ्या दुःखीकष्टी विचारांचा उगम उपाशी पोटांतनं होत असतो, भरल्या पोटीं माणसाला उल्हासाची अन् आनंदाची ढेंकर आल्यावांचून राहत नाहीं! ऊठ ना, चल. (तिचा हात धरावयास पुढें होतो.)

**संजी०**–अंहं! कांचनराव, माझा हात धरूं नका! मी तुमचं म्हणणं मान्य केलं आहे. पण अजून विधिपूर्वक मी तुमची झालेली नाहीं! तोपर्यंत जी प्रणयी संजीवनी सकाळीं मरण पावली तिच्या सुतकांत मी आहे असं समजा! मला स्पर्श करूं नका.

**कांचन०**–वेडे, शब्दांच्या अन् कल्पनांच्या मोहाला बळी पडून कांहीं तरी काय बोलायचं बरं? तूं माझी झालीस म्हणजे सुखविलासांनीं तुला कसं आच्छादून टाकायचं, अन् तुझ्या उन्मत्त हास्याच्या चंद्रिकेंत सदा स्नान करीत कसं आयुष्य घालवायचं याच्या परोपरीच्या कल्पना मी मनाशीं ठरविलेल्या आहेत!

**संजी०**–कल्पना आणि अनुभव यांत मोठं अंतर असतं. तुमच्या माझ्या संसारांत फार तर तुम्ही सुखी व्हाल, मी सदैव अशी दुःखी कष्टीच असणार! हट्टानं लग्न केलं खरं, पण मूर्तिमंत दुःखाशींच लग्न केलं असं तुम्हांला क्षणोक्षणीं वाटेल!

**कांचन०**–(स्वगत) अरेरे! माझ्या प्रेमाला असलीं कडू फळंच यायचीं? (बळेंच हंसून) संजीवनी! जखम झाली म्हणजे ती जुनी होईपर्यंत माणूस ओरडतं त्यांतलं तुझं हें बोलणं आहे. मोहनरावांचा तुला विसर पडला कीं तुझी वृत्ति बदलेल. तो तर तुला विसरूनही गेला असेल. माझी खात्री आहे, तुझ्या प्रेमापेक्षां पैशावरच त्याची खरी नजर होती. तो चेक हातीं पडतांच त्यानं अत्यानंदानं मुंबईची वाट धरली असेल!––

**संजी०**–हां! कांचनराव! तुम्हांला पुन्हां एकदां– अन् अखेरचं बजावतें कीं मोहनरावांबद्दल असल्या शंका मला ऐकवीत जाऊं नका! जें स्वर्गीय प्रेम अल्पकाळ उपभोगलं त्यावर मी आपल्या हातानं विस्मरणाचा पडदा घातला आहे. पण त्याच्या अपमानाची भाषा मी साफ ऐकणार नाहीं.

**कांचन०**–बरं, राहिलं. जाऊं दे तो विषय. ऊठ, जेवायला चल.

**संजी०**–मला भूक नाहीं. तुम्ही जेवून घ्या.



**कांचन०**–तूं जेवली नाहींस तर मीही उपाशी राहीन. राहूं?

**संजी०**–रहा बापडे.

**कांचन०**–ठीक आहे. असाच इथें बसून राहतो मी.

**संजी०**–मग मी उठून जातें तर!

**कांचन०**–म्हणजे?

**संजी०**–कृपा करा, अन् मला एकटं–– अगदीं एकटं बसूं द्या.

**कांचन०**–इतका माझा तिटकारा वाटतो तुला?

**संजी०**–तिटकारा नव्हे, पण—काय तें सांगतां येत नाहीं मला—पण मला एकटं बसावंसं वाटतं आहे. खरंच, सोडा मला एकटीला इथें.

**कांचन०**–ठीक आहे. उद्यां सकाळीं आपल्याला कोलंबोला जायला निघायचं आहे, लक्षांत आहे ना?

**संजी०**–हो.

**कांचन०**–( जाऊं लागतात. आंतल्या दालनाच्या दरवाजांत पाऊल टाकण्यापूर्वी एकदां वळून संजीवनीकडे पाहातात. तिनें दीनपणें मस्तक हाताच्या तळव्यावर टेंकलेलें त्यांना दिसतें. तिच्याकडे पहात स्वगत ) संजीवनी मिळविण्याऐवजीं तिचा प्राणघात मात्र मी केला कीं काय? या परिणामाची कल्पना नव्हती! ( कांहीं वेळ तिच्याकडे निरखून पाहून आंत जातात. )

**संजी०**–( हलकेंच मस्तक वर करीत ) मोहन, माझ्या या अवस्थेची तुम्हांला कल्पना तरी असेल कां? बाकी नाहीं तेंच उत्तम. तुम्ही कुठें असाल बरं या वेळीं? त्या माझ्या पत्रानं तुम्हांला काय वाटलं असेल? संजीवनी कुठें आहे म्हणून साऱ्यांना विचारीत सुटला असाल तुम्ही! पण तुम्हांला कळणं शक्य नाहीं. मोहन! मोहन! मनं एक झालेलीं असलीं म्हणजे हजारों कोसांवर हांक ऐकूं जाते म्हणतात. मग माझी हांक तुम्हांला कां नाहीं ऐकूं येणार? मोहन! मोहन!

[ पडद्यांत मोहनचा आवाज होतो: "संजीवनी! संजीवनी!" ]

संजी०-(दचकून) काय? मोहनची उलट हांक? मला भ्रम तर झाला नाहीं?-मोहन!

मोहन०-(प्रवेश करून) संजीवनी! (एकदम तिला बाहुपाशांत घेण्याच्या आविर्भावानें जवळ जातो) संजीवनी!

संजी०-(दूर होऊन) नको, नको. दूर व्हा.

मोहन०-म्हणजे?

संजी०-मी परस्त्री आहे.

मोहन०-संजीवनीला या शब्दाचा संसर्ग लागणं शक्य नाहीं. ती माझी आहे.

संजी०-ती तुमची होती; पण आतां नाहीं.

मोहन०-संजीवनी, कुठली प्राणघातकी थट्टा आरंभली आहेस ही?

संजी०-थट्टा नाहीं, खरंच मी परस्त्री झाल्यासारखी आहे. बाबांनीं जें स्थळ माझ्यासाठीं पाहिलं होतं त्याला मी मान्यता दिली आहे. माझ्या वडिलांनीं मोठी इस्टेट मागं ठेवली ही माझी कल्पना खोटी ठरली, अन् बाबांच्या दयाधर्मावरच मी वाढलें अन् शिकलें सवरलें हें मला कळून आलं. बाबांनीं मला सांगितलं, कीं त्यांनीं ठरविल्याप्रमाणं लग्न करायचं नसेल, तर मला निष्कांचन अवस्थेंत घराबाहेर पडावं लागेल, अन् त्यांचं ऐकल तर मात्र मी मागेन तेवढे पैसे मला मिळतील! हे दोनच मार्ग माझ्यापुढें होते. म्हणून मी बाबांचं म्हणणं कबूल केलं अन् तो चेक तुम्हांला पाठविला.

मोहन-त्या चिटोऱ्याची मला काय मातब्बरी?

संजी०-परदेशीं जाऊन वैभवसंपन्न होण्याची वाट त्यानं खुली राहील!

मोहन०-पण त्या वैभवाची तरी मला काय मातब्बरी? संजीवनी, कोठल्या वेडेपणाच्या लहरींत ते पैसे तूं माझ्याकडे पाठविलेस? आपल्या प्रेमाच्या मानेवर अशी सुरी ठेवतांना तुझा हात यत्किंचितही चळला नाहीं?



संजी०-छे छे. प्रेमाला विसरून नव्हे, तर खऱ्या प्रेमाला स्मरूनच तुमची माझी कायमची ताटातूट पत्करून तुम्हांला पैसे मिळवून द्यायचं मीं ठरवलं.

मोहन०-ताटातूट पत्करण्यानं प्रेमाचं समाधान होऊं शकतं?

संजी०-आम्हां स्त्रियांच्या प्रेमाचं स्वरूप मोठं गूढ आहे म्हणा वाटलं तर. पण वल्लभाच्या कीर्तीचा कायमचा विध्वंस होऊं देण्यापेक्षां ती साधण्यासाठीं कायमची ताटातूट सहन करायलाच स्त्री सदा तयार होईल. वल्लभाचा सहवास इहलोकीं नाहीं तर परलोकीं अखंड लाभेल अशी आम्हां स्त्रियांची श्रद्धा असते. इहलोकांतल्या साऱ्या वैभवाचीं छत्रचामरं आपल्या वल्लभावर ढळलेलीं आपल्याला दुरून पाहायला मिळालीं तरी पुरे अशी आमच्या मनाची अनिवार ओढ असते. आमच्या प्रेमाला खरी तहान हीच असते. तुम्ही मोठे कीर्तिवंत झालेले माझ्या कानीं आलं कीं माझं प्रेम धन्य झालंसं मला वाटेल!

**पद १६ वें.**

(भैरवी : अद्धा)

**इहलोकिंचा सुखपाश हा।**
**नच गुंतवी अबलामनाला ॥ ध्रु० ॥**
**कीर्तिमहापदिं कान्त नटावा।**
**पाहुनि जीव सुधन्य गणावा।**
**सुखमय शुभपथ हा।**
**बहु लोभवी अबलामनाला ॥ १ ॥**

जा, मोहन, सुखांत असा!

मोहन०-माझं सुखसर्वस्व इथें टाकून एखाद्या करंट्यासारखा दुसरीकडे सुखाचा शोध करूं म्हणतेस? संजीवनी, आम्हां पुरुषांच्याहि प्रेमाचं स्वरूप गूढच आहे. परलोकाबद्दल भोळी श्रद्धा आमच्या मनांत नसते; म्हणून कामिनीचा सहवास जन्मांतरावर ढकलायला आम्ही तयार नसतों. तो याच लोकांत अन् याच जन्मांत मनःपूत लुटायसाठीं आम्ही अधिर

असतों, अन् त्या तृषेच्या तृप्तींत कुठलंही विघ्न मानायची आमची खुषी नसते. कीर्ति किंवा लक्ष्मी म्हणजे मौजघडीला आमचं मन रिझवणारी दासी. तिची मला काय गणति? पुरुषांच्या पंचशक्तींना दिव्य संजीवन देणारी एकच किमया या विश्वांत आहे. ती कामिनी !

पद १७ वें.

( मालकंस : रूपक )

धन्य नर तो धन्य गमला
सुभग कामिनी सेवि ज्याला ॥ ध्रु० ॥
प्रणयसंजीवन कलांना ।
अमरता दे मानवांना ।
करि सुरभुवन याचि लोका ॥ १ ॥

प्रीतिसाफल्याच्या उल्हासांत जगाला चकित करून सोडणारी अचाट साहसाचीं किंवा बुद्धीचीं कामं आम्ही लीलेनं करून दाखवूं. प्रीति-साफल्य टाकून मी कीर्तीमागं धांवेन?

**संजी०**—छे, छे, मोहन, या मोहांत पडूं नका. जा.

**मोहन०**—संजीवनी, तूंच अज्ञानानं भ्रमांत पडली आहेस.

[ कांचनराव आंतल्या दालनाच्या दारांत येऊन उभे राहिलेले दिसतात. ]

**संजी०**—नाहीं. माझा वल्लभ कीर्तीनं अमर व्हावा ही एकच माझी वांछा. तिच्यासाठीं माझ्या साऱ्या सुखाचा बळी द्यावा लागला तरी तेवढा त्याग मी करीन.

**मोहन०**—पण माझी संजीवनी सदैव माझीच असावी ही एकच माझी वांछा! अन् तिच्यासाठीं माझ्या साऱ्या मनोरथांचा होम झाला तरी तेवढा त्याग मी आनंदानं करीन!

**संजी०**—माझ्या त्यागानंच आपल्या प्रीतीला स्वर्गीयता येईल! मोहन, जा.

**मोहन०**—पण प्रीतीच्या अखंड संगतीनंच माळरानाचं नंदनवन होतं! संजीवनी, चल. आतां मी एकही शब्द अधिक ऐकणार नाहीं! तुझा हात असा धरून—



**मोहनः-** थांब, तो चेकच फाडतो म्हणजे झालें।
**संजीवनीः-** हं ! मोहन ! (अंक ३, पृष्ठ ९५)

MODERN COLLEGE POONA

संजी०–छे छे. मोहन, मी परस्त्री आहे, पुन्हां सांगतें.

मोहन०–वीस हजारांचा तो चेक माझ्या हातीं द्यायसाठींच या विटंबनेला तयार झालीस ना ? तें चिटोरंच फाडून टाकतों म्हणजे झालं ! संजीवनी, प्रीति किंवा कीर्ति या प्रश्नाला माझं काय उत्तर आहे तें पहा !

[ खिशांतून चेक काढून त्याचे तुकडे करूं लागतो. ]

संजी०–मोहन !

मोहन०–मला आडवूं नकोस ! तुझ्या माझ्यांत अंतर उत्पन्न करणारं हें विष असंच नष्ट केलं पाहिजे. (चेकचे तुकडे करून हवेंत उडवतो. ) प्रीतीच्या अलौकिक संजीवनाला माणसं पारखीं होतात तीं या विषामुळंच ! संजीवनी ! आतां तरी या बाहुपाशाचा आश्रय करशील ना ?

संजी०–( आलिंगन देऊन ) मोहन !

मोहन०–संजीवनी !

संजी०–आतां आपल्याला अगदीं मुकाट्यानं इथून पाऊल काढलं पाहिजे.

मोहन०–तुला उचलूनच नेतों अलगद ! मग तर झालं ?

संजी०–इश्श् !

मोहन०–तुझं कांहीं सामान घ्यायचं आहे ?

संजी०–कांहीं नाहीं.

मोहन०–मग चल तर.

[ दोघें एकमेकाच्या कमेरभोंवतीं हात टाकून निघतात. तितक्यांत इतका वेळ दाराआड राहिलेले कांचनराव प्रवेश करतात. ]

कांचन०–ताई ! मोहनराव ! जरा थांबा !

संजी०–अग बाई ! बाबा !

मोहन०–कोण ? कांचनराव ?



मोहनः– संजीवनी, आतां तरी या बाहुपाशाचा आश्रय करशील ना ? (अंक ३, पृष्ठ ९५)

**कांचन॰**–ताई, भिऊं नकोस. मोहनराव रोष करूं नका. तुमच्या जाण्यांत विघ्न करायसाठीं मी आलों नाहीं. माझं म्हणणं एवढंच कीं जातांना माझे आशीर्वाद घेतलेत तर बरं नाहीं कां?

**मोहन॰**–( विस्मयानें ) खरं म्हणतां?

**संजी॰**–(अत्यंत विस्मयानें) तुमचे...आशीर्वाद? (आनंदानें) बाबा, आमच्या लग्नाला तुम्ही संमति देणार?

**कांचन॰**–होय संजीवनी, तुमच्या दोघांचा सारा संवाद मी ऐकला, अन् त्यानं माझ्यांत विलक्षण क्रांति झाली आहे. प्रेम अन् वासना यांत काय अंतर आहे असं मी तुला विचारलं होतं, आठवतं आहे? त्याचं उत्तर तुला देतां आलं नव्हतं, अन् तें कोणालाही देतां येईलसं मला वाटलं नव्हतं. पण तुमच्या संवादांत तें मला सांपडलं. जी त्याग करायला तयार नसते ती वासना, अन् जें पराकोटीचा त्याग करायला उत्सुक असतं तें प्रेम, हें मला आतां पुरं पुरं कळलं आहे. माझ्या अंगीं खलत्व आलं होतं. पण तुमची दोघांची गाढ प्रीति डोळ्यांनीं पाहतांच तें गळून पडलं. कसलं तरी दिव्य संजीवन मिळाल्याप्रमाणं माझ्या मनाची शुद्धि झाली आहे. ताई! बेटा!– मी फार फार वाईट झालों होतों, नाहीं? (तिच्या मस्तकावरून हात फिरवितो.)

**संजी॰**–(गहिंवरून) नाहीं, बाबा. तुम्ही किती किती चांगले आहांत. असं पाणी नाहीं अं काढायचं डोळ्यावाटे!

**कांचन॰**–पण मला हें सांगतांना तूं आंसवं गाळते आहेस!

**संजी॰**–असं काय हो?

**कांचन॰**–मोहनराव, ही माझी लेक, अन् तिला सालंकृत करण्यासाठीं माझी सारी संपत्ति मी तुम्हांला आशीर्वादपूर्वक अर्पण करतों. तुमचं प्रेम अन तुमचे मनोरथ, दोहोंचंही साफल्य झालेलं मला डोळ्यांनीं पाह्यला मिळणार, याहून अधिक थोर भाग्य तें कोणतं?

**मोहन०**—कांचनराव, माझ्या मनोरथांना तुमच्या औदार्याचं संजीवन मिळावं यांत मी स्वतःला धन्य समजतों.

**पद १८ वें.**

( देसकार : त्रिताल )

**सकल ही कामना मधुरा ।**
**रुचिर पावली संजीवना ॥ ध्रु० ॥**
**गुणरत कांता अति कमनीया ।**
**तेवि संपदा लाभली मला ।**
**तोष हा मना ॥ १ ॥**

[ मोहन व संजीवनी वांकून नमस्कार करतात. ]

**कांचन०**—( आशिर्वाद देऊन ) आतां तोंड गोड करूं या. ( आंतल्या आचाऱ्याला सांगितल्यासारखें ) अरे रामय्या ! ताटं मांड ! तीन हं ! एक पाहुणे आले आहेत एकाएकीं !

[ सर्वजण हंसतात. ]

[ पडदा. ]

समाप्त.